# माणूस

शनिवार । १७ एप्रिल १९७६ । एक रुपया

## अर्थव्यवस्थेला श्रमप्रतिष्ठेचे वळण लावायचे तर ?

ग्राहकः एव राजा

गेल्या आठवड्यात, रामनवमीच्या शुभमुहूर्तावर पुण्यातील ग्राहक चळवळीने एक महत्त्वाचा टप्पा गाठलेला आहे. अनेक दिवस लाखो रुपयांच्या उलाढाली, लहान मोठी आंदोलने चालू असली, तरी चळवळीला मध्यवर्ती व प्रशस्त अशी सोयीस्कर जागा नव्हती. सुधीर फडके यांच्या टिळक मार्गावरील चित्रकुटीत काही काम चाले. अडीअडचणीला ' माणूस ' किंवा 'सोबत' साप्ताहिकांच्या कचेऱ्या ताब्यात घेतल्या जात. कुणाचा बंगला, कुणाची पत्र्याची शेड वेळप्रसंगी उपयोगात आणली जाई. पण यामुळे वेळ व कार्यकर्त्यांची शक्ती फार खर्च होई व परावलंबित्वही जाणवत असे. आता जागेची ही अडचण केवळ दूर झाली आहे इतकेच नव्हे, तर नव्या वास्तूमुळे चळवळीला एक वेगळीच शान आणि उठावदारपणाही येण्यास चांगली मदत होणार आहे. अनेक वर्षे टिळक पथावरील, स. प. महाविद्यालयासमोरील जीवन रेस्टॉरंटची मोक्याची जागा धूळ खात पडली होती. मूळ मालकांपैकी श्री. बोडस जीवन रेस्टॉरंट सोडून गेल्यानंतर या जागेला ऊर्जितावस्था अशी कधी आलीच नव्हती. ही अवकळा आता दूर होऊन ग्राहक चळवळीचा गरूड आता या इमारतीवरून आकाशात अधिक उंच उंच भरारी घेत राहील यात काही शंका नाही. कारण या गरुडाची झेप आहेच तशी विलक्षण. दोन वर्षांपूर्वी चळवळ सुरू झाली आणि आज तीन-चार लाखाची मालकीची इमारत मध्यवर्ती कार्यालयासाठी घेण्याची तिची हिम्मत व्हावी, हे एक आश्चर्यच नाही का?

पृष्ठ दोन वर चालू...

# साप्ताहिक माणूस

**वर्ष पंधरावे – अंक : पंचेचाळीसावा**

**१७ एप्रिल १९७६**

**मूल्य : एक रुपया**

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


[ पृष्ठ एक वरून ]

जनतेच्या एका स्वयंस्फूर्त चळवळीने असे मजबूत यश इतक्या अल्पावधीत मिळवले असल्याचे उदाहरण निदान अलीकडच्या महाराष्ट्रात तरी दिसत नाही. लांड्यालबाड्या करून दोन-चार वर्षांत संस्था-व्यक्ती उदयास येत असतात. पण स्वच्छ व्यवहारांवर, काटेकोर हिशोबांवर ग्राहक चळवळीच्या सूत्रधारांचा पहिल्यापासूनच कटाक्ष आहे. ही सर्व उचित व्यवहारांची पथ्ये सांभाळून ग्राहक चळवळीने स्वत:साठी अशी डोळयात भरणारी जागा हस्तगत करावी याचे कुणालाही कौतुकच वाटेल. या धडाडीबद्दल ग्राहक चळवळीच्या चालकांचे–विशेषत: श्री. बिंदूमाधव जोशी यांचे–सर्वांनी अभिनंदन करायला हवे. कारण इतरजण सल्लागार, मदतनीस, सहकारी वगैरे असले तरी दिवसरात्र या चळवळीसाठी वेडे होऊन राबणाऱ्यांमध्ये बिंदूमाधवच सतत आघाडीवर राहिलेले आहेत. चळवळीसाठी आता तर त्यांनी आपला धंदाही जवळजवळ सोडलेला आहे. पुण्यातील ग्राहक चळवळीला अशी योग्य व्यक्ती शोधूनही सापडली नसती. बरे झाले एक प्रकारे–त्यांनी पक्षीय राजकारणातून अंग काढून घेतले. पक्षात राहिले असते तर निवडणुकांपलीकडे त्यांचे फारसे लक्ष गेलेही नसते कदाचित. आता पक्षाने परत बोलावले तरी त्यांनी जाऊ नये. ग्राहक चळवळीला त्यांची अधिक गरज आहे.

केवळ तेलातुपाचे, धान्याचे, वस्तूंचे वाटप नीट करणे एवढाच ग्राहक चळवळीचा आवाका राहावा असे कुणीच मानत नाही. इष्ट दिशेने आपल्या अर्थव्यवस्थेचे घसरलेले गाडे वळवून आणणे एवढी होती सुरुवातीच्या ग्राहक चळवळीमागील संकल्पांची व्याप्ती. पाश्चात्य देशात असलेल्या ग्राहकवादाची ( Consumerism ) नक्कल करणे हा काही या चळवळीचा मूळ उद्देश नाही. ग्राहकांना योग्य भावात, योग्य दर्जाचा माल मिळवून देणे एवढीच काही या चळवळीची मूळ प्रेरणा नाही. आपल्या समाजात अनुत्पादक प्रवृत्ती फार बोकाळलेल्या होत्या-आहेत. नको त्या वस्तूंचे उत्पादनही खूप चालू असते. त्यामुळे सर्व अर्थव्यवस्थेचा तोल एकीकडे ढळतो, विषमता वाढते, देश हळूहळू कर्जात रुतत जातो. ही प्रक्रिया बदलवण्यासाठी, पलटवण्यासाठी ग्राहक चळवळीचा उपयोग व्हावा, अशी सुरुवातीची संकल्पना होती. यासाठी, उदाहरणार्थ 'ऑपरेशन लक्ष्मीरोड' होते. केवळ पंधरा–वीस टक्के भाव खाली उतरवा एवढीच मागणी या ऑपरेशनच्या मुळाशी नव्हती. दलाल हटवा असे आपण म्हणत होतो.

चैनीची-महाग कापडे काढू नका, सर्वांना परवडण्यासारख्या काही ठराविक कापड प्रकारांचे उत्पादन वाढवा—या व अशा स्वरूपाच्या इतर मागण्या कशासाठी होत्या ? देशातील उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण थोपवण्याचा, श्रमप्रधान नियोजनाचा, उत्पादनपद्धतीत व तंत्रात आवश्यक ते बदल करण्याचा विचार या सर्व मागण्यांमागे होता. पण नंतरच्या काळात या विचारांचा निकडीने हवा तेवढा पाठपुरावा झाला नाही, ही एक उणीवेची बाजूही या नूतन गृहप्रवेशाच्या वेळी आपण ध्यानात घेतली पाहिजे. काही जवळची उद्दिष्टे, तात्पुरती कामे यांत फार गुंतून पडल्यामुळे हे घडले असावे कदाचित. पण ही लांब पल्ल्याची उद्दिष्टे डोळ्याआड करून कसे चालेल ? एक वाटपयंत्रणा म्हणून ग्राहक चळवळीने खूप मजबूत काम केले हे खरे आहे; पण एक स्वतंत्र शक्ती म्हणून आपला प्रभाव घडामोडींवर पाडण्यासाठी केवळ वाटपयंत्रणा पुरेशी नाही. गरुडाचा हा एक पंख झाला. पण दुसरा पंखही फडफडायला हवा. हव्या त्या वस्तूंचे, हव्या त्या ठिकाणी व पद्धतीने उत्पादन कसे व्हावे हेही ग्राहक चळवळीने हळूहळू सांगायला पाहिजे व सांगितले गेलेले, ऐकले जाण्यासाठी अवश्य ते शक्तिसामर्थ्य गोळा केले पाहिजे. ही एक जनतेची स्वयंप्रेरित चळवळ आहे आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेला इष्ट वळण लावण्याची तिची आकांक्षा आहे हे सारखे जाणवत राहिले पाहिजे. भांडारे चालवणे हे चळवळीचे उद्दिष्ट नाही असे बिंदूमाधव आपल्या प्रत्येक भाषणातून सांगत असतातच. प्रश्न एवढाच आहे की, ही भांडारे चालवत असतानाच, तेला-तुपाचे–धान्याचे–वस्तूंचे वाटप निर्दोष पद्धतीने करत असतानाच ग्राहक चळवळीने, लांब पल्ल्याची मूळची ठरवलेली उद्दिष्टे गाठण्यासाठी आणखी काही उपक्रम हाती घ्यायला हवेत की नकोत ? केवळ दलाल हटवून उत्पादकांशी थेट संबंध जोडणे एवढ्यावर थांबून चालणार नाही. मोठ्या उत्पादकाकडून छोट्या उत्पादकांकडे जाणेही अवश्य आहे. समाजातील दुर्बल घटकांना बाजारपेठा मिळवून देणे हेही कार्य जोमाने व्हायला हवे. ग्राहक चळवळीचा उगम शनवारवाड्यावरील एक ऑगस्टच्या मेळाव्यातून झालेला आहे. या मेळाव्यात स्वदेशी आणि बहिष्काराचे ठराव संमत झाले. हे ठराव वास्तवात उतरविण्यासाठी ग्राहक संघांची चळवळ सुरू करण्यात आली. टिळक-गांधींच्या काळातील स्वदेशी-बहिष्काराच्या व्याख्या आता बदलल्या पाहिजेत. हेही त्या मेळाव्यानेच स्पष्ट केले. टिळकांच्या वेळी परदेशी वस्तू वर्ज्य मानल्या गेल्या. देशात तयार झालेली कोणतीही वस्तू स्वदेशी मानली गेली. परंतु आता दुर्बल घटकांकडून, मागासलेल्या, अविकसित भागातून तयार झालेल्या वस्तू स्वदेशी म्हणून मानल्या जायला हव्यात व मोठ्या, मक्तेदारी गटातून उत्पादित झालेल्या वस्तू परदेशी म्हणून बहिष्कृत ठरायला हव्यात. म्हणजेच ग्रामोद्योगांना, लहानलहान ठिकाणांहून निघणाऱ्या वस्तूंना चालना देणे हेही ग्राहक चळवळीच्या विविध उपक्रमांमागील एक महत्त्वाचे सूत्र ठरायला हवे. काही दिवसांपूर्वी म्हैसाळ येथील हरिजन शेतमजुरांनी आपल्या सहकारी शेती संस्थेद्वारा उत्पादित केलेली द्राक्षे ग्राहक चळवळीने मागवून पुण्यात मोठ्या प्रमाणावर त्यांची विक्री संघटित केली. अशा उपक्रमात खंड पडता कामा नये. याला जोडूनच शहरी भागात, मक्तेदार–मोठ्या उत्पादनकेंद्रातून विनाकारण गर्दी करणाऱ्या मालाविरुद्ध बहिष्काराचे अस्त्रही उचलण्याचा विचार व्हायला हवा. आता कोल्हापूरच्या चपलांना पुण्यात मोठी बाजारपेठ मिळवून देण्याची कल्पना चालकांच्या मनात घोळते आहे. याला जोडूनच बाटा वगैरे परदेशी मक्तेदार कंपन्यांच्या मालाविरुद्ध बहिष्काराची चळवळही संघटित करायला नको काय ? विधी आणि निषेध एकदमच समोर यायला हवा, नाहीतर चळवळ एकांगी व परिणामी निष्फळ ठरते. नव्या देशी अवतारातल्या वसाहतवादाचे दुष्परिणाम रोखायचे तर, बहिष्कार ही या चळवळीतली ढाल आहे व दुर्बल घटकांकडून आलेल्या मालाला उठाव मिळवून देणे ही तलवार आहे. या दोन्ही साधनांचा वापर वेळ व प्रसंग पाहून करण्यात आला तरच अर्थव्यवस्थेला इष्ट ते **श्रमप्रतिष्ठित** वळण लावण्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्याची शक्यता आहे. नाहीतर ग्राहक चळवळ ही केवळ मूठभरांचा आर्थिक स्वार्थ संघटित करणारी एक युनियन-पद्धतीची चळवळ ठरेल. ‘ राष्ट्रदेवो भव ’ हे ग्राहक चळवळीचे बोधवाक्य निरर्थक ठरेल. आर्थिक दृष्ट्या राष्ट्र मजबूत व स्वावलंबी बनवायचे तर प्रसंगी नुकसान सोसूनही दुर्बल घटकांसाठी सहकार्याचा हात पुढे करायला ग्राहकांना शिकवले पाहिजे. स्वस्त आणि मस्त वस्तूंचे त्यांचे वेड कमी करायला त्यांना भाग पाडले पाहिजे. गरुडाने आता अशा उंच भराऱ्या घेण्याचा विचार लवकर करावा. नूतन वास्तुप्रवेशाचे त्यामुळे सार्थक होईल.

**श्री. ग. मा.**

# आशिया
## तीन महत्त्वाच्या घटना

वा. दा. रानडे

चीनमधील सत्तास्पर्धेत तेंग सियाओ पिंग यांची सर्व अधिकारपदावरून हकालपट्टी, कंबोडियात प्रिन्स सिहनुक यांची निवृत्ती आणि थायलंडमधील निवडणुकांत उजव्या गटांकडे झुकलेला कल या तीन घटना आशियातील राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

चीनचे पंतप्रधान चौ एन लाय यांच्या निधनानंतर तेथील सत्तासंघर्षास तीव्र स्वरूप आले. चौ एन लाय यांच्या अखेरच्या आजारीपणाच्या काळात त्यांची सर्व महत्त्वाची कामे तेंग सियाओ पिंग पाहात होते. त्यांचीच पंतप्रधानपदी निवड होईल, अशी पाश्चात्य निरीक्षकांची अपेक्षा होती. पण चौ यांच्या निधनानंतर जवळजवळ एक महिना पंतप्रधान म्हणून कोणाची निवड झाली नाही, एवढेच नव्हे तर, हंगामी पंतप्रधान म्हणूनही कोणास घोषित केले नाही. एक महिन्याने हुआ कुओ-फेंग यांना हंगामी पंतप्रधान नेमण्यात आले. उपपंतप्रधानांमध्ये खालच्या क्रमांकास असलेले हुआ एकदम हंगामी पंतप्रधान झाले. हुआ हे काही डाव्या गटाचे म्हणून प्रसिद्ध नाहीत. सांस्कृतिक क्रांतीच्या नेत्यांविरुद्ध आणि रेड गार्डस्‌विरुद्ध दडपशाही केली म्हणून हुआ यांच्याविरुद्ध भित्तिपत्रकांची मोहीम जहाल गटाने दोन वर्षांपूर्वी केली होती. जहाल गट हे विसरणे शक्य नाही. केवळ तडजोड म्हणूनच हुआ यांच्या निवडीस या गटाने मान्यता दर्शविली. आपल्या गटास आताच पंतप्रधानपद मिळाले नाही तरी चालेल, पण तेंग यांना ते मिळू द्यावयाचे नाही, हा त्याचा मुख्य उद्देश होता. सत्तास्पर्धेतून प्रथम उजव्या गटाला बाद करायचे, मध्यममार्गी नेत्याकडे काही काळ पंतप्रधानपद सोपवून नंतर त्याचीही हकालपट्टी करायची आणि आपल्या गटाचा नेता तेथे आणायचा, असा जहाल गटाचा पवित्रा असल्याचे दिसते. हुआ यांना ७ फेब्रुवारीस हंगामी पंतप्रधान घोषित केले, त्यानंतर दोन महिन्यांनी म्हणजे ८ एप्रिलला पंतप्रधान म्हणून त्यांच्या नावाची घोषणा झाली. पण सत्तास्पर्धा संपली, असा याचा अर्थ नव्हे. हुआ यांच्या पंतप्रधानपदी नेमणुकीपेक्षाही तेंग यांची सर्व अधिकारपदांवरून हकालपट्टी अधिक महत्त्वाची आहे. पण तेंग यांची हकालपट्टी झाली, तरी चौ यांचा गट सत्तास्पर्धेतून पूर्णपणे बाद झाला, असा याचा अर्थ नाही. या गटाच्याच दुसऱ्या एका नेत्याला नव्याने महत्त्व येऊ लागले आहे. त्याचे नाव लिसिएन-दिएन. दोन दशकांपेक्षा अधिक काळ चीनच्या प्रमुख योजनाकारांपैकी तो एक होता आणि चौ एन लाय यांचा निकटचा सहकारी होता. तोही उपपंतप्रधान आहे. तेंग यांच्या हकालपट्टीचा जहाल गटाचा आग्रहच असेल, तर आताच त्याबद्दल संघर्ष नको. चौ आणि तेंग यांच्याप्रमाणेच धोरण असलेल्या लिसिएन दिएनला महत्त्व मिळत असेल, तर ही तडजोड आपण मान्य करावी. व्यक्तीपेक्षा धोरण पुढे चालू राहणे अधिक महत्त्वाचे आहे, असा विचार चौ यांच्या गटाने केला असावा असे दिसते. तेंग यांना अधिकारपदांवरून दूर केले असले, तरी त्यांचे पक्षसदस्यत्व रद्द केलेले नाही, हेही लक्षात घेतले पाहिजे. चौ यांच्या गटानेच तसा आग्रह धरला असावा व जहाल गटाने ते तडजोडीसाठी मान्य केले असावे.

सत्तास्पर्धेच्या लढ्याला खरी सुरुवात माओत्सेतुंग यांच्या निधनानंतर होईल. पक्षाची एकजूट टिकविण्याचे महत्त्व माओंनाही पटलेले आहे. म्हणूनच मनाने ते जहाल गटाच्या बाजूचेच असले, तरी पंतप्रधानपद आपल्याच गटाला मिळावे असा आग्रह त्यांनी धरला नाही. पक्षाची एकजूट टिकली नाही, तर रशिया त्याचा फायदा घेईल आणि नेमस्त गटाला हाताशी धरून चीनवर आपली पकड बसविण्याचा प्रयत्न करील अशी भीती माओंना वाटे. माओ यांच्या निधनानंतर पक्षाचे अध्यक्षपद हुआ कुओ-फेंग यांच्याकडे आणि पंतप्रधानपद लिसिएन-यांच्याकडे सोपविले जावे अशी तडजोड माओ यांच्या मनात असण्याची शक्यता आहे, पण जहाल गटाचे आजचे धोरण लक्षात घेता, ही तडजोड मान्य होणार नाही. पक्षात फूट पडली तरी चालेल, पण पक्षाचे अध्यक्षपद आणि पंतप्रधानपद ही दोन्ही पदे जहाल गटाला मिळाली पाहिजेत असा त्याचा प्रयत्न राहील. तेव्हा पक्षांतर्गत संघर्ष माओंच्या निधनानंतर अधिकच तीव्र होण्याचा संभव आहे.

कंबोडियामध्ये प्रिन्स सिहनुक यांनी याचवेळी राजीनामा द्यावा हे सहजी घडलेले असून खिऊ संफोन यांनी त्यांना निवृत्त करण्यासाठी हीच वेळ हेतुपूर्वक निवडली. प्रिन्स सिहनुक यांच्यामार्फत कंबोडियाच्या राजकारणावर आपला प्रभाव ठेवावा आणि कंबोडियास मॉस्को आणि हानोईच्या प्रभावापासून दूर ठेवावे असे चीनचे धोरण होते. खिऊ संफोन यांना ते मान्य नव्हते. त्यांनी प्रिन्स सिहनुक यांना जवळ जवळ वर्षभर राष्ट्रप्रमुखपदी राहू दिले, पण या काळात ते नामधारी प्रमुखच होते. खरी सत्ता खिऊ संफोन यांच्याच हाती होती. चीनचे नेते अंतर्गत संघर्षात गुरफटले आहेत ही संधी साधून प्रिन्स सिहनुक यांना आताच निवृत्त करावे असे खिऊ संफोन यांनी ठरविले व तो निर्णय त्यांनी अंमलात आणला. त्यामुळे कंबोडियावर चीन आता काही प्रभाव पाडू शकणार नाही.

जवळच्याच थायलंडमध्ये मात्र राजकारण निराळ्या दिशेने वळण घेत आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकांत कोणत्याच पक्षाला निर्णायक बहुमत मिळाले नाही व अस्थिरता कायम राहिली हे खरे पण उजव्या गटांचे बळ वाढत असून डाव्यांचा प्रभाव कमी झाला आहे हे या निवडणुकांनी स्पष्ट झाले. पंतप्रधान कुक्रित प्रमोज पराभूत झाले व सोशॅलिस्ट ॲक्शन पार्टी हा त्यांचा पक्ष अवघ्या ४६ जागा मिळवून तिसऱ्या क्रमांकाने निवडून आला. एकूण २७९ जागांपैकी सर्वात जास्त ११७ जागा डेमोक्रॅटिक पार्टीने मिळविल्या. त्या खालोखाल ५५ जागा उपपंतप्रधान प्रपर्ण अदिरेक सरन यांच्या थाय नॅशनल पार्टीने मिळविल्या. हे दोन्ही उजव्या गटाकडे झुकणारे पक्ष असून पूर्वीपेक्षा त्यांचे बळ वाढले आहे. आता नव्या सरकारात उजव्यांचा प्रभाव राहील. मुख्य प्रश्न अमेरिकन फौजा व सल्लागारांबाबत नवे सरकार काय धोरण स्वीकारणार हा आहे. काही थोडे सल्लागार सोडता सर्व अमेरिकन फौजा पंतप्रधान कुक्रित प्रमोज यांच्या आदेशानुसार काढून घेण्यात आलेल्या आहेत पण अमेरिकन फौजा ठेवण्यास उजवे गट अनुकूल आहेत. तेव्हा याबाबत नवा करार होऊन पुनः अमेरिकन फौजा ठेवल्या जाण्याची शक्यता आहे, पण डावे गट व विद्यार्थी या निर्णयाला जोराचा विरोध करतील. त्यातून तेथे उजव्या-डाव्या गटातील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. □

# सोलकढी

## □ रडत रडत अल्सर बरा करा

फाड फाड इंग्रजी बोलणे; नाटकांचे फुकट पास मिळणे; आंबे व केळी सोडून इतर फळे शक्यतो न खाणे; अंगठा तुटलेली चप्पल आणि बटण तुटलेले बुशशर्ट घालणे; केसांना चापून तेल लावणे; एकच वरण वेगवेगळ्या नावांनी सकाळ-संध्याकाळ ओरपणे; आधी टेबलफॅन घेऊन मग सीलिंगफॅन घेणे; एक वर्तमानपत्र विकत घेऊन आणि बाकीची सगळी फुकट मिळवून वाचणे; आणि त्यातल्या बातम्यांवर बदाबदा बोलणे; पापड-लोणचे-मेथकूट चविष्ट होण्यासाठी घरच्या घरीच करणे; लहान मुलांच्या पाठीत धपाटे घालणे; सकाळी लवकर उठणे–दुपारी आडवे न होणे–रात्री लवकर झोपून जाणे; बरोबरीच्या मुलींना, मुलांनी, जवळची ताई मानणे आणि बरोबरच्या मुलांना, मुलींनी, लांबचा 'भाऊ' मानणे; जास्त पावसाळे पाहिल्यावर जास्त शहाणपण येते असे समजणे; बोलणे खरे आणि तर्कशुद्ध वाटावे म्हणून मोठ्याने आणि दुर्बोध बोलणे; वर्गात पहिला नंबर येणे; पानात पडेल ते खाणे; आपल्यावर सतत अन्याय होतो आहे अशी समजूत करून घेणे; देवापुढे ठेवायला लहानातलहान नारळ मन लावून शोधणे; मुंजी करून मुलांवर एकदाच आणि कायमचे सुसंस्कार करून ठेवणे; सगळ्या दक्षिण भारतीय माणसांना 'मद्रासी' म्हणणे; 'महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले' असा व्यापक विचार उराशी बाळगणे, या आणि असल्या काही गोष्टींना प्रिय अमुच्या एक महाराष्ट्र देशात विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

हसण्याचेही तसेच. हसणे ही एक अद्‌भूत गोष्ट आहे असे कोणीतरी महाराष्ट्राला सांगितले आहे. त्यामुळे हसण्यासाठी महाराष्ट्र जिवाचा आटापिटा करतो. प्रसंगी रडकुंडीला येतो. पण महाराष्ट्राच्या कपाळावर आठी जितकी सहज उमटते तितके ओठावर हासू नाही सहज उमलत. मात्र त्याला प्रतिष्ठा मोठी. हास्य हे निरोगीपणाचे ठळक लक्षण आहे असेही कोणीतरी महाराष्ट्राला सांगितले आहे; आणि आपण निरोगी आहोत, हे दाखवायची महाराष्ट्राला मोठी हौस आहे. खरे म्हणजे हसणे हाच एक रोग आहे : निरोगी महाराष्ट्राला तो कदापी होणार नाही.

शिवाय महाराष्ट्राला निरोगी ठेवण्यात आता रडण्याचीही मोठी मदत होऊ शकेल. रडणे महाराष्ट्राला छान जमते. पण रडणे हे रोगटपणाचे लक्षण आहे, असे महाराष्ट्राने का मानावे, कळत नाही. खरे म्हणजे रडणे ही माणसाच्या सुसंस्कृतपणाची जन्मखूण आहे! अश्रू! अश्रूंचे मोल म्या काय वर्णावे? अश्रू ठेवण्यासाठी आणि दाखविण्यासाठी परमेश्वराने दोन डोळे निर्माण केले : डावा आणि उजवा. उजवा आणि डावा. एक आणि एक-दोन डोळे! धन्य त्या परमेश्वराची आणि धन्य त्या विज्ञानाची : नुकताच एका शास्त्रज्ञाने असा शोध लावला आहे की, ओले रडण्यामुळे अल्सर बरा होतो! रडायचा विशेष अभ्यास असल्यामुळे बायकांना पुरुषांपेक्षा अल्सर कमी होतो. रडणे हा जिन्नस बायका, कितीतरी गोष्टींना पर्यायी म्हणून वापरतात : खेळणे, फिरायला जाणे, वाचणे, लिहिणे, पोहोणे, बाजारात जाऊन घासाघीस करणे, मित्रमंडळीत तावातावाने भांडणे, सिगरेट ओढणे, विमान चालवणे, रेडिओ ऐकणे, टी. व्ही. पाहणे, वर्तमानपत्राचा अभ्यास करणे, दाढी करणे, मिशांना पीळ भरणे, आंघोळ करणे, हसणे, क्रिकेटची कॉमेंट्री ऐकणे, दारू पिऊन बेहोष होणे, लोकशाहीवर श्रद्धा ठेवणे, वीस कलमी कार्यक्रम राबवून राष्ट्राचा पैकीच्यापैकी उद्धार करणे, या आणि अशा असंख्य गोष्टी बायकांना नुसते रडून साधता येतात. रडण्याला मात्र अधिक रडण्यावाचून दुसरा पर्याय नसतो.

हे तर स्वयंप्रेरित रडण्याचे झाले. त्याशिवाय हुकुमी रडवायची काही प्रभावी साधने महाराष्ट्रात उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ, मराठी नाटके : शाईने आणि रक्ताने लिहिणाऱ्या लेखकांबरोबरच अश्रूंनी लिहिणारे लेखक महाराष्ट्रात आहेत. वसंत कानेटकर, बाळ कोल्हटकर, मधुसूदन कालेलकर, सुरेश खरे प्रभृती मराठी नाटककार हुकुमी हुंदके वसूल करू शकतात. तीन तासात तीनशेहून अधिक हुंदक्यांची हमी काही नाटके देऊ शकतात. रडण्याबद्दलच्या नव्या संशोधनामुळे, या नाटकांची, महान कौटुंबिक, हृदय हेलावणारे, सोज्वळ आणि अल्सरवरील हमखास गुणकारी नाटक, अशी जाहिरात करायची खाशी सोय झाली आहे.

स्वतःला जादा मोठे समजणाऱ्या व्यक्तीला अल्सर व्हायची शक्यता अधिक असल्यामुळे महाराष्ट्रात प्रत्येकाला अल्सर होतो. हसण्याने अल्सर बरा होतो अशी आत्ताआत्तापर्यंतची लोकसमजूत असल्यामुळे हसत हसत अल्सर बरा करायचे प्रयत्न येथे झाले. परंतु स्वच्छ, तोंडमोकळे, मनमोकळे हसणे महाराष्ट्राला जमत नाही. मग आपले उगाच बळेढोबळे हसायचे, झाले. त्याने अल्सर बरा व्हायच्याऐवजी अधिक फणफणतो. आता या रडण्याबद्दलच्या नव्या संशोधनाच्या वार्तेने महाराष्ट्राला केवढातरी दिलासा मिळणार आहे. रडत रडत अल्सर बरा



करायचे प्रयत्न आता येथे सुरू होतील. महाराष्ट्राला रडणे छान जमत असल्यामुळे अल्सर येथे आता औषधालासुद्धा मिळणार नाही अशी खात्री मला वाटते.

अल्सर रडण्याने बरा होईल हो.
पण रडणे ?
ते कशाने बरे होईल ?

¤

## □ अंगण सरळ करायची नाचानाच

नाचता येईना अंगण वाकडं (आणि रांधता येईना ओली लाकडं) हा एक वाप्रयोग सोडला तर एकूण 'नाचणे' या गोष्टीला महाराष्ट्रात फार बरा अर्थ नाही. माणसाचे शरीर ललित, लयदार, लोभसवाण्या रीतीने हालूचालू शकेल यावर आपला विश्वास नाही. रांगडया ओबडधोबडपणाचा आपल्याला घसकफसक अभिमान. चालायचे ते वाऱ्याशी भांडल्यासारखे. हातवारे करायचे ते हवेला बोचकारल्यासारखे. त्यामुळे सर्वसामान्य महाराष्ट्रीय माणसाच्या अंगात नृत्य नाही. उत्कट भावनेचा आविष्कार करायला त्याला नृत्याचा आधार घ्यावा लागत नाही हे विस्मयावह (आणि भयावहसुद्धा) असले तरी खरेच आहे. म्हणून आपल्याकडे नाटकासारख्या दृश्य-माध्यमाश्रयी कलाप्रकारातसुद्धा नृत्य अभावानेच आढळते समूहनृत्य आणि नृत्यनाटच या गोष्टी तर हिमवर्षावासारख्या दुर्लभ. आता शाळा–महाविद्यालयातून, विद्यार्थ्यांच्या अंगच्या कलागुणांना उत्तेजन देण्यासाठी, या गोष्टी सादर केलेल्या पाहायला मिळतात. पण त्यांना तोंडदेखलेही उत्तेजन देताना जीव घावराफुम होतो त्याचे काय ?

त्यामुळे परदेशी नृत्यनाटच अथवा नृत्य-नाटचपूर्ण चित्रपट, प्रेमाने पाहात असलो तरी, त्यांचे देशी नमुने पाहायची हिंमत मला होत नाही. इंग्रजी फारसे येतकळत नसल्यामुळे माझ्याकडे देशाभिमान आणि देशभाषाभिमान चिक्कार आहे. तरीही देशी नृत्यनाटचातले अघळपघळ बरवट पाहवत नाही. यासाठीच पुण्याच्या 'कला छाया' या नृत्यशाळेने सादर केलेले 'प्रतिमा' हे नृत्यनाटच आपण पाहू नये, असे म्हणत होतो. पण झाले असे की, त्या नृत्यनाटचाबद्दल कानावर आपले जिकडून-तिकडून गोडधोड पडत होते. कवी–नाटककार आरती–चि. त्र्यं. प्रभु–खानोलकरांच्या प्रतिभेचा अभिनव उन्मेष, अशी 'प्रतिमा'ची कीर्ती ऐकली होती. 'आविष्कार'ने जरी ते नाटकासारखे सादर केले (दिग्दर्शिका : सुलभा देशपांडे, प्रमुख भूमिका : श्रीराम लागू, सुलभा देशपांडे, दीपा श्रीराम, अमोल पालेकर) तरी ते नृत्यनाटचाला अधिक जवळचे आहे, असे जाणकार मंडळी, कधी नव्हे ते, स्पष्टपणे म्हणत होती. मग पुण्याच्या 'कला छाया'ने ते जवळ केले, असे वाचले. 'घाशीराम'–'अजब न्याय'–'मुद्राराक्षस' या संगीत नाटकांना संगीत देऊन दुमदुमलेले भास्करफेम चंदावरकर 'प्रतिमा'चे संगीतसंकल्पन करणार होते. दूरचित्रवाणीच्या आपल्या मुलाखतीत त्यातल्या प्रयोगाबद्दल ते बरेचकाही बोलले होते. 'प्रतिमा'चा पुण्यात झालेला प्रयोग पाहून पुण्याच्या सवाई समीक्षकांनी त्याचे अगदी केशर घालून कौतुक केले होते. यामुळे माझे तळयात–मळयात सुरू झाले. एक मन सांगायचे; नृत्यनाटचच रे ते; त्याला काय जायचे. लगेच दुसरे मन समजवायचे : नृत्य-नाटचच असले तरी वेगळे असेल; सगळया गुण्या गोष्टी जुळून आल्या आहेत; शिवाय तिकिटे घरपोच येऊन पडली आहेत. (हे एक पोकळ असते : असल्या कार्यक्रमांची तिकिटे कशी चपखल घरी चालत येतात. ती आणून देणारे मोठे मित्राळे माझ्याभोवती कसे जमले कोणास ठाऊक, क्रिकेट सामन्यांच्या वेळी मात्र सगळे श्रमदान करायला कुठेनरीच निघून जातात पठ्ठे. मग मी 'भटो भटो !' ...'ओ ऽ' करत बसतो नि काय. असो.); गेल्याने काही बिघडणार नाही; जा बाबा जा. दोन मनांच्या भांडणात नेहमी दुसऱ्याच मनाचा जय होतो, असे एक मी ललित-निबंधात आणि इतरत्रही पाहून ठेवले आहे. ते मन दुसरे असते हेच याचे कारण असेल काय ?–असा, माझ्या चिंतनचलाख व्यक्तिमत्त्वाची साक्ष पटवणारा प्रश्न फिजूल उपस्थित करून जे झाले ते धडाम्कन सांगायचे म्हणजे मी 'प्रतिमा' पाहायला गेलो.

आणि मग त्याने 'प्रभा'वित होण्यावाचून गत्यंतरच उरले नाही. तब्बल दहा वर्षांचा अनुभव जमा केलेल्या ज्या 'कला छाया' या नृत्यशाळेने हे नृत्यनाटच आमच्यापुढे छुनकछुमछुमवले त्या संस्थेच्या प्राचार्या आहेत प्रभा मराठे. साक्षात बिर्जू महाराज प्रमुख सल्लागार आहेत. सांगलीच्या राजमाता पद्मिनीराजे पटवर्धन आणि डॉ. सुनीती पुंगलिया अनुक्रमे अध्यक्षा आणि उपाध्यक्षा आहेत. लच्छू महाराज, हिराबाई बडोदेकर, भीमसेन जोशी, वसंत बापट (राष्ट्रसेवा दल, कलापथकाच्या सौजन्याने–कंसातला मजकूर आमचा), बी. के. एस्. अय्यंगार (थांबा, धीर धरा. अजून दोन आहेत–कंसातला मजकूर आमचा), सुनील कोठारी, भास्कर चंदावरकर, असे सात हे संस्थेचे मानाजी सभासद आहेत. आता एवढी सगळी टोपली-भर माहिती मला झाली कशी, याचा, वाचकहो, आपण अचंबा करत असाल. पण या अनंतरावावर विश्वास ठेवणार असाल तर सांगतो : असल्या विषयात मला थोडे साक्षात्काराचे अंग आहे : असले कार्यक्रम पाहिल्याबरोबर ते कार्यक्रम करणाऱ्या बंवडचा संस्थांची सगळी हवीनकोतेवढी माहिती मला म्हटले तर एकदमच होऊन जाते. 'प्रतिमा' आणि ते सादर करणारी 'कला छाया' ही नृत्यशाळा यांच्याबाबतीत असेच झाले. पुण्याच्या सवाईसमीक्षकांना ही माहिती करून घेण्यासाठी, कार्यक्रमाच्या निमित्ताने किर्लोस्कर छापखान्यात छापलेले आणि पुष्कळ चुकांना सामावून घेणारे जे इंग्रजी माहिती-पत्रक काढले होते त्याच्यावरच सर्वस्वी अवलंबून राहावे लागले असावे की काय असे वाटते.

नुसत्या या नृत्यनाटचाबद्दल बोलायचे म्हणजे बोलणाऱ्याला आणि ऐकणाऱ्याला अवघड वाटावे असा मामला होता. आणि कोणालाही काहीही अवघड झाल्यास मला खूपच वाईट वाटते. म्हणून त्याबद्दल अधिक बोलत नाही. नृत्यनाटच पाहताना महाराष्ट्राबद्दल अंतःकरणात आपुलकी दाटून आली. इतर कोणत्याही विषयांसंबंधी महाराष्ट्राचे स्वतःबद्दल कितीही गैरसमज असले तरी नाचणे हा एक विषय मला असा दिसतो की, त्याच्यासंबंधी महाराष्ट्राचा स्वतःबद्दल कसलाही गैरसमज नाही. इतका नाही की नाचता येईना म्हणून वाकडया 'अंग'णाची सोयीस्कर सबबसुद्धा महाराष्ट्राने कधी सांगितलेली नाही. आपल्याला नाचता येत नाही हे कळणे हा आत्मज्ञानाचाच प्रकार होय. भल्याभल्यांना ते कळत नाही; आणि मग अंगण सरळ करायची नाचानाच करण्यात त्यांचे उभे आयुष्य भागून जाते.

–अनंतराव



# पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे सामान्य लोकांचं त्याच्यावर अलोट प्रेम होतं !

फर्स्ट सर्कल या अॅलेक्झांडर सोल्झेनित्सिन यांच्या कादंबरीतील एका प्रकरणाचा काही भाग

ती खोली अगदीच लहान आणि बैठीही होती. तिला खिडक्या अजिबात नव्हत्या. दोन दारं मात्र होती. पण खिडक्या जरी नसल्या, तरी ती खोली मात्र छान हवेशीर होती. कारण तिथली हवा स्वच्छ आणि खेळती राहाण्याची जबाबदारीच मुळी एका खास इंजिनिअरवर सोपविण्यात आली होती. त्या खोलीचा बराचसा भाग एका प्रशस्त पण ठेंगण्या कोचानं व्यापला होता. कोचावर कापडी उशा ठेवलेल्या होत्या आणि वरच्या भिंतीवर फिकट गुलाबी शेडचे दोन दिवेही दिसत होते.

कोचावर एक व्यक्ती झोपली होती.

इतर कोणत्याही ऐतिहासिक व्यक्तीहून अधिक वेळां तिची प्रतिमा जगभर जागोजाग दगडांत कोरली गेली होती.

ऑईल पेंटमध्ये, वॉटरकलरने, खडूंनी किंवा विटकरीने रंगवली गेली होती.

वाळूचे दगड, शिंपले, चकचकीत फरशांचे, गव्हाचे दाणे किंवा सोयीबीनमध्ये घडवली गेली होती.

हस्तीदंतांत कोरली गेली होती.

लॉनमध्ये कापली गेली होती.

गालीचांमध्ये विणली गेली होती.

आणि आकाशात विमानांच्या धुरांनी रेखाटली होती, पण आता मात्र तो माणूस त्या कोचावर नुसताच आपले पाय जरासे पोटाशी ओढूनच पडला होता त्याच्या पायांत कॉलेशियन बूट होते. त्यानं सैनिकी कोट घातला होता. आणि त्या कोटाला छातीवर आणि पोटावर दोन दोन भले मोठे खिसे पण होते. आपल्याकडच्या असंख्य करड्या, खाकी, काळ्या आणि पांढऱ्या लष्करी कपड्यांच्या सांठ्यातून हा जुना वेश त्यानं निवडला होता. यादवी युद्धाच्या काळापासूनच अशा पोशाखांची त्याला संवय होती. नाही म्हणायला स्टॅलीनग्राडच्या लढाईनंतर फक्त एकदाच त्याला मार्शलचा वेश चढवावा लागला आणि आपली जुनी संवय मोडावीही लागली होती.

ह्याच माणसाचं नाव,

नेहमीच जागतिक वृत्तपत्रांच्या शिरोभागी झळकतं.

हजारो नभोवाणी निवेदक ते शेकडो भाषांत उच्चारतात.

असंख्य वक्ते आपल्या पहाडी वक्तृत्वातून गाजवतात.

लहान पोरं बासरीवर तो स्वर घुमवतात.

असंख्य धर्मगुरू आपल्या आशीर्वचनातून गातात.

ह्याच माणसाचं नाव–

मृत्युमुखी पडणाऱ्या अगणित युद्धकैद्यांच्या ओठावर, आणि तुरुंगांतल्या आणि मजुरांच्या छावण्यांतल्या असंख्य माणसांच्या झिजून गेलेल्या दंतहीन हिरड्यांवर गोठून गेलं होतं.

ह्या माणसाचं नाव–

शहरांना–चौकांना, रस्त्यांना–गल्ल्यांना, शाळांना, इस्पितळांना पर्वतशिखरांना, जहाज वाहतुकीच्या मार्गांना, कारखान्यांना, खाणींना, सामुदायिक शेतांना, युद्धक्षेत्रांना, बर्फ फोडणाऱ्या जहाजांना, मच्छीमार बोटींना, पादत्राणांच्या दुकानांना, कामगारांच्या मुलांच्या संगोपन गृहांना देण्यात आलं होतं.

इतकंच काय मॉस्कोच्या पत्रकारांच्या पद्धतीप्रमाणे व्होलगा नदीला आणि चंद्रालासुद्धा हे नाव देता येईल !

पण तो मात्र एक

मानेला वळचा पडलेला,

सुरकुतल्या कातडीचा,

(ह्या सुरकुत्या तशा त्याच्या कोणत्याच चित्रात दाखवण्यात आल्या नव्हत्या !)

श्वासाला तुर्की तंबाखूचा वास येणारा,

पुस्तकाच्या पानांवर नेहमी डाग पाडणाऱ्या राठ, थंड, ओलसर बोटांचा,

एक छोटा म्हातारा होता ! कालपासून तसा तो आजारीच पडला होता. आणि म्हणूनच हवेत जरी उकाडा असला तरी, त्याला मात्र थंडी वाजून आली होती. म्हणून त्यानं उंटाच्या लोकरीची एक तपकिरी शाल पांघरली होती– शिवाय आज त्याला तसं फारसं कामही नव्हतं. म्हणूनच जाड बांधणीच्या आणि चॉकलेटी कव्हरच्या एका लहानशा पुस्तकाची पानं तो सहज चाळत पडला होता. त्यातले फोटो तो आवडीनं पुन्हा पुन्हा पाहात होता. आणि त्याला आधीच माहिती असलेलीच त्या पुस्तकातली क्षणचित्रं तो पुन्हा पुन्हा नव्यानं वाचतही होता. या पुस्तकाचा त्याच्या दृष्टीनं उपयोग एवढाच होता की, ते लहानसं असल्यामुळे ते लोकांना नेहमी स्वतःजवळ बाळगणं सहज शक्य होणार होतं. ते पुस्तक अवघं अडीचशे पानांचंच होतं. तरीही एखाद्या वृद्ध किंवा अडाणी माणसाला वाचता यावं, म्हणून मुद्दामच ते स्वच्छ आणि ठळक टाईपात छापलं गेलं होतं. त्या पुस्तकाच्या कव्हरावरच ठसठशीत सोनेरी अक्षरं होती–

'जोसेफ विसारीओनोविच स्टॅलीन
एक लघुचरित्र'

त्याचं वर्णन करणाऱ्या, –

अलौकीकयुद्धनेता,

समंजस द्रष्टा,

अफाट आकांक्षी,

दुर्दम्य आत्मविश्वासनिर्भर,

अशा साऱ्याच विशेषणांतून अटळपणे मानवी मनावर फुंकर घालण्याचं एक विलक्षण सामर्थ्य प्रतीत होत होतं, आणि त्याशिवाय, अठरा सालापासूनचा हा लेनिनचा सच्चा सहकारी,

(खरोखरीच तो नव्हता की काय ?)

क्रांतीचा सर्वोच्च लष्करी नेता, (खरंच तो नव्हता की काय ? कारण आघाडीवरचा गडबड-गोंधळ ध्यानी येताच आखलेली फ्रॅन्झेची चढाईची युद्धयोजना खरं तर स्टॅलिनच्या आदेशाबरहुकूम आखण्यात आली होती.)–

आणि खरं तर, आपल्याच राष्ट्रासाठी चाललेल्या त्या युद्धाच्या बिकट कालखंडात, असा हुशार आणि मुरब्बी नेता आपल्याला लाभावा हेच आपलं केवढं मोठं सद्भाग्य !

आणि हा महान् नेता म्हणजेच स्टॅलिन !

(होय ! खरोखरीच ते भाग्यवान होते !)

तसं प्रत्येकालाच माहीत आहे,

त्याच्या युक्तीवादाचं भयंकर सामर्थ्य !

त्याच्या मनाची विशुद्धता !

(कोणताही खोटा अभिनिवेश न बाळगता हे त्याला मान्यच करावं लागतं.)

त्याचं लोकांवरील प्रेम !

त्याची मानवी समाजाविषयीची मोठी तळमळ !

त्याचा डामडौलाबद्दलचा तिटकारा !

त्याची स्तिमित करणारी विनम्रता !

(होय ! त्याच्या नम्रतेविषयी हे अगदी खरं आहे !)

छान ! आणि ते प्रकाशक असेही म्हणतात की, ते पुस्तक खपायलाही तसं चांगलं आहे.

त्याची दुसरी आवृत्तीच मुळी पन्नास लाख गेली, आणि खरं तर एवढ्या मोठ्या देशाच्या मानानं तीसुद्धा अपुरीच होती. एक ते दीड कोटीची तिसरी आवृत्ती काढायला अजूनही बराच वाव आहे. ती आता सरळ कारखान्यांतून, शाळांतून, सामुदायिक शेतांवर नेऊन विकली पाहिजे.

मग क्षणभर त्याला सगळ्याचाच उबग आला. त्यानं पुस्तक बाजूला ठेवलं. टेबलावरचं सोललेलं सफरचंद उचललं आणि त्याचा एक तुकडा तोडला. तो तुकडा चघळता चघळता त्याची विमनस्कता कुठल्या कुठे पळून गेली. शिवाय आयोडीनसारखी एक उग्र चव त्याच्या जीभेवर रेंगाळत राहिली.

त्याला आता हे कळून चुकलं होतं की, त्याची प्रकृती दिवसेन्दिवस खालावत चालली आहे. पण हे उघडउघड कबूल करायची मात्र त्याला भीती वाटत होती. अलीकडे तसा तो स्मृतिभ्रमानं आजारीही असे. आणखी त्याला nausea चे अॅटॅकही येत असत. तसं दुखणं असं खास कोणतंही नसलं, तरी कधी कधी त्याला भयंकर अशक्तपणा येत असे आणि मग त्याला बळचानंच तासन्तास अंथरुणावर पडून राहावे लागे. अगदी झोपसुद्धा त्याच्या बाबतीत सुखाची गोष्ट राहिली नव्हती. कारण एकदा त्यानं अंथरुणाला पाठ लावली की, त्याला कुठलीही हालचाल करणंच जड जाई. आणि मग जेव्हा तो झोपून उठे तेव्हासुद्धा तो पूर्वीइतकाच सुस्त, थकलेला, कंटाळलेला असे. खरं तर ह्या वयातसुद्धा कॉकेशीअन माणूस झाडावर चढतो, घोड्यावर बसतो, आणि सुंदर स्त्रियांचीदेखील पारध करण्यात निष्णात असतो. आणि एकेकाळी तर तो स्वतःच केवढा सुदृढ होता!

खरं तर त्याला चांगलं नव्वदीपर्यंत जगायचंय. पण सारंच गणित कुठेतरी चुकतंय. आणि चांगलं चांगलं खाणंपिणं हा त्याच्या

आयुष्यातला केवढा मोठा विरंगुळा आहे! पण गेले वर्षभर साधं भरपेट जेवण्याचं सुखही त्याला लाभलेलं नाही. आजकाल संत्र्यांचा रस त्याच्या जीभेला झोंबतो. आणि डॉक्टरानं मना केलेली तिखट जॉर्जिअन फळंसुद्धा त्याला बेचव लागतात. खारवलेल्या माशांवरची त्याची इच्छाही आता उडालीय. ते त्याला मातीसारखे बेचव लागतात. त्याची दारूची चटकही आता पार मागे पडलीय. कारण प्यायल्यावर त्याचं डोकंच बधीर होऊन जातं. आणि स्त्रीचा विचार तर आता त्याला घृणास्पदच वाटतो.

आणि म्हणूनच आत्ता त्यानं जेव्हा नव्वद वर्षे जगायचं परत एकदा ठरवलं तेव्हा लगेच त्याचं त्यालाच जाणवलं की, उर्वरित आयुष्यात त्याला वैयक्तिक सुख असं मिळणार नाहीयेय. आता फक्त पुढची वीस वर्षं त्याला यातनाच सोसत जगायचंय आणि तेही साऱ्या मानवी समाजाच्या भल्यासाठीच! तसं एका डॉक्टरनं त्याला सावध केलं होतंही! पण त्यालाही गोळ्या घालून मारण्यात आलं! म्हणूनच मॉस्कोतले प्रथितयश डॉक्टर जेव्हा त्याला तपासत तेव्हा स्टेथॉस्कोप धरलेले त्यांचे हातसुद्धा थरथरा कापत! इंजेक्शनवर तर त्याचा मुळीच विश्वास नव्हता. म्हणून तर कुठलाच डॉक्टर त्याला इंजेक्शन घेण्याचा सल्ला देण्याच्या भरीस पडत नसे. त्याचा विश्वास फक्त दोनच गोष्टींवर होता. एक म्हणजे इलेक्ट्रिक थिरपी आणि दुसरी म्हणजे भरपूर फलाहार. आणि जॉर्जिअन माणसाला फळं खायला सांगणं नकोच!

त्यानं आपले डोळे किंचित किलकिले केले आणि फळाचा आणखी एक तुकडा चावला.

त्याच्या सत्तराव्या वाढदिवसाचा भव्य सोहळा तीन दिवसांपूर्वीच मॉस्कोत पार पडला.

वीस तारखेच्या संध्याकाळी ट्राईकोकोस्तोव्हला फासावर चढवण्यात आलं होतं. त्यामुळे खरा सोहळा दुसऱ्या दिवशी सुरू झाला. सुरुवातीला बोल्शॉय थिएटरात एक शानदार सभा झाली. त्यावेळी माओ-त्से-तुंग, पॅसीओनारिया आणि इतर कॉमरेड्सची स्टॅलिनच्या गौरवपर भाषणं झाली. नंतर सर्व उपस्थितांना एक बडा खाना देण्यात आला. आणि त्यानंतर काही खास लोकांसाठी आणखी निराळी मेजवानी आयोजण्यात आली होती. त्यात द्राक्षांपासून बनवलेली खास स्पॅनिश मद्ये देण्यात आली. तिथे स्टॅलीन खूपच खेळीमेळीनं वागत होता. दारूनं तारवटलेल्या चेहऱ्यावर दगाबाजीची चिन्हं अजमावताना त्याला त्याच्या गमत्या स्वभावाचा चांगलाच उपयोग होणार होता. नंतर तो आणि बेरीया दोघेच पीत बसले. त्यांनी कॉकेशिअन मद्याचे घुटके घेतले आणि जॉर्जिअन गाणीसुद्धा गुणगुणली. बावीस तारखेला परदेशी प्रतिनिधींसाठी एक भव्य स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. तेवीसला त्यानं व्हिर्ताच्या 'स्टॅलीनग्राडची लढाई' या चित्रपटाचा दुसरा भाग पाहिला. खरं तर त्यात त्यानं स्वतःलाच रुपेरी पडद्यावर पाहिलं. आणि मग त्यानं विशेनव्हस्कीच्या 'अविस्मरणीय १९१९' या नाटकातली आपली भूमिका रंगमंचावरही सादर केलेली पाहिली.

तेव्हा तसा तो खूप थकला होता. तरीही त्या कलाकृती पाहून त्याला फार समाधान वाटलं. (त्या दोघांना आता स्टॅलिन पुरस्कार मिळावा!) त्याच्या राष्ट्रसेवेचा मुद्दाम गौरव करायचा म्हणून नव्हे तर खरोखरच त्याच्या यादवी युद्धातल्या कामगिरीचं एक वास्तववादी चित्रण ह्या निमित्ताने लोकांपुढे मांडलं जात होतं. वेळोवेळी त्यानं बजावलेली लेनिनच्या सल्लागाराची आणि प्रसंगी त्याच्या अती उतावळ्या आणि गाफील स्वभावाला आवर घालण्याच्या स्टॅलीनच्या भूमिकेची ह्या निमित्तानं लोकांना आठवणच करून देण्यात येत होती. 'प्रत्येक कामगाराला मतस्वातंत्र्याचा अधिकार आहे. आणि एके दिवशी हा अधिकार आपण घटनेतही समाविष्ट करू' विशेनव्हस्कीनं त्याच्या तोंडी, त्या नाटकात, घातलेली ही वाक्यं अत्यंत अचूक ठरत होती. ह्या शब्दांचा अर्थच मुळी स्पष्ट होता. जेव्हा तो पेट्रोग्राडच्या रक्षणासाठी गोऱ्या सैनिकांविरुद्ध लढत होता तेव्हाच भावी लोकशाहीचे विचार त्याच्या मनात तरळत होते. खरं तर ती केवढी अर्थपूर्ण आणि वास्तववादी विचारसरणी होती आणि त्यालाच ते 'अडाण्यांची (Proleterait) हुकूमशाही' म्हणून हिणवत होते.

आणि त्या दृश्यातसुद्धा त्याला एका मित्राबरोबर दाखवून व्हिर्तानं खूपच समंजसता दाखवली होती. सगळेचजण नेहमीच अत्यंत अप्रामाणिक आणि दुतोंडे असतात. त्यामुळे स्टॅलिनला तसा जवळचा आणि निष्ठावान मित्रही अद्याप मिळाला नव्हता. आता चित्रपटात का होईना त्याला एक सच्चा आणि निःस्वार्थी मित्र मिळाला होता. ज्याच्याजवळ तो रात्री बेरात्री मनात उद्भवणारे अगदी खाजगी विचारसुद्धा तो सहज उघड करून सांगू शकत होता. स्टॅलिनच्या दृष्टीनं हीच एक चांगली गोष्ट होती.

पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे सामान्य लोकांचं त्याच्यावर अलोट प्रेम होतं. आणि नुसतच प्रेम नव्हतं तर ते त्याला समजावूनदेखील घेत.

वृत्तपत्रांतल्या बातम्या–
त्याच्यावरच्या सिनेमांना लोटणारी गर्दी,
आणि वाढदिवसानिमित्त त्याला मिळालेल्या भेटींचं भव्य प्रदर्शन,
या साऱ्यांतून हीच भावना स्पष्ट होत होती. त्याचा वाढदिवस ही लोकांच्या दृष्टीनं एक अपूर्व घटना आहे. ह्या विचारानंच तो खूष झाला होता.
सरकारी कर्मचाऱ्यांच्या सदिच्छा.
शिक्षणसंस्थांच्या शुभेच्छा.
कारखान्यांच्या सदिच्छा.
खाजगी व्यक्तींचे अभिनंदनपर संदेश.

ह्या साऱ्यांचाच इतका वर्षाव होत होता की, प्रावदानं शुभेच्छांचेच दोन खास कॉलम छापण्याची परवानगीच त्याच्याकडे मागितली होती. आणि आता त्या वर्षानुवर्षे छापूनही उरतील. आणि तसं करण्यात धोका तर कुठलाच नव्हता!

आणि त्याला भेटी तर इतक्या म्हणून आल्या होत्या की, क्रान्तीच्या वस्तुसंग्रहालयाच्या तीन भव्य दालनांतही त्या मावल्या नव्हत्या. स्टॅलिन मुद्दामच रात्रीच ते प्रदर्शन बघायला गेला. त्यामुळे दिवसभर लोकांना ते मनमोकळेपणी पाहाता यावं म्हणून! जगातल्या असंख्य उत्तमोत्तम कलाकारांच्या कलेचं प्रदर्शनच जणू तिथे मांडण्यात आलं होतं! पण ते वातावरण त्याला मात्र भलतंच एकाकी आणि उदासीन वाटत होतं. तो स्वतःलाच विचारत होता, या साऱ्याचा

त्याला उपयोग काय ? आणि म्हणूनच त्या भेटींनी त्याला एकदम कंटाळा आणला. साऱ्याचाच त्याला मनस्वी वीट आला आणि तेवढ्यात त्याला काहीतरी आठवलं आणि लगेच तो ते विसरलाही! अलीकडे त्याच्या बाबतीत हे नेहमीच घडतं. आणि एकदा विसरलेली गोष्ट त्याला चटकन आठवतही नाही. आणि असं झालं की, तो आणखीनच अस्वस्थ होतो. त्यानं त्या तिन्ही दालनांचा कुठेही न रेंगाळता एक फेरफटका मारला. अखेर एका प्रचंड टेलिव्हिजन सेट-जवळ येऊन तो थबकला. सेटवर अक्षरं कोरली होती.

' महान स्टॅलिनला--
सुरक्षा दलातील कर्मचाऱ्यांकडून '

मॅन्व्हरीनो लॅबोरेटरीनं सोविएत रशियात बनवलेला आजपर्यंतचा तो सर्वांत मोठा (आणि एकुलता एक) टेलिव्हिजन सेट होता. त्यानं तिकडे क्षणभरच पाहिलं. तो मागे फिरला आणि सरळ त्या प्रदर्शना-मधून बाहेर पडला, तर त्याच्या आयुष्यातली आणखी एक महान घटना त्याला आणखी विमनस्क करूनच, पार पडली. प्रदर्शन पाहून आल्यावर कोणतं तरी प्रचंड आणि अनिश्चित दडपण त्याच्या मना-वर आलं आणि तेच त्याला आता सतावू लागलं.

लोकांचं त्याच्यावर प्रेम आहे हे जरी, कितीही खरं असलं तरी लोकसुद्धा अनेक दुर्गुणांनी बरबटलेलेच होते. आपल्या असंख्य चुकांनी घायाळ झाले होते. तो ह्यातून त्यांना कसा काय सुधारू शकणार होता ?

जर ते निर्दय नोकरशहा आडवे आले नसते,
पक्षात आढ्यताखोर उच्चपदस्थच नसते,
लोकांना संघटित करून मार्गदर्शन करण्यात उणीव पडली नसती.
पक्षसदस्यांना योग्य तसे प्रशिक्षित करण्यात अपयश आलं नसतं.
प्रकल्पांच्या उभारणीचा वेग मंदावला नसता,
उद्योगधंद्यांतले हितसंबंधी आडवे आले नसते,
नकली गोष्टींचं उत्पादनच झालं नसतं,
एकूण नियोजनाची आखणीच चुकली नसती,
यांत्रिकीकरणाला विरोध झाला नसता,
शहरं सोडून मागास भागात जाऊन काम करायला तरुणांनी विरोध केला नसता.
हंगामात धान्याची नासधूस झाली नसती,
लाचखोरी, भुरट्या चोऱ्या, फसवेगिरी यांना आळा बसला असता
मजुरांच्या छावण्यात नासधूस झाली नसती.
पोलिसांनी सौजन्य दाखवलं नसतं.
घरबांधणीत खाबुगिरी झाली नसती,
बेसुमार काळाबाजार, साठेबाजी दिसली नसती,
तरुण पिढी हाताबाहेर गेली नसती,
तक्रारखोर लोक झाले नसते.
लेखकांनी उपरोधिक गलिच्छ विचारप्रवर्तन केलं नसतं.
काही चित्रपटांनी अपायकारक परिणाम केला नसता.

हे सारंऽ सारंऽच झालं नसतं ना तर मात्र साम्यवाद कधीच आला असता.

नाही ! लोकांना अजूनही बऱ्याच गोष्टी कळत नाहीत.

एक्केचाळीसातल्या माघारीची चूक कोणाची ? मग सांगितलं असूनही लोक मरेपर्यंत का लढत राहिले नाहीत ?

खरं तर माघारच कुणी घेतली ?

लोकांनीच माघार घेतली होती !

स्टॅलीननं आठवून पाहिलं तर त्याला नेमकी आठवण झाली ती त्या वेळच्या त्या ऑक्टोबर महिन्यात तो घाईघाईनं पण निरर्थकपणे मॉस्कोबाहेर पडला त्याचीच ! अर्थात याला कुणी पलायन तर म्हणणार नाहीच ! कारण स्टॅलिननं मॉस्कोबाहेर जातानाच आपली जबाबदार माणसं मागे ठेवली होतीच की, आणि शिवाय त्यांना रक्ताच्या अखेरच्या थेंबापर्यंत राजधानी लढवायच्या कठोर सूचनाही दिल्या होत्या ना. पण दुर्दैवाने ह्या विश्वासू माणसांचे पाय ऐनवेळी लटपटू लागले आणि मग त्याला स्वतःलाच परत येऊन सूत्रं हाती घ्यावी लागली होती.

पण नंतर सोळा ऑक्टोबरच्या दुर्दैवी घटनेचा नुसता उल्लेख करणाऱ्यालाही तुरुंगात टाकण्याची आज्ञा त्याने दिली. आणि त्याच वर्षीच्या सात नोव्हेंबरच्या परेडमध्ये सलामी स्वीकारून त्याने तशी स्वतःलाही शिक्षा करून घेतलीच की.

खरं तर त्याच्या आयुष्यातला तो एक भयानक क्षण होता. पूर्वी असाच एक प्रसंग त्याच्यावर ओढवला होता. तेव्हा हद्दपारी भोग-ताना सायबेरीयात तो बर्फात घसरून पडला होता. पण त्यानंतर मात्र निराशेतूनच तो समर्थ होत गेला. शत्रू दाराशी येऊन ठेपला असताना सैनिकांची परेड घेणं म्हणजे काय चेष्टेची बात नव्हती !

पण त्यानंतर मात्र जगातली सर्वश्रेष्ठ व्यक्ती म्हणून जगणं हेही सोपं काम नव्हतं.

पडून पडून कंटाळलेल्या स्टॅलिननं मग स्वतःला एका निरुत्साही विचारांच्या साखळीत गुंतवून घेतलं. त्याचं थकलं, भागलेलं मन मग स्वैर संचार करू लागलं. तो डोळे किलकिले करूनच पहुडला. मग त्याच्या प्रदीर्घ जीवनातल्या तुटक तुटक आठवणींचा चित्रपटच त्याच्या मनःचक्षूपुढे तरळू लागला. कारण काही असो, चांगल्या गोष्टींपेक्षा मनात सलणाऱ्या वाईट वाईट गोष्टींच्या आठवणीच आता त्याच्या मनात उफाळून आल्या. मग त्याला आपल्या जन्म-ग्रामाची--गोरीची--आठवण झाली. पण तीसुद्धा तिथल्या सुंदर सुंदर टेकड्यांची नव्हती, की वळण घेत वाहणाऱ्या नदीच्या सुंदर काठा-सारखी नव्हती. पण ती आठवण मात्र अशा काही घाणेरड्या गोष्टींशी निगडीत होती की, ज्यामुळे त्याला आपल्या जन्म-भूमीलाच मुकावं लागलं होतं. त्यानं अंमळ विचार केला. बरोबर त्याला एकदम आठवलं. सतरा सालच्या एप्रिल महिन्यातच लेनिन पीटर्सबर्गला आला आणि मग स्वतःच्या आत्मविश्वासावर विसंबून त्यानं सारी धोरणंच उलटी पालटी करून टाकली होती. लोकांचा त्यामुळे असाच समज झाला की, स्टॅलिनला अधिकृत पक्षकार्य वाढवायचंय आणि त्यासाठीच हंगामी सरकारशी समझौता कराय-चाय. ह्या साऱ्या प्रकारणानं त्याचं केवढं हसू झालं. जरी त्यांनी त्याची सदोदित हेटाळणी केली, तरीपण अवघड आणि वांझोट्या कामाची जबाबदारी मात्र नेहमी त्याच्यावरच लादली. मग जुलैच्या सहा तारखेला त्याची रवानगी सेंट पॉल आणि सेंट पीटर्सच्या किल्ल्या कडे करण्यात आली. कारण त्याच्या जागी जर झिनोवेव्ह गेला असता तर तिथल्या नौसैनिकांनी शरणागती पत्करली नसतीच तर त्यालाही दगडांनी ठेचून मारला असता. स्टॅलिनच तिथे यशस्वी होऊ शकला. कारण त्यांच्या भाषेत बोलणारा तो एकटाच होता ! तुखाचेव्ह-स्कीनं ढीग गर्जना केल्या होत्या की, स्टॅलीन नसता तर मी वॉर्सा कधीच जिंकून घेतलं असतं ! पण नंतर त्याला ह्या हेटाळणीची मात्र छान किंमत मोजावी लागली.

नाही! आयुष्यभर तो अपयशच पचवत आला. प्रत्येक वेळी कोणी ना कोणी त्याच्या मार्गात आडवा आला. एकापासून सुटका करून घ्यावी, तो दुसरा कोणीतरी तयार असेच!

तेवढ्यात दारावर टकटक झाली. (खरं तर थाप पडली हा नेहमीचा योग्य शब्द असेल तर दारावर कुत्र्यानं पंजा मारावा तशी कोणीतरी खुडबूड केली असं म्हणायला हवं) त्यानं कोचाच्या बाजूचंच एक बटण दाबलं. कुलूपाचा आवाज झाला. दारावर पडदा तर नव्हताच. (स्टॅलिनला पडद्यांचा किंवा लपता येण्यासारख्या तत्सम कुठल्याही गोष्टीचा तिटकारा होता!) दाराला एक लहानशी फट पडली दारातनं एक चेहरा डोकावला. अजूनही तरुण दिसणाऱ्या त्या व्यक्तीच्या डोक्यावरचे केस विरळ झालेले दिसत होते. तोच स्टॅलिनचा इमान आणि निष्ठावान सेवक पॉस्किओबिशेव होता. (उंटाच्या) लोकरीची शाल पांघरून पहुडलेल्या आपल्या धन्याला पाहून तो क्षणभर दचकलाच, पण प्रकृतीची सरळ सरळ चौकशी करायचं टाकून तो हलकेच म्हणाला,

तुम्ही अबाकुमोव्हला अडीचला बोलावलं होतंत. आत्ताच त्याला भेटू इच्छिता का?

स्टॅलिननं वरच्या खिशाचं बटण उघडलं, मग त्यानं एक साखळीचं घड्याळ काढून पाहिलं. त्याच्या वयाच्या चारचौघांसारखंच त्यालाही मनगटी घड्याळ पेलत नसे.

अजूनही दोन वाजायचे होते. रात्रीचेच. आत्ताच उठून, कपडेच चढवून अभ्यासिकेत भेटायला जायच्या मूडामध्ये तो नव्हता. पण लोकांनाही त्याला ताळ्याबाहेर जाऊ द्यायचं नव्हतं. नाही तर जरा कुठे असे आपण लगाम सैल सोडावेत की, मग त्यांना वाटायला लागतं की, ह्याची घोड्यावरची मांडच सुटली आहे.

किलकिल्या नजरेनंच त्यानं पाहिलं आणि शुष्क स्वरात तो म्हणाला.

'पाहूयात! अजून काही नक्की नाही! मलाही तसं माहीत नाही! पण त्याला मात्र येऊ देत! तो थोडा थांबेल!

पॉस्क्रिओबिशेवनं तिनदा मान झुकवली. (खरं तर आपली तिनदा हलवलेली बरी म्हणून तिनदा) त्याला एवढं कळून चुकलं होतं की, एखाद्या आज्ञाधारक शाळकरी मुलासारखं ऐकण्यानी वागण्यातच इथे त्याचं हित होतं. आणि स्थानही बळकट राहतं. क्षणभर तो तिथेच घुटमळला. आणि गंभीरपणेच तो म्हणाला,

आणि काही करायचंय का?

स्टॅलिननं क्षणभर खेदानंच त्या प्राण्याकडे रोखून पाहिलं. तसा पॉस्क्रिओबिशेव एक खालच्या दर्जाचाच नोकर होता. त्यामुळे त्याला मित्रासारखं वागवणंही स्टॅलिनला शक्य नव्हतं. तो ओठातल्या ओठांतच पुटपुटला,

'बस्स! ठीक आहे, साशा!'

पॉस्क्रिओबिशेवनं पुन्हा एकदा मान हलवली. दारातनं ओणवलेलं आपलं डोकं मागे घेतलं आणि मग बाहेरून दारही घट्ट लावलं.

स्टॅलिननं आणखी एक बटन दाबलं आणि बसल्या जागेतनंच संरक्षक कुलूप लावून टाकलं. गळ्याभोवतीची शाल त्यानं हातांनी आवळून धरली आणि तो कुशीवर वळला.

तेवढ्यात, तिथल्याच एका लहानशा टेबलावर त्याला एक भिक्कार पुस्तक दिसलं. पुस्तकाला काळं-तांबडं कव्हर होतं. स्टॅलिनला अचानक आठवलं. त्याच्या मनावर ह्याच पुस्तकानं केवढं मोठं दडपण आणलं होतं. ह्याच पुस्तकानं त्याच्या वाढदिवसाचा विचका करून टाकला, आणि अगदी आत्तासुद्धा तेच त्याच्याकडे टेबलावरूनच डोळे वटारून पाहतंय. टीटो! ह्याच तो माणूस जो अजूनही त्याच्या मार्गात आडवा येतोय. आणि त्याच्यापासनं अद्यापं स्टॅलिनची तशी सुटकाही होत नाहीयेय.

ह्या अस्तनीतल्या निखाऱ्याबद्दल स्टॅलिनचे अंदाज एवढे कसे काय बुवा चुकले? ते महान दिवस. छत्तीस–सदतीसातले. तेव्हा त्यांनी इतक्या जणांची डोकी उडवली! पण टीटोला मात्र त्यांनी तसाच सोडून दिला.

स्टॅलिननं क्षणभरच एक निःश्वास टाकला. तो कोचावरून उठला. त्यानं आपलं डोकं आपल्या हातांनीच गच्च आवळून धरलं. त्याचे किंचित भुरे केस कधीच पिकायला लागले होते, आणि विरळपण होत होते. त्याच्या विरळ होणाऱ्या केसांनीच केलेल्या त्याच्या मानखंडनेनं तो आता पुरता व्यथित झाला. क्षणभरच. एखाद्या आख्यायिकेतल्या नायकासारखा, हायड्राच्यावेलाच्या, फांद्या छाटाव्यात तशीच तो आयुष्यभर दुसऱ्यांची डोकी उडवत राहिला. त्यानं मारलेल्या माणसांच्या प्रेतांचा नुसता ढीगच लावला असता तर तो एलब्रुझ पर्वताहूनही उंच झाला असता. पण आत्ता मात्र तो एका किरकोळ (ढिगाऱ्यावर) गोष्टीवर अडखळला. आणि ती म्हणजे टीटो!

जोसेफ स्टॅलिनला जशास तसा जोड भेटला होता, जोसेफ ब्रॉझ टीटो!

केरेन्स्की अजूनही कुठेतरी जिवंत आहे, ह्या प्रवादाचीसुद्धा स्टॅलिननं कधी काळजी केली नाही. दुसरा निकोलस आणि कोलचॅक जरी आत्ता थडग्यांतून उठून वर आले, तरी त्यानं त्यांची फिकीर केली नसती. आणि ते तर त्याचे उघड उघड शत्रू!

नवा आणि वेगळा असा समाजवादी ब्रॅंड देण्याचा कठोरपणा मुळी त्यांच्यात मुळात असा नव्हताच.

आणखी चांगला समाजवाद!...म्हणजेच, वेगळ्या शब्दांत सांगायचे म्हणजे स्टॅलिनहून वेगळा! ही साली अनौरसी अवलाद! स्टॅलिनशिवाय समाजवाद हे कधी शक्य तरी आहे का?

एखाद्या थातुरमातुर शस्त्रक्रिया करण्यात आयुष्य घालवलेल्या गांवढळ डॉक्टरनं, नुकत्याच परीक्षा पास झालेल्या तरुण डॉक्टरणीकडे ज्या दृष्टीनं पाहवं ना! तस्साच स्टॅलिनचा टीटोकडे पाहायचा दृष्टिकोण होता!

आतापर्यंत तीन वेळा त्यांनी लेनिनच्या लेखसंग्रहाच्या आवृत्या काढल्या आणि दोनदा त्यांना मार्क्स आणि एंजल्सचं लिखाण पुनरसंपादित करावं लागलं! ज्यांनी ज्यांनी मतभेद दर्शविले, किंवा आधीच्या आवृत्त्यांवर टिपणी करताना समाजवादाचे नवे नवे मार्ग पुरस्कारले, ते सारे कधीच मृत्युमुखी पडले होते! आणि आता जेव्हा सायबेरियातल्या निर्मनुष्य कानाकोपऱ्यांतून नुस्ती कुरबुरसुद्धा ऐकू येत नसताना हा गाढव टीटो आणि त्याचा खुशमस्कऱ्या साथीदार कार्देज, 'तुम्ही वेगळा समाजवादी मार्ग अवलंबायला हवा होता, असं सांगून पळवाट शोधतात!

स्टॅलिनला अचानक जाणवलं. त्याची छाती विलक्षण धडधडत्येय. असं त्याच्याबाबतीत क्वचितच घडत असे. आणि मग अभावितपणे त्याचं सारं अंगच पिळवटून जाई. मग त्यानं एक प्रदीर्घ श्वास घेतला आणि आपल्या चेहऱ्यावरून आणि मिशांवरून हात फिरवला. पण नाही! हे चालणार नाही! टीटो नावाच्या इसमानं त्याचं स्वास्थ्य चोरावं, अन्नावरची इच्छाच घालवावी आणि झोप उडवावी हे तो चालवून घेणार नाही!

त्याच्या नजरेतली, आतापर्यंतची धूसरता किंचित निवळली. मग परत त्याला दिसलं तेच ते तांबड्या कव्हरचं पुस्तक. तसं त्या बिचाऱ्या पुस्तकाचं तरी काय चूक होतं म्हणा! म्हणूनच त्याने ते

आता उचलले. टेकायला त्याने आणखी दोन उशा घेतल्या. मग मागे रेलून तो थोडावेळ तसाच पडून राहिला. त्याने पाहिले रेनॉड डी जुवेनेलचे ते पुस्तक होतं,

'टीटो : देशद्रोह्यांचा सूत्रधार'

त्याच पुस्तकाच्या अनेक युरोपियन भाषांत लक्षावधी प्रती प्रसिद्ध झाल्या होत्या. वस्तुनिष्ठ विचारांच्या पण खानदानी नाव धारण करणाऱ्या ह्या फ्रेंच लेखकामुळे तो ह्या साऱ्या प्रकरणात अगदी अलिप्त असल्याचा भास निर्माण व्हावा, ही त्याच्या– स्टॅलिनच्या– दृष्टीनं फार चांगली गोष्ट होती. काही दिवसांपूर्वीच त्याने ते अगदी काळजीपूर्वक वाचले होते आणि त्याच्या आवडीच्या इतर पुस्तकांप्रमाणेच त्याने ते आपल्या सहज हाताला येईल असेच ठेवले होते. तसे बघायला गेले तर, ह्या पुस्तकातूनच कोटचवधी लोकांना एका बढाईखोर, अहंमन्य, निर्दय, भित्र्या, दुष्ट, लबाड, तिरस्करणीय, जुलमी हुकूमशहाचा, सत्ताधीशाचा, अडाण्याचा परिचय होऊन, त्यांचे डोळे उघडणार होते. पाश्चिमात्यांपैकी आंद्रे मार्टीसारख्या मूर्ख म्हाताऱ्या साम्यवाद्यांना आता त्याने आपल्या गोटात वळवलंय ! खरं तर टिटोला पाठिंबा दिल्याबद्दल त्याला कधीच पक्षातून लाथ मारून बाहेर काढायला हवं होतं !

त्यात, त्या पुस्तकाची काही पानं चाळली. हां. इथेच. इथेच ते ऽ– हे सारं वाचल्यावर टीटोला वीरपुरुष तरी कोण म्हणेल ? दोन वेळा भ्याडागत त्याने जर्मनांना शरणागती देऊ केली. पण त्याच्या सेनापतीनं, जोव्हॅनोविकनं, त्याला दोन्ही वेळा युद्धाचं अधिपत्य करणं भाग पाडलं. खरं तर तो, जोव्हॅनोविक केवढा उत्कृष्ट आधिकारी, पण त्यालाही त्यांनी टीटोनं, ठार मारलं. शिवाय तो पेट्रिसेव्हिक ! त्याचा, स्टॅलिनवरील त्याच्या निष्ठेबद्दल खून करण्यात आला. धन्य तो पेट्रिसेव्हिक ! नेहमीच कुणीतरी चांगल्या चांगल्या माणसांची हत्या करत राहिले आणि स्टॅलिनच्या नशिबात वाईटांना शिक्षा करणं आलं !

हे काही त्याच्या मनचं नव्हतं. सारं त्या पुस्तकातच होतं. टीटो हा ब्रिटिशांचा हस्तक असला पाहिजे ! आपल्या अंडरवेअर, ब्रिटीश राजघराण्याच्या सन्मान फितांनी (enblem) सजवल्याचा, त्याला कसा अभिमान वाटतो ! गोअरींग सारखाच तोही कसा, किळसवाण्या व्यक्तिमत्त्वाचा आहे ! त्याची सगळी बोटं, हिऱ्याच्या अंगठ्यांनी, कशी मढवलेली असतात ! तो नेहमी आपल्या छातीवर लष्करी शौर्यपदकं कशी दिमाखानं मिरवतो ! (काडीमात्र लष्करी कर्तृत्व नसलेल्या माणसाचा केवढा हा केविलवाणा दिमाख ! ) हे सारं सारं त्या पुस्तकातच दिलं आहे.

केवढं वास्तववादी आणि प्रांजळ पुस्तक आहे हे ! शिवाय टीटो षंढसुद्धा नाही का ? लेखकानं ह्या गोष्टीचासुद्धा उल्लेख करायलाच हवा होता.

'युगोस्लाव कम्युनिस्ट पार्टीचा' साम्यवादी पक्षाचा, सारा कारभारच खुनी आणि हेरांच्या ताब्यात गेला आहे.'

'वेलाकुन आणि ट्राइको कोस्तोव्हनं पुरस्कार केला म्हणून तर तेव्हा टीटो पक्ष नेता झाला.'

कोस्तोव्ह ! स्टॅलिन नुसत्या त्या नावानंच शहारला. त्यानं झटक्यात आपले बूट उडवले ! जणू तो कोस्तोव्हला तोंडावरच लाथाडायला निघाला होता ! मग आपण योग्य तेच केलं या भावनेनंच त्याच्या करड्या भुवया एकदम आक्रसल्या. जणू त्यानं कोस्तोव्हला धडाच शिकवला होता ! त्या डुकरानं त्याला केवढा त्रास दिला होता !

सारंच त्या घटनेनंतर आता त्याच्या लक्षात आलं होतं ! त्या बदमाशांचे हात कोठवर म्हणून पोहोचले होते ! ज्या ज्या मार्गांनी त्यांनी आपलं खरं रूप दडवलं होतं ! सारं आताच स्पष्ट दिसावं हा मोठा मजेशीर अनुभव होता ! सदतीसमध्ये एकदा कोस्तोव्हनं समाजवादी न्यायालयाच्या न्यायाधीशांची उघड उघड निंदा केली. स्टॅलिननं कूनला मग त्याच्या जागी नेमलं ! खरं तर त्यानं आजवर ज्या ज्या प्रकरणांच्या चौकशा करविल्या त्या प्रत्येकात स्टॅलिननं आपल्या साऱ्या शत्रूंना वठणीवर आणलं आणि त्यांच्या गुन्ह्यांचे कबुली जबाब देणं त्यांना भाग पाडलं !

ह्या साऱ्याच पार्श्वभूमीवर ह्यांनी मात्र कोस्तोव्हच्या चौकशीचे कसे तीन-तेरा वाजविले ! चौकशी करणारेच ह्या साऱ्या प्रकरणात मूर्ख ठरले गेलें. चौकशीच्या वेळी त्यानं कबुलीजबाब देऊन टाकला आणि जाहीर सुनावणीच्या वेळी मात्र सारे आरोप नाकारले. आपल्या अनुभवी प्रश्नकर्त्यांना फसवण्याची कसली ही सवंग युक्ती ! अगदी परदेशी पत्रकारांपुढे ! एखाद्या पक्षसदस्यानंवागण्याची वाहरे वा ऽ रीत ! अडाणी लोकांना कोस्तोव्हनं घालून दिलेलं हे उदाहरण ! एकंदरीत काय, त्याचा मृत्यू अटळच होता. मग कमीत कमी पार्टीचं भलं करून तरी मरायचं !

स्टॅलिननं हातातलं पुस्तक भिरकावलं. हा खोटारडा, भ्याड (टीटो) आता बास झाला ! बरंच काम अजून पडलं होतं. सारं जग जरी आता शांतपणे झोपलं असलं, तरी राष्ट्रपिता म्हणून जागत राहणं त्याला भाग होतं.

तो उठला. थोडसं वाकूनच खोलीतल्या दुसऱ्या दाराकडे चालत गेला. मगाशी पॅस्क्रिओबिशेव्हनं उघडलेलं ते हे दार नव्हतं. त्यानं ते उघडलं. मागे वळून बंद केलं. मग तो एका हवेशीर पॅसेजमध्ये जड पावलांनी पुढे गेला. इथेही त्याच्या खोलीसारख्याच खिडक्या नव्हत्या. फक्त प्रकाशासाठी एक झरोका मात्र होता. भिंतीवर तिरकस बसवलेल्या आरशांजवळून तो पुढे गेला. तेव्हा पुढच्या प्रतिक्षाकक्षाचं प्रतिबिंब त्यात पडलेलं त्याला दिसलं. तो सरळ आपल्या शय्यागृहाकडे चालत गेला. ही खोलीसुद्धा तशीच अरुंद, बैठी, खिडक्या नसलेली होती. पण ती वातानुकुलीत करण्यात आली होती. खोलीच्या दगडी भिंती पोलादी कवचांनी सुरक्षित केल्या होत्या. आणि त्यावर ओकची तावदानं शोभेसाठी लावली होती.

आपल्या पट्ट्यालाच लावलेल्या एका लहानशा किल्लीनं स्टॅलिननं एका मोठ्या बाटलीचं लोखंडी झाकण उघडलं. मग त्यातलं आपलं आवडतं पेय त्यानं पेलाभर ओतून घेतलं. परत ते पात्र त्यानं बंद करून टाकलं.

तो आरशाकडे चालत गेला.

आपल्या धारदार, करारी आणि प्रामाणिक नजरेनं त्यानं स्वतःकडेच रोखून पाहिलं. ही भयंकर नजरच त्याच्या अनेक मंत्र्यांना गर्भगळीत करून सोडत असे. ती एक सरळ सैनिकी नजर होती. त्याला आता कपडे चढवायचे होते. म्हणूनच त्यानं आपल्या जॉर्जिअन नोकरासाठी बेल दाबली.

प्रसंग कितीही साधा असो, प्रत्येक वेळी तो भवितव्य घडविणाऱ्यांच्या भूमिकेतच वावरत असे.

त्याच्या पोलादी मनोबलाला,
किंवा खंबीर निर्धाराला
हे साजेसंच होतं !

□ □

# माफिया

माफिया संघटनेची पाळंमुळं फार दूरवर पसरलेली आहेत. अनेक आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी संघटना माफियाच्या इशाऱ्यावर काम करतात. फ्रँकफुर्ट हे गेल्या पाच वर्षांत पुढे आलेले आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीतील महत्त्वाचं केंद्र.

जोसिप टच्यूदिक हा २९ वर्षे वयाचा 'प्रोफेशनल'. म्हणजे पैसे दिले की, वाटेल ते बेकायदेशीर काम करायला तयार. मुक्काम फ्रँकफुर्ट. अशाच एका संध्याकाळी पॉश क्लबमध्ये संगीताच्या धूनवर एकटाच नाचत असतो. एकाएकी एकजण त्याच्या अंगावर धावून जातो, छातीत सुऱ्याचे दहाबारा वार करतो. क्लबातील मेंबर्स बघत असतानाच आला तसा नाहीसा होतो. टच्यूदिक रक्ताच्या थारोळ्यात मरून पडलेला.

ही घटना घडते ३० जानेवारी ७३ रोजी. जर्मन गुप्तचर पोलीस अतिशय उच्च पातळीवरून या प्रकरणाचा तपास सुरू करतात. दोन वर्षांनंतर तपास लागतो. रोममधील पाओलो लिप्रा या हेअर ड्रेसरला माफियातर्फे जोसिप टच्यूदिक याचा खून करण्याची कामगिरी सोपविण्यात आलेली असल्याचे निष्पन्न होते. लिप्राला अटक होते. फ्रँकफुर्ट कोर्टात खुनाचा खटला चालू आहे.

गुन्हेगार नसल्याची बाजू लिप्राने मांडली आहे. टच्यूदिक जखमी झाल्यावर त्याला हलविण्यास मदत केली असे तो म्हणतो. त्याच्याविरुद्ध निश्चित स्वरूपाचा गुन्हा सिद्ध करता आलेला नाही. ज्या ऐंशी लोकांनी लिप्राला पाहिले अशी साक्ष दिली होती त्यांनी आपली साक्ष बदलण्यास सुरुवात केलेली आहे. जवळ जवळ प्रत्येकाची साक्ष "आम्ही काहीच बघितले नाही" अशी झाली आहे. त्यामुळे गुन्हा सिद्ध होणे कठीणच आहे.

सर्व साक्षीदार असे बदलले का? पोलिसांपुढे प्रश्न आहे. बहुधा सूड घेतला जाण्याची शक्यता आहे व तशा धमक्या साक्षीदारांना मिळाल्या असाव्यात असा पोलिसांचा अंदाज.

जोसिप टच्यूदिक याचा खून का झाला? हे अद्यापि रहस्यच आहे. परंतु पब्लिक प्रॉसिक्यूटर हेन्रीच व सी. आय. डी. डायरेक्टर वेरनेर यांनी केलेल्या तपासात आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी पद्धतीबाबत बरीच माहिती उजेडात आली आहे.

पश्चिम जर्मनीतही सध्या लहान प्रमाणावर संघटित गुन्हेगारी सुरू झाली आहे. माफियाचे वर्चस्व आहेच.

अमेरिकेतील गुन्हेगारी टोळ्यांच्या मानाने पश्चिम जर्मनीतील ही गुन्हेगारी, त्या मानाने फार लहान प्रमाणावर असली, तरी काम करण्याची पद्धत मात्र एकच. अर्थात त्याला कारण माफियाचे वर्चस्व. या गुन्हेगारी टोळ्यांचे एकच वैशिष्टच म्हणजे तिचा प्रमुख अतिशय क्रूर, उलट्या काळजाचा असतो. एकदा या गुन्हेगारी संघटनांशी दुरूनही का होईना पण संबंध आला की, तो तोडू म्हणता तुटत नाही. या दादा लोकांच्या इशाऱ्यावर न नाचणाऱ्या, गुन्हेगारी जगाशी संबंध तोडू इच्छिणाऱ्या व्यक्तीला एकच शिक्षा, ती म्हणजे मृत्युदंड. इतरांना दहशत बसावी म्हणून अतिशय क्रूरतेने मिळालेली ही शिक्षा.

सी. आय. डी. डायरेक्टर वारनेर यांच्या अनुभवानुसार पश्चिम जर्मनीतील फ्रँकफुर्ट, हॅम्बुर्ग, म्यूनिच येथे खुनाचे प्रमाण वाढले आहे. हे खून वैयक्तिक कारणामुळे झालेले नसतात. त्यामागे असते संघटित गुन्हेगारीतील तत्त्व. वारनेर यांच्या सांगण्याप्रमाणे सध्या रस्त्याच्या कडेला, गावाबाहेर, झाडाखाली, पुलाजवळ, चर्चयार्डात एखादे प्रेत सापडते. शॉटगनने गोळ्या झाडलेल्या असतात. दोन्ही हात व चेहरा जाळलेला असतो. त्यामुळे ओळख पटत नाही.

फ्रँकफुर्टमधील स्टेशनजवळील मोसेलस्ट्रास भाग आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांचा मोठा अड्डा बनलाय. इथे बिन नावाचे लोक राहतात. आज एक नाव तर उद्या दुसरं. याच भागात वेश्याव्यवसाय जोरात चालतो. त्यांचे दलाल असतात. त्यांचे रक्षण करणारे प्रोफेशनल्स असतात. याच भागात परकीयांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असते. इथे चाकू-सुऱ्यांपासून लाईट मशिनगनपर्यंत वाटेल ती शस्त्रे मिळतात. निरनिराळे ड्रग्ज्, अंमली पदार्थ मिळतात. पासपोर्ट बदलून मिळतो. मोटारीचा परवाना मिळतो. खून केल्यानंतर पोलिसांपासून दडून राहण्यासाठी, नवे जीवन सुरू करण्यासाठी नवे नाव, नवे गाव, नवे काम मिळवून देण्यात येते. त्याची किंमत म्हणजे अर्थात जन्मभर बॉसचे हुकूम पाळावे लागतात. हिरे-मोती यांचा व्यापार चालतो. पळविलेल्या मौल्यवान वस्तूही इथेच विकल्या जातात. या टोळ्यांचे बॉस दूर कुठेतरी रोम, पॅरिस, मार्सिलिस, नेपल्स्, ॲम्स्टरडॅम इथे राहून कारभार चालवितात.

जोसिप टच्यूदिक याच्या खुनाचे प्रकरण सध्या गाजते आहे. लिप्रा याच्यावर खुनाचा आरोप ठेवण्यात आला असून खटला चालू आहे. सी. आय. डी. डायरेक्टर बारनेर यांच्या तपासानुसार टच्यूदिक याचा खून 'ए. एम्. ओ. आर. गँग'ने केला असावा. AMOR गँग, म्हणजेच ROME गँग. रोममधील माफिया गँगची शाखा. माफिया गँगने टच्यूदिकचा खून केला, असं निश्चितपणे लक्षात आलेलं असलं तरी, त्यामागचं कारण कळालेलं नाही. स्वीस माफिया बॉस फ्रँको याचा टच्यूदिकने खून केला. रोम माफिया बॉस कार्लो याचा खून करण्याचे काम टच्यूदिकला मिळाले असावे किंवा ॲम्स्टरडॅम येथील दरोड्यातील हिरे टच्यूदिकने माफिया गँगला न देता 'कोसा-नोस्ट्रा' या अमेरिकन संघटनेला विकले, म्हणून त्याचा खून झाला असावा, असा पोलिसांचा अंदाज.

सी. आय्. डी. डायरेक्टर वॉरनेर यांच्या पत्नीला खुनाच्या अनेक धमक्या देण्यात आल्या आहेत.

फ्रँकफुर्ट आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांचा मोठा अड्डा बनला आहे. तिथे चोरलेला माल विकत घेतला जातो व विकला जातो. या टोळ्यांचे अनेक राष्ट्रांतील राजकीय पक्षांशी संबंध असतात. माफिया गँगमागे कोणत्या बड्या व्यक्ती आहेत त्यांची आम्हाला माहिती आहे, परंतु पुरावे नसल्यामुळे काहीच करता येत नाही, हे वारनेर यांचे दुःख.

आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीच्या जगात 'माफिया' या नावाला अतिशय जबरदस्त वजन आहे. विश्वास आहे. त्याचा बरोबर फायदा घेऊन एफ्. बी. आय्. ने वॉशिंग्टनमध्ये १०० गुन्हेगारांना एकदम एकत्र पकडण्यात यश मिळविलं. अतिशय हुशारीने

एफ्. बी. आय्. ने केलेली ही सर्वांत मोठी धडपड.

वॉशिंग्टनमधील भरवस्तीतील एक मोठे गुदाम. इटालियन माफिया बॉस 'डॉन'चं हे केंद्र म्हणून गेल्या दोन वर्षांत गुन्हेगारांत प्रसिद्ध झालेलं. अनेक धाडसी दरोडयांतील चोरलेल्या वस्तू या गुदामात विकण्यात येतात. त्यांचं पुढे काय होतं कुणाला कळत नाही. पण दरोडा घालणाऱ्याला त्याचे पैसे मिळतात.

'डॉन' हा एफ्. बी. आय्.चा अधिकारी. वॉशिंग्टन पोलीस व एफ्. बी. आय्. यांनी वॉशिंग्टनमधील आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांना पकडण्यासाठी टाकलेले जाळे. 'डॉन'चे मोजकेच सहकारी. सर्वजण एफ्. बी. आय्.चे डिटेक्टिव्हज्. परंतु ते एफ्. बी. आय्. चे काम बघतात, हे फार थोडयांना माहिती असतं. ही सर्व मंडळी इटालियन नावं धारण करतात. इटालियन भाषा शिकतात.

इटालिअन माफिया बॉस 'डॉन' उभी करण्याची कल्पना वॉशिंग्टन पोलीस खात्यातील लेफ्टनंट ऑस्कॉट यांची. तीन हजार टाईपरायटर्सची चोरी होते. परंतु तपास लागत नाही. त्यावेळी हे टाईपरायटर्स परत मिळविण्यासाठी बनावट गँग उभी करण्याची कल्पना सुचते. तिचा गुन्हेगारांची माहिती मिळविण्यासाठी खूप उपयोग होईल, असे लक्षात आल्यानंतर एफ्. बी. आय्. च्या मदतीने ही कल्पना प्रत्यक्षात आणण्यात येते.

वॉशिंग्टनमधील 'डॉन'च्या गुदामात चोरीचा प्रचंड माल येऊ लागतो. त्यांत घडयाळे, टाईपरायटर्स, टी. व्ही. सेटस्, कॅलक्युलेटर्स, इलेक्ट्रोकार्डिओग्रॅम मशीन, मोटारी, बंदुका असतात. गुदामातील प्रत्येक संभाषणाची टेप घेण्यात येते, आत येणाऱ्या प्रत्येकाचा फोटो टिपला जातो, त्याची माहिती मिळविली जाते. त्या माहितीच्या आधारावर गुन्हेगार, गुन्हेगारांच्या कामाचे स्वरूप पोलिसांच्या लक्षात येते. २४ लाख डॉलर्सचा माल फक्त ६७ हजार डॉलर्सला विकत घेण्यात येतो.

दोनशे लोकांची यादी तयार करण्यात येते. इटालिन माफिया गँगचा बॉस 'डॉन' सर्वांना पार्टीचे निमंत्रण देतो. पार्टी ऐन रंगात येते. तेवढयात सशस्त्र पोलीस प्रवेश करतात नि उपस्थित असलेल्या १०८ जणांना अटक करतात. त्यात 'डॉन'ही असतो. सूड उगविण्यात येण्याची शक्यता असल्याने डॉन व त्याच्या सहकाऱ्यांची नावे गुप्तच ठेवण्यात आलेली आहेत.

☐ पोलिसांनी 'फाईल' केलेल्या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करून त्यामागचे खळबळजनक सत्य प्रकाशात आणण्याचे श्रेय अमेरिकन वृत्तपत्रे घेत असतात. आपल्याकडे तसा फारसा प्रयत्न होत नाही. तेवढा वेळ नसतो व साधनेही अपुरी असतात. आपल्याकडे प्रसिद्ध होणाऱ्या 'क्राईम न्यूज' या पोलिसांच्या पंचनाम्यावरून उतरविलेल्या असतात. घरी जाण्यापूर्वी आपल्याकडचा क्राईम रिपोर्टर १०० नंबरला फोन करून 'काय कुठे घातपात, अपघात, खून, मारामाऱ्या धरपकड काही आहे का?' असे पोलीस कंट्रोलला विचारतो. असल्यास चार ओळींची बातमी देतो. नसल्याल घरी जाऊन शांतपणे झोपतो. अर्थात यात त्याचा स्वतःचा फारसा दोष असतो असंही नाही. एखाद्या गोष्टीचा सातत्याने पाठपुरावा करणे, पोलिसांच्या पुढे जाऊन काही नवीन माहिती शोधून काढणे यासाठी लागणारा वेळ, पैसा व मुख्य म्हणजे ज्या वर्तमानपत्रात तो काम करतो त्या वर्तमानपत्राचा पूर्ण पाठिंबा व संरक्षण मिळणे आवश्यक असते. पण एखाद्या उत्साही बातमीदाराने काही धाडस करायचे म्हटले, तरी त्याला पुरेसा पाठिंबा व प्रोत्साहन मिळत नाही.

सतत दहा वर्षे एकाच प्रकरणाचा पाठपुरावा करून, पुरावे गोळा करून, एका डॉक्टरने केलेल्या १३ रुग्णांच्या खुनाचे खळबळजनक प्रकरण 'न्यूयॉर्क टाईम्स'ने नुकतेच उजेडात आणले आहे.

न्यूजर्सी येथील, रायव्हर्डेल हॉस्पिटलमध्ये १९६६ साली तेरा रुग्ण एकाएकी मरण पावले. डिसेंबर ६५ ते ऑक्टोबर ६६ मध्ये शस्त्रक्रिया झाल्यानंतर प्रकृती सुधारत असलेले रुग्ण एकाएकी मरण पावल्याच्या १३ केसेस घडल्या. हॉस्पिटलच्या अधिकाऱ्याच्या सांगण्यानुसार सायकोपॅथिक डॉक्टर एक्स् (डॉक्टरचे नाव जाहीर करण्यात आलेले नाही) हे हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या जवळपास कुठेतरी असत. १९६६ मध्ये तेरा रुग्ण अशा तऱ्हेने मरण पावल्यावर एका डॉक्टरला डॉक्टर एक्स्चा संशय आला. त्याने डॉक्टर एक्स् यांचे हॉस्पिटलमधील लॉकर फोडून तपास केला. त्यावेळी 'क्युरर ड्रग'च्या १८ रिकाम्या कुप्या आढळून आल्या. 'क्युरर ड्रगचा' कुत्र्यांवर प्रयोग करण्यासाठी उपयोग केल्याचे डॉक्टरांनी शपथेवर सांगितले. त्यांनी कुणाकडून कुत्री विकत आणली होती त्याची माहिती दिली. जुजबी तपासानंतर हे प्रकरण फाईल करण्यात आले.

परंतु न्यूयॉर्क टाईम्सच्या बातमीदाराला या प्रकरणात कुठेतरी पाणी मुरतंय असा संशय आला. सतत दहा वर्षे पाठपुरावा करून पुरावा गोळा करण्यात आला. त्यावर आधारित सविस्तर बातमीपत्र मागील महिन्यात प्रसिद्ध झाल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणावर पुन्हा एकदा चौकशी सुरू केली आहे.


ज्याच्याकडून कुत्री विकत आणली असे डॉक्टर एक्स यांनी सांगितले होते त्यांच्याकडून त्यांनी कुत्री विकत आणलेली नसल्याचे न्यूयॉर्क टाइम्सने केलेल्या तपासात आढळून आले. डॉक्टर एक्स यांच्या इतर विधानांशी विसंगत असलेला पुरावाही न्यूयॉर्क टाइम्सने पोलिसांच्या हवाली केला आहे.

१९६६ मध्ये पाच रुग्णांचे पोस्टमार्टेम करण्यात आले. त्यांपैकी तीन मयतांच्या शरीराच्या पेशीत 'क्युरर ड्रग'चा अंश असल्याचे निश्चितपणे सिद्ध झाले होते. 'क्युरर ड्रग' हा अतिशय कमी प्रमाणावर वापरला तर त्याचा 'मसल रिलॅक्सट' म्हणून उपयोग होतो. दक्षिण अमेरिकेतील रानटी टोळयात त्याचा विष म्हणून वापर करतात. शस्त्रक्रियेच्या वेळा काही ॲनेस्थेटिस्ट त्याचा वापर करतात. जे १३ रुग्ण अचानकपणे मरण पावले, त्यांच्या शस्त्रक्रियेच्या वेळी 'क्युरर ड्रग' वापरण्यात आलेला नव्हता, अशी हॉस्पिटलमध्ये नोंद आहे.

मरण पावलेले सर्व रुग्ण इतर डॉक्टरांनी शस्त्रक्रिया केलेले होते. आपल्याशिवाय हॉस्पिटलमध्ये इतर कोणत्याच डॉक्टरने शस्त्रक्रिया करू नये, असे डॉक्टर एक्स् यांना वाटत आले आहे. त्यामुळे त्यांनी या रुग्णांना 'क्युरर ड्रग' दिला असावा असे मत त्यांच्या एका सहकाऱ्याने व्यक्त केले आहे. या प्रकरणी पुन्हा एकदा तपास सुरू झालेला असला, तरी डॉक्टर एक्स् यांना आरोपी ठरविण्याइतका पुरावा मिळणे अवघड आहे.

असे असले तरी न्यूयॉर्क टाइम्सने सत्याला वाचा फोडण्याचे वृत्तपत्र म्हणून आपले काम बजाविलेले आहे.

—पी. जे.



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

### तीन : पूर्वारंभ

डॉक्टर परचुरे यांना मदत करण्याचा होकार मी त्या दोघी परचुरे स्त्रियांना सांगितल्यानंतर माझे व त्यांचे बोलणे माझ्या बाजूने बरेच मोकळेपणाने झाले. माहिती मिळवण्यासाठी त्यांना सरळ प्रश्न विचारून माहिती सांगायला लावण्याचा मी प्रयत्न केला. त्या दोघी बायका असूनदेखील जास्ती मुखर–फार बोलणाऱ्या नव्हत्या. दोघी-जणी केवळ मोजके बोलत आहेत असे वाटून मला कधी कधी त्या काही सांगत नसाव्यात अशी शंका येई. पण पुष्कळदा त्यांचे आम्हांला माहीत नाही असे सांगणे निर्मळपणाचे वाटे. डॉक्टरांचे वडीलभाऊ श्री. कृष्णराव परचुरे अजूनही कैदेत आहेत हे ऐकून मला बरेच आश्चर्य वाटले होते. कशाकरता ? काय केले आहे त्यांनी ? त्या दोघीही मला याचे समाधानकारक उत्तर देऊ शकल्या नव्हत्या. श्री. कृष्णराव परचुऱ्यांनीही कबुलीजबाब दिला आहे असे कोणी म्हणत नव्हते. ग्वाल्हेरच्या महाराजांचे वित्तिय व गंगाजळी खात्याचे सचिव असलेले कृष्णराव परचुरे महाराजांचे जवळ जवळ वीस कोटी रुपयांची व्यवस्था व हिशेबाचे दफ्तर सांभाळीत होते. अशा जबाब-दारीचा मनुष्य इतर कोणी कितीही इरेस घातले, आमिष दाखवले, मन वळविले तरी, स्वतः होऊन एकाएकी असली काही अतिरेकी पावले टाकायला तयार होईल अशी शंकासुद्धा घेण्याचे कारण नव्हते. एवढेच काय पण आपल्या धाकट्या भावाने, अगदी तो ग्वाल्हेरच्या हिंदुसभेचा अध्यक्ष असला तरी, त्याचे कोणतेही आक्षेप-जनक रीतीने वागणे खपवून घ्यायला कृष्णराव तयार झाले असतील असे मला मुळीच वाटेना.. डॉक्टर परचुरे यांच्याविषयी बोलताना, आपल्या दिराचे वर्णन करताना, मोठ्या जाऊबाई सौ. परचुऱ्यांनी मला म्हटले होते की, ' भाऊजींच्या बडबडीपुढे हात टेकावे लागतात. त्यांच्या मनात काही राहात नाही–त्यांच्या तोंडात तीळ भिजत नाही. अगदी बायकांच्यावर कडी आहे त्यांची बडबड करण्याच्या बाबतीत. ' दोघा भावांना कोणच्या अपराधासाठी पकडले आहे याबद्दल मी त्या दोघींना विचारले. त्यांनी सांगितले की, पोलिसांनी त्यांना प्रथम सुरक्षा कायद्याखाली डिटेन्शनमध्ये–विरोधात घेतले होते. पकड वॉरंट कसले होते याची त्यांना काही माहिती नव्हती. पुष्कळ दिवसांनी कळले की, त्यांना खुनाच्या आरोपाखाली पकडले आहे. मला एकदा वाटले की, आपण डॉक्टर परचुऱ्यांना जेलमध्ये जाऊन भेटावे, पण मग इतक्यात भेटायला जायचे नाही असेच ठरवले. कुणाच्या लक्षात येण्याच्या आधी बाहेरूनच माहिती मिळेल तितकी मिळवावी असे मी ठरवले. एकदोनदा त्या दोघींनी डॉक्टरांचा मुलगा नीलकंठ, वय वर्षे १७, याला मजकडे पाठवले होते. त्याच्याकडून बरीचशी माहिती मला मिळाली. त्याला पोलिसांनी पकडून ग्वाल्हेरच्या तहसील क्षेत्राच्या ' पोलीस स्टेशन गिर्द ग्वालिअर 'मध्ये अटकेत ठेवले होते. हे पोलीस ठाणे ग्वाल्हेर शहराच्या आग्नेयेला शहराबाहेरच होते. पोलिसांनी नीलकंठला मुंबईस नेऊन वरळीच्या नव्या सी. आय. डी. हेडक्वार्टर बिल्डिंगमधेही काही दिवस ठेवले होते. नीळकंठने मला या दोन्ही ठिकाणची पुष्कळशी माहिती सांगितली. नीळकंठने तेथे पाहिलेल्या–ऐकलेल्या बऱ्याचशा गोष्टी मला अगदी वर्णन करून सांगितल्या. त्यावरून मला पुष्कळशा गोष्टींचा अर्थ–ह्या प्रकरणांतले साक्षीदार–त्यांच्याविषयी माहिती वगैरेची स्पष्ट कल्पना व्हायला लागली. त्याने सांगितले होते की, त्याला पकडताना पोलिसांनी त्याच्या मदतीने डॉक्टरांचे लायसेन्स असलेले पिस्तुल मागून घेतले होते. त्या पिस्तुलावरून पोलिसांनी नीलकंठाला कसल्या कसल्या धमक्या दिल्या

होत्या हेही त्याने मला सांगितले. त्याने मला गुप्त बातमी म्हणून सांगितली की, लष्करच्या जगदीश गोयल नावाच्या एका वैश्य तरुणाला पोलिसांनी झासी येथे खुनाच्या आरोपाखाली पकडले आहे. त्या बातमीचा खात्रीलायक पुरावाही त्याने मला आणून दिला होता. नीळकंठने मला सांगितले की, लष्करच्या एका गंगाधर पटवर्धन नावाच्या मनुष्याबद्दल मी सावधगिरीने राहावे. तो पोलिसांचा 'मुखबिर'–पोलिसांना बातम्या देणारा आहे. ह्या गंगाधर पटवर्धनचे नाव मला विमा एजंट व मराठी पुस्तके विकणारा म्हणून माहीतही होते. नीळकंठच्या सांगण्यावरून मला कळले की, पोलिसांच्या म्हणण्याप्रमाणे जगदीश गोयलने नथूराम गोडसेला पिस्तुल विकले होते. नीळकंठच्या शब्दांत, 'अरे, हा जगदीश पक्का बनिया आहे बटा! तो कशाला विचारतो की, पिस्तुल कशाकरता हवे म्हणून? जगदीशने पिस्तुलाच्या विक्रीमध्ये चांगला नफा उकळला असेल!" ही पिस्तुले ग्वाल्हेरमध्ये गुपचिपीने पुष्कळ विकली जातात ह्याची मला, माझ्या धंद्यातल्या माहितीवरून कल्पना होतीच.

मे १९४८ च्या पहिल्या दुसऱ्या आठवड्यांतच मी डॉ. परचुऱ्यांचा वकील म्हणून काम करत आहे ही बातमी बाहेर फुटली! कशी ती कोण जाणे! कुणी इतरांनी मला त्याबद्दल हटकण्याच्या अगोदरच एके दिवशी भर कोर्टात मॅजिस्ट्रेट अटलने मला हळूच म्हटले, "क्यों इनामदार? मैंने सुना आपने डॉक्टर का वकालतनामा लिया हे? क्यों, सच है ना? तो फिर आपको देहली जाना पडेगा!" आणि त्यांनी मला उपदेश केला की, मी डॉक्टरांकडून चांगली फीस उकळावी. 'अच्छी आसामी है वोह!' श्री. अटलमहोदयांच्या पहिल्या प्रश्नाला मी नुसते हसून उत्तर देण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी माझी पाठ सोडली नाही म्हणून मी त्यांना एवढेच म्हटले की, 'अजून काही ठरले नाही माझे!' नि स्वतःची सुटका करून घेतली. थोड्याच दिवसांत मला भेटायला म्हणून पुष्कळ लोक यायला लागले. ते काही तरुण, काही वयस्क असे लोक होते. सर्व थरांचे लोक होते. पण त्यांतले बहुतांशी लोक तृतीय श्रेणी कर्मचारी–क्लास थ्री–क्लार्कस् होते. ती मंडळी येऊन प्रत्येक, 'अगदी गुप्त बातमी' सांगत. मी त्या मंडळींचे ऐकून घेई. आपणहून प्रश्न असे फारच थोडे विचारत असे. ती मंडळी ग्वाल्हेर सरकारच्या निरनिराळ्या विभागांतून अगदी ज्युडिशिअल नि पोलीस विभागातून काम करणारी सगळ्या जातींची मंडळी होती. पुष्कळांना मी अगोदरच ओळखत होतो, त्यामुळे मला कुणावर किती विश्वास ठेवावा याचे तारतम्य होते. येथे मला हे कबूल केले पाहिजे की, त्या माझ्याकडे आलेल्या लोकांमधून मला कुणीही फसविले नाही, चुकीची माहिती दिली नाही. त्यांच्यावर मी विश्वास ठेवला नसता तर माझे मोठेच नुकसान झाले असते. ही निरपेक्षी साधीसुधी मंडळी, गरीब–मध्यम स्थितीतली, डॉक्टर परचुरे काय नि श्री. कृष्णराव परचुरे काय त्यांच्यासाठी इमानाने, आपुलकीने तळमळणारी प्रामाणिक मंडळी होती. ह्या मंडळींच्या बोलण्यावरूनच मला ग्वाल्हेर राज्य हिंदुसभेच्या 'जहाल नि शूर–वीर' म्हणविणाऱ्या नेत्यांच्या व कार्यकर्त्यांच्या ढोंगीपणाची, भित्रेपणाची चांगली कल्पना झाली. मजकडे येणारी मंडळी परचुरे कुटुंबाची खरोखरीची हितचिंतक मंडळी होती. या अनाहूतपणे मिळालेल्या निरनिराळ्या माहितीतली मला कोड्यात टाकणारी माहिती अशी होती की, जगदीश गोयल वाण्याने नथूराम गोडसेला विकलेले पिस्तुल अगदी डॉक्टर परचुऱ्यांच्या लायसेन्स असलेल्या पिस्तुलासारखे परदेशी इटालिअन बनावटीचे 'बरेटा' पिस्तुल होते! नि डॉक्टरांच्या पिस्तुलाच्या जप्तीची तारीखही महत्त्वाची होती. डॉक्टरांचे पिस्तुल नीलकंठजवळून त्याला अटकेत घेतांना पोलिसांनी फेब्रुवारी १९४८ च्या पहिल्या आठवड्यातच आपल्या ताब्यात घेतले होते!

डॉक्टर परचुऱ्यांच्या अटकेविषयी मी त्यांच्या पत्नीकडून, मुलाकडून, हितचिंतक मित्रांकडून अशा रीतीने माहिती गोळा करण्याच्या उद्योगात असतानाच मे १९४८ च्या दुसऱ्या आठवड्यात मला कळले, की महात्मा गांधी खून खटल्याची तारीख २७ मे १९४८ ही ठरली आहे आणि खटला दिल्ली येथे लाल किल्ल्यातील कोर्टात चालणार आहे!

### भोपटकरांची सलामी

हे कळताच मला माझ्या स्वतःच्या ग्वाल्हेर येथील कामांबद्दल विचार नि तयारी करावी लागली, तसेच दिल्ली येथे जाण्याची तयारीही करावी लागली. नीलकंठ परचुरेच्या सांगण्यावरून दिल्ली येथे बिर्ला मंदिराजवळ असलेल्या हिंदुमहासभा भवनमध्ये जाऊन उतरण्याचे मी ठरवले. त्याप्रमाणे मी दिल्लीला जाण्याकरिता म्हणून ग्वाल्हेरहून २६ मे १९४८ ला दुपारी निघून तेथे रात्री ९ वाजण्याच्या सुमारास पोचलो व सरळ हिंदुमहासभा भवनामध्ये गेलो. तेथे चौकीदाराच्या सांगण्यावरून भवनाच्या मध्यवर्ती–सभागृहामध्ये रात्रीकरता पथारी टाकली. त्याने सांगितल्यावरून मला कळले की, तेथे पुण्याचे श्री. ल. ब. भोपटकर वकील स्वातंत्र्यवीर सावरकरांकरता म्हणून काम करायला येऊन थांबले आहेत. रात्री झोप घेऊन सकाळी लवकर उठलो व श्री. भोपटकर भवन ऑफिसमध्ये आल्याचे कळताच तेथे जाऊन भेटलो. श्री. भोपटकर तेथे टेबलाजवळ बसले होते. त्यांच्या एका बाजूला त्यांचे चिरंजीव श्री. कुंजविहारी भोपटकर व दुसऱ्या बाजूला भवनाचे चिटणीस श्री. इंद्रजी बसले होते. तेथे जाताच भोपटकरांना नमस्कार करून मी स्वतःची ओळख सांगितली व माझ्या ग्वाल्हेरहून तेथे येण्याचे कारणही सांगितले. डॉ. परचुऱ्यांच्यावतीने मी वकीलपत्र आणल्याचेही सांगितले. भोपटकरांनी मला काही प्रश्न विचारले. त्यांची उत्तरेही मी दिली. थोड्याच वेळात ते मला खडसावल्याच्या स्वरात म्हणाले, 'ग्वाल्हेरहून येथे तुम्ही कशासाठी आलात? तुम्ही येथे येऊन काय करू शकणार आहात? आपला वेळ मात्र फुकट घालवाल! ह्या खून खटल्याची मी जी माहिती मिळवली आहे त्यावरून माझे स्पष्ट मत आहे की, ह्या खटल्यात तिघेजण फाशीवर लटकणार! नथूराम गोडसे, नारायण आपटे नि डॉक्टर परचुरे! तुम्हाला माहीत आहे का की, डॉ. परचुऱ्यांनी कबुलीजबाब दिला आहे? सगळ्या आरोपींमधून डॉक्टरांसारख्या जबाबदार, सर्वांत वयस्क माणसाने कबुलीजबाब द्यावा? त्या कबुलीजबाबापुढे तुम्ही काय करणार त्यांच्याकरता?"

'अहो, म्हणूनच तर मी येथे आलो आहे! तो कबुलीजबाब खोटा आहे आणि डॉक्टरांना फसवून त्यांच्याकडून लिहून घेतला आहे!' मी एखाद्या नवशिक्यासारखे उसळून म्हटले.

'कसे–कोणत्या लेखी पुराव्याच्या आधारावर तुम्ही ही फसवणूक

झाल्याचे सिद्ध करणार ?' भोपटकरांनी तितक्याच परखड शब्दांत विचारले.

'लेखी पुरावा नाही. पण त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीचा, आजूबाजूचा पुरावा देऊन आपल्याला हे सिद्ध करता येईल की, डॉ. परचुऱ्यांनी त्यांना दिलेल्या दमदाटीमुळे, त्यांच्यावर केलेल्या जबरदस्तीमुळे हा कबुलीजबाब दिला आहे !' मी म्हणत होतो.

'काय ? डॉक्टर परचुऱ्यांसारख्या माणसाकडून जुलूम-जबरदस्तीने कबुलीजबाबावर सह्या घेतल्या असे तुम्ही सांगता ? नि त्यावर आम्ही विश्वास ठेवायचा ?' भोपटकर त्यांच्या मुलाकडे नि चिटणीसांकडे पाहात म्हणाले. पण लगेच, 'हे पाहा ! मी तुम्हाला हे काम पत्करू नका म्हणून सांगत नाही. शांत मनाने स्वतःशीच विचार करा ! डॉक्टर परचुरे यांना आम्ही काय मदत करू शकू हे मला यावेळी सांगता येणार नाही. तुमच्या बाबतीत एक गोष्ट चांगली आहे. तुम्ही ग्वाल्हेरचे रहिवासी आहात. डॉक्टरांच्या विरुद्ध असलेल्या आरोपाच्या बचावाबाबत तुम्हाला जी माहिती सहज मिळू शकेल ती आम्हाला मिळणार नाही. आमच्याकडून जास्त काही मदत मिळेल अशी अपेक्षा ठेवू नका. स्वतःच्या पायावर उभे राहून येथे काम करायला या !'

भोपटकरांनी सलामीलाच जे माझे 'स्वागत' केले, जे मला म्हटले, त्यावरून मला त्यांच्याशी अधिक बोलण्यात अर्थ नाही हे लगेच कळले आणि मी त्यांना नमस्कार करून त्यांची रजा घेतली. लाल किल्ल्यामध्ये जाऊन स्वतःच कोर्टात हजर व्हायचे असे मी ठरवले. त्या उद्देशाने मी जेथे माझे सामान ठेवले होते तेथे आलो व भराभरा स्नान वगैरे आटोपायच्या व लाल किल्ल्यात जायच्या तयारीला लागलो. स्वतःसाठी चहा नि टोस्ट मागवून न्याहारी घेतली. पेटीमधून दप्तराची कातडी पिशवी काढून त्यात कागद, वकीलपत्र, माझी वकिलीची सनद आहे की नाही ते पाहिले नि स्वच्छ शर्ट नि कोट-टोपी घालून दप्तर घेऊन निघालो. भवनाच्या पायऱ्या उतरून रस्त्यावर येताच लाल किल्ल्यात जाण्याकरता म्हणून टांगा बोलावला. मला यापुढे कोणत्या परिस्थितीतून जावे लागणार आहे याची पुसटशी कल्पनासुद्धा नव्हती. मी अजाण माणसाच्या विश्वासाने टांग्यात बसलो नि लाल किल्ल्याकडे निघालो. नव्या आणि जुन्या दिल्लीच्या त्या गर्दीने गजबजलेल्या रस्त्यातून जुन्या दिल्ली रेल्वे स्टेशनच्या बाजूने जाताना–मी दिल्लीला प्रथमच आलो होतो–माझ्या मनात एकच विचार साथ देत होता. मला खात्री होती की हत्येचा आरोप असलेल्या अभियुक्ताच्या वतीने वकील म्हणून काम करायला कोर्टात उभे राहू पाहणाऱ्या मनुष्याला अडविणारी कोणचीही शक्ती नाही. त्यासाठी मला मात्र चिकाटीने सगळे प्रयत्न करायला हवेत. टांगेवाला मधूनमधून माझ्याशी बोलत होता–आस्थेने विचारीत होता. त्याच्या आवाजातली आस्था मला त्यावेळी किती सुखाची–आधाराची–वाटली होती !

### न्यायालयात प्रविष्ट

दिल्लीच्या चांदणी चौकातून येणाऱ्या भव्य रस्त्यासमोर असणाऱ्या लाल किल्ल्याच्या दरवाज्याच्या रस्त्यापाशी मी आलो. तो तेथे मला जिकडे तिकडे बंदुका घेतलेल्या पोलीस जवानांचा नि अधिकाऱ्यांचा पहारा दिसला. सुरुवातीसच एक पोलीस सबइन्स्पेक्टर श्रेणीचा अधिकारी किल्ल्यामध्ये जाऊ पाहाणाऱ्या लोकांची ओळखपत्रे पाहून त्यांना किल्ल्याकडे जायला सोडीत होता. क्षणभर मला हादरल्यासारखे झाले. पण मी न डगमगता त्या अधिकाऱ्याजवळ गेलो. तो लाल किल्ल्याच्या दरवाज्याजवळील खंदकावर असलेल्या पुलाच्या अलीकडेच उभा होता. त्याचे नाव, मला पुढे कळले ते, श्री. बालकिसन सबइन्स्पेक्टर, पोलीस, दिल्ली असे होते. त्याला मी स्वतः वकील असल्याबद्दल, ग्वाल्हेरहून डॉ. परचुऱ्यांचे वकीलपत्र घेऊन आल्याबद्दल सांगून म्हटले, 'मजजवळ ओळखपत्र नाही. मला आधी हे माहीत नव्हते की, ओळखपत्र लागेल म्हणून. पण मजजवळ माझी वकिलीची, ग्वाल्हेरची सनद आहे. वकीलपत्र आहे. त्यावर डॉक्टरांच्या पत्नीची सही आहे.' असे म्हणत मी माझ्या दप्तरामधून सनद व वकीलपत्र काढून त्या सबइन्स्पेक्टरना दाखवले नि म्हटले, 'मला ताबडतोब कोर्टात जायला हवे आहे !' त्या अधिकाऱ्याने क्षणभर माझ्याकडे बघितले आणि मग मी दिलेली सनद व वकीलपत्र पाहिले. क्षणभर विचार केला नि एका हेडकॉन्स्टेबलला बोलावून माझ्याबरोबर जायला सांगितले. अशा थाटात आमची स्वारी बंदूक घेतलेल्या पोलीसशिपायाच्या संगतीने कोर्टाकडे कूच करू लागली. वाटेत भेटणाऱ्या पोलीसचौक्यांवर–अशा सुमारे सहा असाव्यात–माझी ओळख व कामाचा तपशील देत त्याने मला कोर्टाकडे चालविले, कोर्टाच्या आवारापर्यंत नेले. आवार कसले, काटेरी तारांचे आठ फूट उंचीचे कुंपण होते ते. फाटकसुद्धा काटेरी तारांचेच. फाटकाच्या आत एक छोटासा शामियाना ताणला होता. टेबलावर एक टेलिफोन व खुर्चीवर एक वरिष्ठ अधिकारी–इन्स्पेक्टर बसला होता. त्याचे मागे बंदूकधारी दहा पोलिसांची रांग उभी होती. त्याने माझी ओळख, काम व अडचण पाहताच फोनवर बोलून एका 'सर' ना कळविले. दोन-तीन मिनिटांतच समोरच्या इमारतीच्या वरच्या मजल्यावरून एक कोट-पॅन्टटॉयमधले 'साहेब' सरसर जिना उतरून खाली आले व त्यांनी मला सर्व विचारले नि त्या इन्स्पेक्टरला म्हटले, 'मिस्टर बाली, इनकी तलाशी लीजिये. इनको मैं उपर लिये जाता हूँ.' 'तलाशी' शब्द ऐकताच मी दचकलोच. पण हुकुमाची तामीली त्या इन्स्पेक्टरने हसून केली. त्याने तेथूनच मला म्हटले, 'क्यों वकीलसाहब, आपके जेब में, बस्ते में कोई खतरनाक चीज तो नही है ?' मीसुद्धा हसतच जबाब दिला, 'सिवाय एक वकालतनामा, मेरी वकालतकी सनद और कुछ कोरे कागज, और कोई खतरे की चीज नहीं.' त्या पोलीस अधिकाऱ्याने व त्या साहेबाने-'अच्छा, अच्छा, इनके साथ जाइये–चलिये,' असे म्हटले. आणि मी त्या साहेबाबरोबर इमारतीकडे जाऊन जिना चढू लागलो. त्या पोलीस अधिकाऱ्याचे व साहेबाचे नाव मला मागाहून कळले; इन्स्पेक्टर पोलीस सी. आय. डी. श्री. बाली व श्री. भानोत, रजिस्ट्रार स्पेशल कोर्ट, लाल किल्ला, देहली. श्री. भानोत हे पंजाबी गृहस्थ डिस्ट्रिक्ट जज्जच्या श्रेणीला येऊ घातलेले न्यायाधिकारी होते

**'तुम्ही हे वकीलपत्र घेऊन काय करू शकणार आहात ? तुमचा वेळ मात्र फुकट घालवाल'**

आणि श्री. बाली हे पंजाबी गृहस्थ देहली पोलीसचे होते. ती इमारत म्हणजे ब्रिटिश अमदानीतली दुमजली बराकीसारखी, विटा-दगडांची इमारत होती. मजले अठरा फुटी उंच असावेत. आम्ही वर जात होतो तेव्हा जिन्यावर आम्हाला आपले सामान सांभाळीत परत येत असलेली ऑल इंडिया रेडिओची फिल्म डिव्हिजनची मंडळी व बरीचशी वर्तमानपत्रांची फोटोग्राफर मंडळी भेटली. महात्मा गांधी खून खटल्याच्या पहिल्या दिवसाच्या कामाची आरंभीची फिल्म व फोटो भारत शासनातर्फे प्रसिद्धीकरता घेतले गेल्याचे मला श्री. भानोत यांनी सांगितले ! कोर्ट, न्यायाधीश, वकील मंडळी, अभियुक्त गण, पोलीस अधिकारी बसलेले, उभे असलेले असे वार्ताचित्रपट व वर्तमानपत्रांतून फोटो प्रसिद्ध केले जाणार होते ! जिना चढून पहिल्या मजल्यावर पोचलो ते एका विस्तीर्ण लांबट नि उंच भिंतीच्या एका हॉलमध्ये. ब्रिटिश अमदानीतल्या गोऱ्या सोजिरा-अधिकाऱ्यांकरता बॉलरूमचा हॉल असावा अशा तऱ्हेची रचना होती. हॉलची लांबी-१०० फूट व रुंदी ३० फूट अशी असावी. लांबीच्या भिंतीत दोन्ही बाजूंना पाच पाच उंच दारे व त्यावर काचेची तावदाने असलेले झरोके आणि दोन्ही टोकाला रुंदीच्या भिंतीमध्ये एक एक दरवाजा. भिंतीच्या बाजूला लहान लहान दालने–खोल्या. प्रवेशद्वारासमोर शेवटी लाकडाचा एक मोठा चौथरा होता व त्यावर न्यायाधीश-महोदय विराजमान होते. त्यांच्यासमोर वकिलांचा कठडा, खुर्च्यांवर अभियोगी व अभियुक्त पक्षाची वकील मंडळी बसली होती. न्याया-धीशांच्या उजव्या बाजूला साक्षीदारांचा पिंजरा व डाव्या बाजूला अभियुक्तांकरता पिंजरा होता. तेथे तीन मायक्रोफोन्स–एक न्याया-धीशांसमोर, एक अभियोग पक्षाच्या टेबलावर व एक अभियुक्त पक्षाच्या टेबलावर असे होते. वकील मंडळींच्या खुर्च्यांच्या तीन रांगा संपल्यावर थोडी जागा सोडून पुढल्या जागेत प्रेक्षक व पोलीस अधि-कारीगण यांच्याकरता खुर्च्यांच्या रांगा होत्या. साधारण शंभर माणसांची बसायची व्यवस्था होती. प्रत्येक दरवाज्याजवळ दोन बंदूकधारी पोलीस उभे होते. न्यायाधीशांच्या खुर्चीवर श्री.आत्माचरण, आय. सी. एस., स्पेशल जज्ज बसले होते. चौथऱ्यावर डाव्या बाजूला एक टंकलेखक व उजव्या बाजूला एक रीडर बसले होते. चौथऱ्याच्या-समोर न्यायाधीशांच्या उजवीकडे वकिलांमध्ये श्री. सी. के. दफ्तरी, ॲडव्होकेट जनरल, मुंबई, श्री. एन. के. पेटीगारा, चीफ प्रॉसिक्यूटर मुंबई व श्री. व्यवहारकर, पोलीस प्रॉसिक्यूटर, मुंबई, बसले होते. डावीकडल्या बाजूला पहिल्या रांगेत श्री. बानर्जी, ॲडव्होकेट दिल्ली, श्री. जमनादास मेहता, बॅरिस्टर ॲट लॉ, मुंबई, श्री. गणपतराय, ॲड-व्होकेट, दिल्ली व श्री. भोपटकर, ॲडव्होकेट, पुणे हे बसले होते. दुसऱ्या रांगेमध्ये श्री. कुंजबिहारी भोपटकर व एक पुणेरी गृहस्थ बसले होते. आरोपींच्या पिंजऱ्यातल्या तीन रांगांवर अभियुक्तगण बसले होते. पहिल्या रांगेत नथूराम गोडसे, नारायण आपटे व विष्णु करकरे होते. दुसऱ्या रांगेत मदनलाल पहवा, दाढीवाले बडगे व गोपाळ गोडसे होते व तिसऱ्या रांगेत भिंतीजवळ शंकर किस्तय्या, श्री. वि. दा. सावरकर व डॉ. परचुरे बसले होते. त्या मंडळींच्या मागे दारात काही पोलीस अधिकारी उभे होते. अभियुक्त मंडळी चार्जशीटमध्ये त्यांना दिलेल्या क्रमांकानुसार बसलेली होती. मी कोर्टात जाऊन बचाव वकील मंडळींच्या मागे जाऊन उभा राहिलो व जज्जमहोदयांना अभिवादन करून खाली बसलो. जज्ज आत्मचरण त्यावेळी कसल्या हरकती अर्जावर वकिलांचे म्हणणे ऐकून त्यासंबंधी आज्ञा देण्यात गढले होते. मी आरोपींच्या पिंजऱ्यात शेवटच्या टोकावर बसलेल्या डॉ. परचुऱ्यांकडे बघून स्मित केले. हरकती अर्जाचा विषय एकाचा, बचाव पक्षाची व्यवस्था करण्यासाठी वेळ मागण्याबद्दल होता व दुसऱ्याचा अभियोगी पक्षाने चार्जशीट आरोपपत्राबरोबर द्यावयाच्या साक्षीदारांच्या सूचीबद्दल होता. अभियोगी पक्षाने त्या दिवशी चार्जशीटबरोबर साक्षीदारांची सूची नियमाप्रमाणे द्यायला हवी ती दिली नव्हती, हे मला त्या आज्ञांच्या मजकुरावरून कळले. हे झाल्यानंतर कोर्टासमोरचे काम संपले नि जज्जमहोदय त्या दिवसाची आज्ञा लिहिण्याच्या तयारीत दिसले. म्हणून मी उभा राहिलो नि जज्ज महोदयांसमोर पुन्हा अभिवादन केले. ते बघून जज्ज आत्मचरण मला म्हटले, 'काय म्हणता ?' मी त्यांना सांगू लागलो, 'मी एक ॲडव्होकेट म्हणून येथे आलो आहे. मला अभियुक्त डॉ. परचुरे यांच्या वतीने येथे काम करायला डॉ. परचुऱ्यांच्या पत्नीने वकीलपत्र दिले आहे. मी ग्वाल्हेरहून आलो आहे. माझे नाव पु. ल. इनामदार. मी ग्वाल्हेरचा ॲडव्होकेट आहे. मी नम्रपणे आपली अनुमती इच्छितो...'

'अहो ! माझ्या अनुमतीची काय आवश्यकता ? तुम्ही ॲड-व्होकेट आहात म्हणून सांगता.' जज्जसाहेब मला मध्येच थांबवून म्हणाले, 'तसेच सौ. परचुऱ्यांकडून वकीलपत्राची काय आवश्यकता ?' जज्जसाहेबांनी आरोपींच्या पिंजऱ्याकडे बघितले नि म्हटले, 'काहो डॉ. परचुरे ? तुम्ही या इनामदार ॲडव्होकेटना ओळखता का ? त्यांनी तुमच्या वतीने काम करावे, याला तुमची संमती आहे का ?'

'होय, महोदय !' डॉ. परचुऱ्यांनी स्मित करीत उभे राहून उत्तर दिले. ते ऐकून न्यायाधीशांनी आज्ञा सांगायला सुरुवात केली. त्यांनी आरोपींच्या पिंजऱ्याकडे बघून आरोपींच्या नावांचा पुकारा करीत एकामागून एक आरोपींची उपस्थिती पाहिली आणि म्हणाले, 'वि. दा. सावरकरांच्या वतीने श्री. ल. ब. भोपटकर आणखी इतर उपस्थित. डॉ. परचुऱ्यांच्या वतीने श्री. पु. ल. इनामदार उपस्थित. नथूराम वि. गोडसे, नारायण द. आपटे, विष्णु रा. करकरे, मदनलाल का. पहवा आणि गोपाळ वि. गोडसे यांचे निवेदन आहे की, त्यांना श्री. ल. ब. भोपटकरांनी वकील आणून दिलेले हवेत. दिगंबर रा. बडगे याचे निवेदन आहे की, त्याला कोणी वकील नकोत. शंकर किस्तय्याला सरकारतर्फे दिलेला वकील हवा आहे...' या वेळात मी माझ्या दफ्तरामधून एक कोरा कागद काढला व त्यावर अनुमतिपत्र लिहून न्यायाधीशाच्या संमतीने आरोपींच्या पिंजऱ्याकडे गेलो आणि डॉ. परचुऱ्यांना त्या अनुमतिपत्रावर हस्ताक्षर करायला सांगितले. त्याच रांगेत स्वातंत्र्यवीर सावरकर त्या लाकडी बेंचवर आरोपी म्हणून बसले होते. त्यांच्या उजव्या बाजूला शंकर किस्तय्या व डाव्या बाजूला डॉ. परचुरे होते. श्री. सावरकर मजकडे बघत आहेत, हे मला जाणवले, म्हणून मी त्यांच्याकडे बघून मान लववून त्यांना अभिवादन केले. त्यांनी आपली मान किंचित डोलवून माझे अभि-वादन स्वीकारल्याचे दाखविलेसे मला वाटले नि लगेच ते न्याया-धीशाकडे पुन्हा बघायला लागले. ते हस्ताक्षरित अनुमतिपत्र घेऊन मीही त्यावर हस्ताक्षर केले व ते रीडरजवळ जाऊन त्याच्या हातात

दिले आणि परत माझ्या जागेवर तिसऱ्या रांगेमध्ये येऊन बसलो. मी न्यायाधीशांकडे बघून ऐकायला लागलो होतो. ते आपली आज्ञा पुढे सांगत होते. आरोपी मदनलालने अनुमती मागितली आहे की, त्याला कोर्टाला काही एकीकडे सांगायचे आहे. एका आरोपीला पोलीसकडून जेलमध्ये मुंबईला व येथेही जी विशेष सवलतीची वागणूक दिली जात आहे, त्याबद्दल काही सांगायचे आहे.' अभियोग पक्षाने अजून आपल्या साक्षीदारांची सूची दाखल केली नाही,' हे येथे नमूद केले जात आहे. त्यांनी पुराव्यातले कागदपत्रही अजून नियमानुसार रीतसर दाखल केले नाहीत. पुढील कामकाजाकरता तारीख ३–६–१९४८ निश्चित झाली. जज्ज आत्मचरणमहोदय उठून चेंबरकडे निघून गेले.

## अशीलांशी बातचीत

कोर्टाचे कामकाज संपल्यावर आम्ही वकील मंडळी आमच्या अशीलांशी बोलायला लागलो. श्री. भोपटकर श्री. सावरकरांशी बोलू लागले. नंतर ते वेगळे नथूरामशीही बोलले. मी डॉक्टर परचुऱ्यांशी बोलत होतो. त्यांना मी ग्वाल्हेरचे त्यांच्या घरचे कुशल वर्तमान सांगितले. मी आरोपींच्या पिंजऱ्यात श्री. कृष्णराव परचुरे नाहीत, याचे आश्चर्य दाखवले व त्यांना पोलिसांनी अजून सोडले नसल्याचेही डॉक्टरांना सांगितले. नीळकंठला सोडल्याचे सांगितले. मी डॉ. परचुऱ्यांविरुद्ध होऊ शकणाऱ्या एकंदर प्रकरणाचे धागेदोरे समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहे, म्हणून डॉक्टरांना सांगितले. त्यांनी मला विचारले, 'काहो, माझी गुप्त चिठ्ठी तुम्हाला मिळाली का ? तुम्ही श्री. अटलना भेटलात का ?

'नाही हो. ती तुमची चिठ्ठी मला नाही मिळाली, पण सौ. परचुऱ्यांनी मला तुम्ही काय केले आहे नि मी काय करावे, अशी तुमची इच्छा आहे याबद्दल सांगितले. पण ते सर्व फार उशीराने. पण आता त्याची काळजी करू नका. आपणाला शक्य ते आपण सर्व करू या. तुमचा मुलगा आणि तुमचे हितचिंतक तुमच्याकरिता खूप मेहनत घेत आहेत, माहिती मिळवत आहेत. तुम्ही काळजी करू नका.' डॉक्टरांनी मला फरारी आरोपी गंगाधर दंडवते, गंगाधर जाधव व सूर्यदेव शर्मा यांबद्दल विचारले. मी मला माहीत असलेले त्यांना सांगितले. माहीत नव्हते ते तसे सांगितले. डॉक्टरांनी मला ग्वाल्हेरच्या महाराष्ट्रीय ब्राह्मणांनाही काही त्रास भोगावा लागला आहे का, म्हणून विचारले. मी 'मुळीच नाही' म्हणून सांगितले. मी डॉक्टरांना त्यांचा नथूराम गोडसेशी कसा व काय संबंध आला, म्हणून विचारले. त्यावर डॉक्टर म्हणाले, 'त्याचा माझा संबंध कसा असणार ? तो वेगळ्या संघटनेचा आहे.'

मी त्यांना पोलीसकेसच्या बचावाची तयारी म्हणून आणखी कुणाकुणाला भेटायला हवे, हे विचारले. डॉक्टरांनी मला काही नावे सांगितली. मी त्या सर्वांना आत्तापर्यंत भेटलोच होतो मी योग्य दिशेने प्रयत्न करीत आहे, हे मला जाणवले. मी डॉक्टरांना त्यांच्या किल्ल्यावरील अटकेबद्दल विचारून मला त्यांनी कबुलीजबाब दिल्याचे कळले आहे, हेही सांगितले. डॉक्टरांनी मला सांगितले की, त्यांना पकडून किल्ल्यावर नेऊन ठेवल्यानंतर तीन चार दिवसांत त्यांना पेशाच्या विकाराचा त्रास होऊ लागला. संधिवाताचेही दुखणे वाढले. तापही येऊ लागला होता. त्यांना कुणाला भेटायची परवानगी नव्हती. मी त्यांना कबुलीजबाबावर हस्ताक्षर केल्याबद्दल विचारले. त्यावर डॉक्टरांनी मला जे काही सांगितले ते ऐकून मी थक्कच झालो. मला आतापर्यंत जे काही कळले होते–जे काही घडले असेल असे मला वाटले होते ते सर्व खरे होते. त्या छोटयाशा चिठ्ठीमधला शब्दन् शब्द अर्थपूर्ण होता. मुळीच व्यर्थ किंवा खोटा नव्हता. डॉक्टरांनी मला मॅजिस्ट्रेट अटल यांनी म्हटलेले काही शब्द सांगितले. मॅजिस्ट्रेट अटल डॉक्टरांना म्हणाले होते, 'अजी ! आप इनामदार-साहबको पहिचानते है ना ? वो मेरे मिलनेवाले दोस्त है. वो अपनेको मदत करेंगे !'

डॉक्टरांनी मला दिल्लीच्या कोर्टात त्यांच्यावर खटला कसा चालू शकतो, याबद्दल शंकाही बोलून दाखविली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ते ग्वाल्हेर संस्थानचे रहिवासी होते. त्यांना ग्वाल्हेरचे कायदेकानून लागत होते. ब्रिटिश इंडियाचे कायदे त्यांना कसे लागणार ? जानेवारी १९४८ च्या महिन्यांत ग्वाल्हेर संस्थान स्वतंत्र होते. हिंदुस्थानच्या राज्यात सम्मीलित झाले नव्हते, वगैरे कायद्याचे मुद्दे उपस्थित होतात, असे त्यांचे म्हणणे होते. मी ते ऐकून घेतले. कोर्टाची वेळ संपली होती. आम्हाला बोलणे आवरते घ्यावे लागले. पण डॉक्टरांचा निरोप घेताना मला त्यांना हे म्हटल्याशिवाय राहवले नाही की, 'डॉक्टरसाहेब ! तुम्ही स्वतःच्याविरुद्ध, आम्हा सगळ्यांच्या विरुद्ध–माझ्याविरुद्ध हे काय केलेत ?'

मी डॉक्टरांचा त्या दिवशी निरोप घेतला खरा. पण त्या दिवशी मला ऐकायला मिळालेल्या काही शब्दांपासून मला सुटका करून घेता आली नाही. ते शब्द मला वारंवार आठवू लागले–'या प्रकरणामध्ये तिघा आरोपींना फाशी नक्की होणार ! नथूराम गोडसे, आपटे आणि डॉक्टर परचुरे !' आणि 'इनामदार माझे मित्र आहेत. ते आपल्याला मदत करतील' हे शब्द माझ्या डोक्यात घण मारीत आहेत असे मला वाटले ! आणि सत्य हे किती एकाकी असते ! ते न्यायालयात सिद्ध करणे किती अवघड आहे ! हे मला पुन्हा पुन्हा जाणवायला लागले.

त्या दिवशी कोर्टात एक आठवड्याची तारीख लागली होती. अभियोग पक्षाला साक्षीदारांची सूची दाखल करायला वेळ दिला होता. त्यांच्या तोंडी सांगण्यावरून सूची फार मोठी होती. साक्षीदारांची संख्या दोनशेपेक्षा जास्त होती. त्यांना पुष्कळसे कागदपत्रही दाखल करायचे होते. मी त्या दिवशी कोर्टात, डॉक्टरांचा कबुलीजबाब तरी दाखल झाला का, याची चौकशी केली, तर तोही दाखल झाला नव्हता. मला त्या दिवशी हेही कळले की एक आरोपी माफीचा साक्षीदार होणार आहे ! अरे देवा ! आणखी एक डोकेदुखी बचाव पक्षाला ! डॉक्टरांच्या म्हणण्यावरून तो आरोपी बडगे हा असल्याचे कळले. तेव्हा मला कोणत्या आरोपीला विशेष सवलतीची वागणूक दिली जात आहे व ती का, या मदनलालच्या 'एकीकडे' सांगण्याचा

**त्या छोटयाशा चिठ्ठीमधला शब्द न शब्द खरा होता.**

अंदाज लागला आणि म्हणूनच बडगेने मला कोणी वकील नको म्हणून कोर्टाला ऐटीत सांगितले होते.

### पुन्हा दोलायमान

मी त्याच दिवशी ग्वाल्हेरला परत जायला निघालो. ग्वाल्हेरला येऊन पुन्हा या प्रकरणाची–दिल्लीला काम करण्याची जबाबदारी मी घ्यावी का याचा आणखी विचार करावासे वाटू लागले. अभियोगी पक्षातर्फे जर दोनशेपेक्षा अधिक साक्षीदार येणार आहेत तर मग अगदी रोज कोर्टाचे काम चालले तरी, खटल्याचे काम संपायला कमीत कमी चार महिने तरी लागणार, कदाचित जास्तीसुद्धा लागतील. डॉ. परचुरे यांच्याविरुद्ध पुरावा असा फार थोडा असणार असे म्हटले, तरी तो पुरावा एकदम दिला जाणार नाही. साक्षीदार गटागटाने येतील–केव्हा येतील–यावेत हे आपल्या इच्छेवर थोडेच आहे! तेव्हा सर्व कार्यवाही होईतो वाट पाहायलाच हवी. इतके दिवस ग्वाल्हेरपासून दूर जाऊन राहावयाचे! ग्वाल्हेरच्या कोर्टातले माझे चालू काम–घरच्या जबाबदाऱ्या वगैरेंचा विचार करायला हवाच होता. पण त्याबरोबरच डॉक्टरांकडून जे काही कळले त्यामुळे मला माझ्या शिरावर भलतीच जबाबदारी येऊन पडल्यासारखे झाले. डॉक्टरांना त्यांच्या भोवताली उभ्या केलेल्या परिस्थितीत पकडून त्यांच्यावर भीतीचे दडपण आणण्याचा प्रयत्न पोलिसांनी केलाच होता. त्यातच भर म्हणून माझ्या नावाचा हवाला देऊन–माझ्या मदतीची आशा लावूनही त्यांचे मन कबुलीजबाबावर सही करण्यास वळविले गेले का? मी जर डॉक्टरांचा बचाव करण्याची जबाबदारी टाळली–सोडली तर मी डॉक्टरांचा विश्वासघात केला असे होईल का? माझ्या धंद्याशी बेइमान होईल का? समोर उभ्या ठाकलेल्या कर्तव्याला पाठ दाखविण्याचे लांछन मला जन्मभर सहन करवेल का? प्रयत्न करून अपयश पदरी आले तर जास्तीत जास्ती मी कमकुवत ठरलो असेच म्हणतील. पण कर्तव्याला पाठ दाखविणे! छे, छे! माझ्याकडून असा भ्याडपणा मुळीच होऊ देणार नाही. माझ्या नावाचा उपयोग ज्याने कुणी केला असेल त्याची जबाबदारी माझ्यावर नव्हती. तरी पण धंद्याचे इमान, धंद्यातली संधी, स्वतःची व्रतनिष्ठा ही मी कशी टाळू? मला काही सुचेनासे झाले. रात्रंदिवस याच विचारांनी मला भंडावून सोडले. मी माझ्या पत्नीला पुन्हा सल्ला विचारला. त्यांचे सारखे म्हणणे, 'तुम्ही येथली–माझी–काळजी करू नका. तुम्हाला हे काम करावे असे वाटते ना? करू शकू असा प्रयत्न तुम्ही करणार आहात ना? मग निःशंक मनाने हे काम करा. मागे पुढे पाहू नका!' माझ्या ज्योतिषी मित्रांनाही मी विचारले. त्यांनीही मला पुन्हा भर दिली, ही संधी न घालविण्याचा आग्रह केला. माझे ग्वाल्हेरचे काम माझी सहयोगी मित्रमंडळी कारकूनही सांभाळून घेतील अशी खात्री वाटली. तसे कोणी मला म्हटले नाही पण त्यांचा माझ्या हाती घेतलेले काम तडीस नेण्याच्या जिद्दीवर विश्वास होता. माझे मला असाहाय्य असे वाटायचे, पण त्यानेच आव्हान स्वीकारण्याकडेही माझे मन झुके! पण इतके दिवसांनंतर आता मी त्या दिवसांतल्या माझ्या मनःस्थितीचा विचार करतो, तेव्हा मला असे मोकळेपणाने म्हणावेसे वाटते की, यश नि कीर्तीच्या लोभानेच मला हे काम जबाबदारीने स्वीकारायला प्रवृत्त केले. मी धंद्यातील इमान पाळीत होतो. मानाचा मार्ग पत्करीत होतो, असल्याला यशस्वी होऊ द्यायचे नाही असा अट्टाहास करीत होतो, हे त्यावेळी काय कमी होते? अगदी महात्मा गांधी खून खटल्यामध्ये वकीलपत्र घेऊनही!

३ जून १९४८ च्या सुनावणीच्या वेळी अभियोगपक्षाने आपल्या साक्षीदारांची सूची दिली. २७५ साक्षीदारांची नावे, पत्ते वगैरे माहिती होती. त्याबरोबरच त्यांनी पुष्कळशा साक्षीदारांच्या पुराव्याचा सारांशही आम्हाला दिला. तो सारांश पोलिसांनी नोंदविलेले कथन नव्हते– त्या आधारावर लिहिलेला सारांश होता. त्या सारांशाचा उपयोग साक्षीदारांच्या कोर्टातल्या कथनाला काट देण्याकरिता करता येणार नाही अशा शर्तीवरच तो दिला होता. ह्या सारांशावरून एक फायदा झाला. अभियोगपक्षाचा पुरावा काय स्वरूपाचा आहे याची बरीचशी कल्पना आम्हाला आली. ग्वाल्हेरला परत आल्यावर मी ग्वाल्हेरच्या साक्षीदारांची नावे व त्यांच्या पुराव्याचा सारांश माझ्या मदतनीसांना दिला. त्यावरून साक्षीदारांची माहिती काय गोळा करायची हे त्यांना कळावे म्हणून. ते सगळे वाचून एक गोष्ट माझ्या लक्षात लगेच आली. पोलीस अधिकारी साक्षीदारांकडून काय सांगावयाचे व त्यांना काय सांगू न द्यायचे याची दक्षता पाळतील हे स्पष्ट होते. आणि म्हणून अभियोगपक्षाला नको असलेली माहिती साक्षीदारांकडून काढून घेण्यात सारे कौशल्य होते. बचाव पक्षाची सारी तयारी त्यासाठीच करावयाची होती हे सर्व खरे, पण कबुलीजबाबाचे काय? तेथे तर एका मॅजिस्ट्रेटशी व येतील त्या चौकशी करणाऱ्या पोलीस अधिकारी साक्षीदारांशी गाठ पडणार होती! असे विचार मनात येऊन कबुलीजबाबाचा प्रश्न निघाला की माझे मन बधिर होऊन जाई– बुद्धी कुंठित झाल्यासारखी वाटे. कबुलीजबाब अजून कोर्टात दाखल झाला नव्हता! अगदी श्वास रोखून तो दाखल होण्याची व वाचायला मिळण्याची वाट पाहात होतो. डॉ. परचुऱ्यांनासुद्धा 'तुम्ही काय कबुलीजबाब दिला आहे' हे विचारण्याचे धैर्य मला होत नव्हते!

त्या दिवशी मदनलाल आणि इतर काही आरोपींनी मागणी केल्यावरून सर्व आरोपींना दुय्यम श्रेणीचे बंदी समजून त्यांना नियमानुसार द्यावयाच्या सर्व सोयींचा लाभ द्यावा, असे न्यायाधीशांनी आदेश दिले. पुढच्या सुनावणीकरता १४ जून तारीख निश्चित करण्यात आली.

१४ जून १९४८ ला नथूराम गोडसेच्या वतीने मुंबईचे श्री. व्ही. व्ही. ओक, बॅरिस्टर अॅट लॉ, आणि गोपाळ गोडसेच्या वतीने मुंबईचे श्री. मणियार, बॅरिस्टर अॅट लॉ हे वकील उपस्थित झाले. सावरकर व डॉ. परचुरे यांच्या वतीने भोपटकर वगैरे व मी क्रमशः होतोच. बाकी आरोपींच्या वकिलांसाठी अजून व्यवस्था व्हावयाची होती. त्यावेळी हेही ठरविण्यात आले की, अभियोगाची सुनावणी २२ जून ४८ पासून सुरू होईल. त्या दिवशी अभियोग पक्षातर्फे अॅडव्होकेट जनरलांचे अभियोगाचे व पुराव्याचे सम्यक दर्शन–झलक देणारे भाषण होणार होते. त्या दिवसापासून अर्थातच सुनावणीच्या तारखा आठवड्याची व इतर सुट्टी सोडून–रोज पडणार होत्या. त्यासाठी मला सर्व तयारीने यावे लागणार होते. त्या दिवसांपर्यंत कबुलीजबाब कोर्टात दाखल झाला नाही. इतर पुराव्याचे बरेचसे कागद अभियोग पक्षाने दाखल केले होते.

२२ जूनच्या सुनावणीला उपस्थित होण्यासाठी म्हणून मी १९ जूनलाच रात्री ग्वाल्हेर सोडले. पण ग्वाल्हेर सोडायच्या अगोदर ग्वाल्हेरला माझ्या बाबतीत माझ्या भोवतालच्या वातावरणात काही बदल झालेले मला जाणवायला लागले होते. तोपर्यंत मी दिल्लीच्या लाल किल्ल्यात चाललेल्या महात्मा गांधी खून खटल्यात वकील म्हणून काम करत आहे याची माहिती ग्वाल्हेरमध्ये सर्वांना (स्थानिक व बाहेरच्या वर्तमानपत्रांमधून) झाली होती. ग्वाल्हेरची बाररूमची मंडळी माझ्याबद्दल कुजबुजीच्या रूपाने आपसात चर्चा करायला लागली होती. ग्वाल्हेरच्या उच्च न्यायालयभवनामध्ये चपराश्यापासून तो न्यायाधीश-मंडळींपर्यंत आणि न्यायालयात येणारी पक्षकार मंडळी व वकील मंडळी माझ्याविषयी आपसात काही हळू-हळू बोलत आहेत असे मला पाहायला मिळायला लागले. ही मंडळी माझ्याकडे बघत नि आपसात काही तरी बोलत असत. ते बघून मला मोठे विलक्षण वाटायला लागले. ह्या मंडळींमधून एकानेही—अगदी बाररूमच्या माझ्या वकील सहयोगी लोकांनीसुद्धा—माझ्याविषयी बोलावे, पण मला काही कळू देऊ नये—मला उत्सुकतेने देखील काही विचारू नये, याचे आश्चर्य वाटायचे, विषादही वाटायचा. लवकरच मला कळायचे होते की, हे सर्व जग मला 'जातीबाहेर' टाकल्यासारखे वागवत आहे. माझ्याभोवतीचा समाज मला बहिष्कृत समजत आहे. हा बहिष्कृतपणा मला तेव्हापासून, तो अगदी पूर्व पंजाब उच्च न्यायालयामधल्या अपीलाचा निर्णय २२ जून १९४९ ला प्रसिद्ध झाला नि माझे पक्षकार डॉ. परचुरे निर्दोष सुटले, तेव्हापर्यंत चांगलाच भोगावा लागला. तेव्हा कुठे माझे 'जातवाले' धंद्यातले सहयोगी काय किंवा कोर्टाबाहेरचे मला ओळखणारे माझे परिचित काय, मित्र काय, प्रथमच माझ्या अभिनंदनाचे निमित्त करून माझ्याशी मोकळेपणाने बोलायला लागले नि त्या खटल्याच्या व अपीलाच्या हकीकती विचारायला लागले. अगदी कहाणी ऐकण्याच्या उत्सुकतेने ! परंतु या बहिष्कृतीच्या काळामध्ये माझ्याविषयी आस्था दाखविणारे, उत्सुकता असणारेही काही लोक मला भेटायला लागले. ते होते पोलीस विभागातले, सी. आय. डी. खात्यातले लोक. साध्या पोशाखातले हे लोक. काही लोक माझ्या घराभोवती घिरट्या घालत. एखादा दुसरा पाळीपाळीने माझ्या घराजवळ असलेल्या एका चबुतऱ्यावर बसून माझ्या किंवा माझ्याकडे येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांकडे लक्ष ठेवीत आहे असे दिसे. ग्वाल्हेरला येऊन शनिवारी कोर्टात गेलो की, तेथेही माझ्यावर लक्ष ठेवणारी ही मंडळी माझ्या आसपास घुटमळत. मी ग्वाल्हेरला येई नि ग्वाल्हेरहून दिल्लीला जाई. त्यावेळीही ग्वाल्हेरच्या रेल्वे-स्टेशनवर माझ्याकडे आपुलकीने लक्ष पुरविले जाई. मला हे सर्व कळे—समजे. कारण ह्या मंडळींतल्या पुष्कळांना मी पूर्वीपासून चांगला ओळखत होतो. त्यांमधले काही तर सरळ मजजवळ येत नि मला विचारीत आणि मी दिलेली माहिती गुप्त रिपोर्टांत लिहून आपल्या कर्तबगारीचे सर्टिफिकेट ते मिळवीत असावेत. काही ओळखीचे बिचारे माझ्याविषयी मनातून आदर बाळगीत व मला हळूच मदतही करीत. माझ्या दिल्लीहून होणाऱ्या येरझाऱ्यांच्या दिवसांत एकदा मी एक महत्त्वाचा पुराव्याचा कागद ग्वाल्हेरहून आणायला म्हणून जज्ज आत्मचरण यांना भर कोर्टात सांगून ग्वाल्हेरला आलो. कारण कागद मिळविण्यात, परत जाऊन कोर्टात हजर होण्यास एखाद्या दिवसाचा उशीर झाला असता. पण ग्वाल्हेरला येऊन पहाटे गाडीतून खाली उतरताच माझ्या माहितीतला एक सी. आय. डी. कर्मचारी मला प्लॅटफार्मवर भेटला. जणू माझी वाट पाहात आहे अशा उत्सुकतेने ! आणि त्याने मला सांगितले काय ? तर 'दिल्लीहून वायरलेस आला आहे. तुम्ही परत जाल तेव्हा तुमच्या सामानाची नीट काळजी घ्या. कदाचित तुमची पेटी चोरीला जाण्याची शक्यता आहे !' मी परत जायच्या दिवशी तो कदाचित स्टेशनवर ड्यूटीवर नसणार म्हणून त्याने बिचाऱ्याने धडपड करून मला ही माहिती पुरवली ! परत जाताना मी माझ्या सूटकेसला तीन कुलपे तर लावलीच, पण एक चांगलीशी साखळी घेऊन तिचे एक टोक सूटकेसच्या कडीत अडकवले व एक माझ्या मनगटालाही अडकवले नि त्यालाही कुलपे घातली ? आणि अशा बंदोबस्ताने आपल्या बर्थवर आडवा होऊन रात्रीच्या त्या प्रवासात जवळजवळ जागतच दिल्लीला गेलो होतो !

[ क्रमशः ]


**पॅपिलॉन**

**पॅपिलॉन**

**लेखक : हेन्री शॅरीयर**
**अनुवाद : रवींद्र गुर्जर**

**किंमत : पंचवीस रुपये**
**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

पुस्तके

विचारांना नवी दिशा देणारे नाट्यविषयक चिंतन

# नीरक्षीर

रविकिरण साने

गेल्या पंचवीस वर्षांत मराठी रंगभूमीवर फार मोठे चलनवलन चालू आहे. १९४३ च्या नाट्यशताब्दीने कात टाकून पुनरुज्जिवीत झालेली ही रंगभूमी नवनवोन्मेष प्रकट करते आहे. ध्वनी, प्रकाश, नेपथ्यादी तांत्रिक अंगांचे विकासाबरोबरच लोकनाट्य, प्रहसन, रहस्यप्रधान, अभियोगप्रधान, मनोविश्लेषणात्मक, नवनाट्य, नाट्यादी अनेकविध प्रकारच्या नाट्यवस्तूंची हाताळणी अत्यंत कौशल्याने होताना दिसते आहे. व्यावसायिक रंगभूमीला तर, हिंदी चित्रपटासारखे ग्लॅमर प्राप्त होऊ लागले आहे. रंगभूमीवर पुन्हा सुवर्णयुग अवतरत असल्याची भाकिते खाजगीत ऐकायला मिळत आहेत. अवघ्या पाऊणशे वर्षांत दुसरे सुवर्णयुग वगैरे पाहणाऱ्या या रंगभूमीच्या या झगमगाटी स्वरूपाचे स्वागत करताना सुबुद्ध रसिक मात्र अस्वस्थच राहिला आहे. रंगभूमीच्या संख्यात्मक भरभराटीच्या या सुवर्णकलशातून नीरक्षीरविवेक करायचा ही खरोखरच अवघड गोष्ट आहे. सुबुद्ध रसिकाच्या विचाराला चालना देणारे, त्याला अंतर्मुख करून त्याच्या अंतरिक तळमळीला आवाहन करणारे लेखन डॉ. स. गं. मालशे यांनी प्रसंगोपात केले आहे. या स्फुट लेखनांचे संकलन 'नीरक्षीर'च्या रूपाने मराठी वाचकांसमोर येते आहे.

डॉ. मालशे हे संशोधक आणि वाङ्मय समीक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. आजवरची त्यांची ग्रंथसंपदा बहुशः संशोधनविषयक वा साहित्यसंपादनाची आहे. अर्थात यूजीन ओनीलच्या स्ट्रेंज इंटरल्यूडचे एक सरस भाषांतर 'सुख पाहता' त्यांचे नावे जमा आहे. रंगभूमीशी नट व नाटककार या दोन्ही भूमिकांतून त्यांचा जवळून संबंध आला असला तरी, ते कलासमीक्षक म्हणूनच विख्यात आहेत. गेल्या वीस वर्षांत विविध प्रसंगी त्यांनी जे नाट्यविषयक लेखन केले, त्यांतले निवडक नऊ लेख यात समाविष्ट आहेत. या संग्रहातील निवड कोणत्या निकषावर केली हे मात्र समजत नाही. म्हणजे समीक्षादृष्ट्या त्यातला प्रत्येक लेख चांगला आहे. पण एकूण संग्रहाला मात्र त्याने विशिष्ट रूप प्राप्त होत नाही. तीन चार वेगवेगळे गट यामध्ये दिसतात. नाट्याचार्य खाडिलकरांची गद्य नाटके व काणेकरांची नाटके असोत, एका लेखकाची नाटके चर्चिणारे लेख यात आहेत. तसेच 'एकच प्याला', 'शारदा' या गाजलेल्या नाटकांसंबंधी काही वेगळे विचार मांडणारे लेख आहेत. स्ट्रेंज इंटरल्यूड आणि नाटककाराच्या शोधात सहा पात्रे ही अनुक्रमे यूजीन ओनील व लुइजी पिरँदेलो यांची गाजलेली नाटके व त्यांचे रंगभूमीवरील परिणाम याचा विचार केला आहे. मराठी रंगभूमीचा गेल्या पाऊणशे वर्षांचा सर्वांगीण आढावा घेऊन काही मूलभूत प्रश्न निर्माण करणारा, 'मराठी रंगभूमीवर शोध ज्योत' हा एक वेगळाच विषय आहे, तर दुसऱ्या एका लेखात स्टॅनिस्लाव्हस्की या सुप्रसिद्ध रशिअन नाट्यनियंत्याची नाट्यशिक्षणपद्धती कशी विकसित झाली याचा आढावा आहे. नटसम्राट नानासाहेब फाटकांसारख्या नाट्यधुरंधराच्या नाट्यविषयक कर्तृत्वाचा आलेख रेखाटणारा एक लेख यात आहे. (हा बहुधा विशेष प्रसंगी लिहिलेला कौतुक लेख असावा असे वाटते.) असे बहुविध विषय एकाच संग्रहात ग्रंथित करण्यात आले आहेत. त्यामुळे त्याला एक प्रकारचे विस्कळीत स्वरूप प्राप्त झाले आहे.

संशोधकाच्या वृत्तीतला परखडपणा, चिंतनशीलता, परंपरागत विचाराला धक्का देऊन वेगळा विचार प्रतिपादण्याची हातोटी हे सर्व गुण तर त्यांच्या लेखनात जागोजागी दिसतात, पण डॉ. मालशांचे लेखन डोक्यात हातोडी हाणणाऱ्या अभिनिवेशी नाटक्या समीक्षकाचे नाही, हे तर ते स्वतःच सांगतात. डॉक्टरांचा रंगभूमीशी जवळचा संबंध असल्याने आणि त्यांचे मार्गदर्शक अनंत काणेकर, प्रा. विद्याधर पुंडलिक, प्रा. रमेश तेंडूलकर यांच्यासारखे रंगभूमीवर काही नव्या जाणीवा जागवू पाहणारे असल्याने रंगभूमीविषयीच्या आपुलकीने, जिव्हाळ्याने हे लेखन त्यांच्या हातून घडल्याचे जाणवते. अनेक प्रसंगी अभ्यासूपणापेक्षा जिव्हाळा वरचढ होतो असे दिसते आणि ह्या जिव्हाळ्यामुळेच अभिनिवेश नाही व स्थितप्रज्ञ तटस्थपणाही ते धारण करू शकत नाहीत, आणि त्यामुळेच हे लेखन कोणा परस्थ विचारवंताचे न वाटता, तुमच्या आमच्या सुखदुःखावर नेमके बोट ठेवणाऱ्या आपल्याच माणसाचे वाटते.

मराठी रंगभूमीच्या पाऊणशे वर्षांच्या वाटचालीचे परखड विवेचन करताना मराठी नाटकाने शारदेच्या पुढे किती मजल मारली ह्या अस्वस्थ करणारा प्रश्न ते टाकतात. धंद्याच्या दृष्टीने मराठी रंगभूमी यशस्वी असेल, तिने काळाचे आव्हान स्वीकारून राष्ट्रीय कामगिरी बजावली असेल, पण सरस्वतीच्या गंगाजळीत अभिजात कलाकृती किती गोळा झाल्या हा विचार अस्वस्थ करणारा ठरतो. 'काव्याच्या किंवा कथेच्या क्षेत्रात अंतर्गत विकासाचे जसे स्पृहणीय चित्र पाहावयास मिळते, तसे नाट्यक्षेत्रात पाहावयास मिळत नाही.' 'रसिकांना अंतर्मुख करील वा आत्मिक समाधान देईल असे सत्त्व मराठी नाटकात फार थोडे गवसते' ही त्यांची ऑब्झर्व्हेशनस् कटू असली तरी मान्य करावी लागतात. कलात्मकदृष्ट्या मराठी नाट्याची पिछेहाट हेतूप्राधान्य आणि नाट्यसंगीताला लागलेले अनिष्ट वळण या दोन बलवत्तर कारणाने झाली असे ते निर्भिड-

पणे सांगतात. नाट्यसृष्टीतील लोकांवर हल्ले चढवत असतानाच ते प्रेक्षकांनाही यातून वगळत नाहीत. संगीतवेड, सनातनी-वृत्ती, बेगडी सुधारणावादित्व, दोन ध्रुवी, भडक चित्रवाणी स्वभावतःच आवड, मानवी मनाची गुंतागुंत न पेलणारी असल्याने ठोकळेबाज सुष्टदुष्टतेत रमणारे त्यांचे मन, असे अनेक दुर्गुण या प्रेक्षकांमध्ये गोळा झाले आहेत. त्यामुळे सवंग नाट्यनिर्मितीला भरपूर खाद्य मिळते आहे आणि वास्तव जीवनदर्शन अडगळीत जाऊ पाहात आहे. अर्थात गेल्या काही वर्षांत रंगभूमीवर चालू असलेल्या विविध प्रयोगांनी नाट्यासंबंधी व प्रेक्षक यांच्या जाणिवांच्या कक्षा रुंदावत आहेत याची जाणही ते ठेवताना दिसतात. अर्थात हे सारे फारच प्राथमिक आहे. पद्धतशीर प्रशिक्षण हेच रंगभूमीला अधिक डोळस बनवेल हे सांगायला ते विसरत नाहीत.

'एकच प्याला' या गडकऱ्यांच्या नाटकाचा मानसशास्त्रीयदृष्ट्या त्यांनी केलेला पुनर्विचार त्या शोकात्मिकेला एक नवंच परिमाण प्राप्त करून देणारा आहे. 'एकच प्याला' हे दारूच्या दुष्परिणामांचे नाटक आहे. सुधाकर दारूच्या नशेतच बेभानपणे पुत्रहत्या करतो, असा सरळसोट विचार आजपर्यंत प्रचलित आहे. त्यामुळे प्रचारी थाटाचे नाटक म्हणून एकप्रकारचे गौणत्व त्याला प्राप्त झाले आहे आणि त्या नादात ती एक स्वतंत्र शोकात्मिका आहे, वाटते त्यापेक्षा अधिक सूक्ष्म, गहिरी आहे, याकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले. या संदर्भात एक वेगळा संदर्भ पाहण्यासारखा आहे. काम्यूच्या अस्तित्ववादाच्या सर्वंकष उहापोहाच्या नादात त्याच्या 'आऊटसायडर' या कादंबरीकडे अस्तित्ववादाची एक साक्षिणी म्हणूनच केवळ पाहिले जात होते आणि त्याचे स्वतंत्र मूल्यच विसरले जात होते. त्याच्या बाबत नेमके हेच घडते. सिंधू व्यभिचारी आहे, रामलालशी तिचा वामसंबंध आहे, असे संशयपिशाच्च सुधाकराच्या मनात रेंगाळते आहे. आणि या संशयबीजाचा स्फोट 'रामलालचे कारटे' या विपारी उद्गारांनी होतो. हा डॉ. माळशेंनी मांडलेला विचार नाटकाच्या सर्वच व्यक्तिरेखांना एक वेगळे परिमाण देतो. आणि मग या विचारामुळे ही शोकात्मिका दारूड्या सुधाकराची न राहता, नवकोट नारायणाच्या दुर्दैवामागे फरफटणाऱ्या कारुण्यमूर्ति कन्येची–सिंधूची–होते. सुधाकराच्या काठीने केवळ पार्थीव मुलाची हत्या होत नाही तर सिंधूचे पातिव्रत्याचे तत्त्वज्ञानच बळी जाते. आणि ही शोकात्मिका अधिकच गडद होते.

नाट्याचार्य खाडिलकरांच्या आणि काणेकरांच्या नाटकांचा त्यांनी घेतलेला परामर्श असाच वेगळेपण सांगणारा आहे. खाडिलकरांनी आत्मसात केलेले शेक्सपिअर तंत्र आणि काणेकरांनी पचवलेले इब्सेन तंत्र त्यांनी विस्ताराने कथन केले आहे. अर्थात खाडिलकरांच्या स्वतंत्र रचना वा काणेकरांची रूपांतरे आपले खास स्वतंत्र अस्तित्व कसे जाणवून देतात, हेही ते खुबीने दाखवतात.

मराठी रंगभूमीचा विचार करताना ती बहुशः पाश्चात्यपुष्ट आहे, हे लक्षात ठेवावे लागते. त्यामुळेच पाश्चात्य नाटककारांच्या मूळ कृतीचे समीक्षण, विचारमंथन आणि त्यांच्या जीवनाचा मागोवा घेणे अपरिहार्य ठरते. म्हणूनच ते स्ट्रेंज इंटरल्यूड आणि सहा पात्रेसारखी लोकविलक्षण नाटके समीक्षेसाठी निवडतात. 'स्ट्रेंज 'मध्ये यूजीन ओनील, भाषणे, स्वगते आणि जनांतिके या जुन्या तंत्राचा वापर इतक्या नावीन्यपूर्ण व धाडसी पद्धतीने करतो की, कोणीही आचंबित व्हावे. प्रकट भाषणाबरोबर उठसूठ मनातले विचार स्वगतांच्या रूपाने यांतली पात्रें बोलत राहतात आणि तेही चक्क नऊ अंक. या कालात सुमारे पंचवीस वर्षांचा घटनाक्रम ते मांडतात. हे सारेच विलक्षण आहे. पण हे तंत्रच नव्हे तर त्याची कथाही लोकविलक्षण म्हणूनच त्याचा सविस्तर विचार आवश्यक ठरतो. 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे'-मध्ये पिरँदलो एक वेगळेच तंत्र अवलंबतो. नाटककाराने अपुरी सोडलेली सहा पात्रे जिवंत होऊन येतात, अशी भूमिका तो घेतो आणि सद्यःघटित सुखात्मिकेच्या तंत्राने ते रंगमंचावर साकारतो. नाटकामध्ये आणखी एक नाटक घडत जात असल्याने वास्तव मानवी जीवन, त्यांची नाटककाराच्या संकल्पनेतली स्वभावचित्रे आणि नटांकडून होणारे त्यांचे पूर्तीकरण या तीन पातळ्यांवर हे नाटक पुढे सरकते आणि एक विलक्षण धक्कादायक अनुभव देत राहते.

नाटकामधले सूक्ष्मानुभव नटाने व्यक्त केले पाहिजेत, असे प्रतिपादन करत असताना त्यासाठी प्रशिक्षणाचा आग्रह डॉ. माळशे धरतात. त्यामुळे सतत विकसत जाणारी स्टॅनिस्लाव्हस्कीची नाट्यशिक्षणपद्धती वाचकांसमोर मांडणे त्यांना आवश्यक वाटते. स्टॅनिस्लाव्हस्कीचे सारे जीवनच चितारत ते त्याच्या अनुभवा, प्रयोगाबरोबरच ही पद्धती विकसत कशी गेली हे सांगतात. हा विकास मूळातूनच वाचण्याजोगा आहे. सध्या सर्वत्र फोफावलेले Improvisation याच्याच चरित्रात शतकारंभी आपणाला दिसते.

अशा तऱ्हेने नाट्यविषयक विविध अंगांवर अभ्यासपूर्ण पण जिव्हाळ्याने लिहिलेले हे सारे लेख आपल्या विचारांना नवी दिशा देतील एवढे निश्चित. ◻

**नीरक्षीर : डॉ. स. गं. माळशे**
पृ. १३५ मूल्य ११ रु.
विश्वमोहिनी प्रकाशन
६१/१२ एरंडवणे, पुणे


पूर्णिया

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

# परंतु दादा कोंडके सोंगाड्या इतके झाले!



नंदू राजे

लेखांक तीन

विच्छा माझी पुरी कराच्या तुफान यशाच्या वाटचात लेखक व अभिनेता म्हणून वसंतरावांची कामगिरी अगदी बेतात्रेताची ठरावी हे उघडच आहे. अलीकडेच एक सुप्रसिद्ध मराठी टीकाकार या संबंधात बोलून गेले की, सबनीस तसे सामान्य कुवतीचेच लेखक आहेत म्हणून. हा मुद्दा जरासा विवाद्य धरलाच तरी विच्छा सोडून वसंतरावांनी लिहिलेली इतर वगनाटय नामांकित आपटली. एवढेच नव्हे तर, त्यांनी लिहिलेला व निर्मित केलेला–निळू फुले, रामु नगरकरला घेऊन–ह्न्या नाऱ्या झिंदाबाद हा बोलपटदेखील कोसळलाच. पण विच्छाच्या व्यावसायिक यशामागे वसंतरावांचा कुशल संघटक हात होता असं मात्र सर्वसाधारणपणे मानलं जातं. ते खरंच असावं.

> 'वसंतराव मला माझ्या मोठ्या भावासारखे वाटत असत,' दादा प्रांजलपणे म्हणाला.
>
> 'ते माझ्यामागे उभे राहीले हे निश्चित खरं आणि म्हणूनच मला त्यांचं जोड वागणं अधिकच लागलं. पण त्यांच मला झालेलं मार्गदर्शन मोलाचं होतं यात शंका नाही. पण आज वसंतराव विच्छातील राजकारणाचा बाज बाजूला ठेवून तुस्तंच साधं लोकनाटय करूया म्हणून सांगतात हे पटत नाही. वळण वदलून विच्छा नक्कीच रंगणार नाही!'

स्थळ कोल्हापूर. वेळ सकाळी सात-साडेसाताची. पाडगावकरांच्या छोरी कवितेतल्या कावळयांची शाळा अजून उघडायची होती. थंडी मी म्हणत होती. दादा कोल्हापुरात 'तुमचं आमचं जमलं'च्या शूटिंगनिमित्तानं तळ ठोकून बसला होता. पांडू हवालदारचा उद्घाटन शो वगैरेदेखील असावा. याला पकडण्यासाठी मी तिथल्या टूरीस्ट हॉटेलावर धडकलो होतो. अगदी स्टेशनावर उतरल्या उतरल्या थेट हॉटेलात. आकस्मिक. दादाला काही न कळवता सवरता.

पूर्वी दादा कोल्हापूरला शूटिंग असलं की, बहुधा सगळ्या युनिटबरोबर सोळंकी लॉजमध्ये उतरायचा. तर यावेळी हा टूरीस्ट, टेक्निशिअन मंडळी सोळंकीत अन् ॲक्टर, डायरेक्टर, मॅनेजर रामटेकमध्ये. टूरीस्ट हॉटेल कोल्हापुरातलं त्यातल्या त्यात बरं मानलं जातं म्हणे... तेव्हा आताचा मिलीओनेअर दादा तिथं उतरावा यात फारसं आश्चर्य नाही, असं म्हणत मी हॉटेलावर धडकलो. टूरीस्ट बऱ्यापैकी हॉटेल मानलं जात असेलही, पण ओबेराय शेरेटन, ताजमहालसारख्या फाईव्ह स्टार चोचल्यावर थोड्याफार भ्रष्ट झालेल्या माझ्यासारख्या सिनेपत्रकाराला दादरातलं कबूतरखान्याजवळचं रामनिवास आणि टूरीस्ट यात थोड्याफार डिग्रीचाच फरक वाटतोय.

'दादा कोंडके ना? सात किंवा नऊ नंबरमध्ये बघा.' रिसेप्शनिस्ट म्हणाला.

सात नंबरला आतून कडी. नऊ नंबरचं दार सताड उघडं. आत कुणी न्हाऊन माखून बाहेर जायला सजलेला; विग घातलेला तरुण

**" मी नसेन तर विच्छा शून्य आहे.**
**माझ्याशिवाय ते उभेच राहू शकणार नाही. "**

**विच्छाचं प्रचंड यश**
**आणि**
**तांबडी माती चित्रपटाचं दारुण अपयश**
**दादाला बरंच काही सांगून गेलं.**
**दादातला क्वाएट कॉन्फिडन्स**
**इथेच नेमका जागा झाला.**
**आणि दादानं विच्छाचाच सोंगाड्या**
**तमाशाच्या बोर्डावरून अलगद उचलून**
**थेट सिनेमाच्या पडद्यावर नेला....**

नमस्कार चमत्कार, ओळख वगैरे. ' दादा काल शिकारीला गेले होते, पहाटे पाचानंतर आलेत. ' बसा बसा वगैरे आतिथ्य....' आंघोळ, नास्तापाणी काय करणार काय ? दादांनी आठ वाजता उठवाच म्हणून सांगितलंय्. नवाला शूटिंग चालू व्हायचंय्. '

हे एक मी दादाच्या बाबतीत हेरून ठेवलंय. त्याच्या अपरोक्षदेखील त्याच्या युनिटमधली सर्वच माणसं, पत्रकारांशी नैसर्गिक आतिथ्यशील वागतात ही जाण किंवा शान मराठी निर्मात्यांकडे अभावानेच दिसते.

' शांतारामबापूंकडे जाऊन पहा. चार चार तास थांबवून घेतील न मागाहून वेळ नाही म्हणून सांगतील. साला आपण बरा माणूस म्हणून तुमच्याशी असा मोकळा, ढाकळा रुबाब न दाखवता वागतो. ' दादा एकदा म्हणाला.
' ते सांगू नकोस हा दादा, तुला सोयीचं, फायद्याचं असतं, म्हणून तू पत्रकारांची बडदास्त ठेवतोस. '
' आयला तुम्ही नावं ठेवलीत म्हणून माझा पिक्चर पडणार काय ? खरं सांग. '
' नाही ! '
' मग ? '
' तरीही दादा तुझ्या पिक्चरसंबंधी अॅडव्हान्स गाजावाजा करायला, फोटो छापायला, पिक्चरला प्रसिद्धी द्यायला पत्रकार उपयोगी पडतातच की नाही ? आता तू खरं बोल ?'
' हो. '
' मग ?' आता दादाला आपला चॅलेंज,
' चल रे पाहुण्यांशी असंच वागायचं असतं. आपली पद्धत म्हणून ! '
' तू साला चांगलाच पहुँचा हुवा माणूस आहेस दादा. '
मला आठवतं. यावर दादा खो, खो हसला होता. ' तर आयला काय गम्मत झाली, तुझा तो...' करत कुणा पत्रकाराचा गंमत-किस्सा सांगायला लागला होता.
इथं विगवाल्या स्मार्ट तरुणाची न इतर दोघांची लगबग चालूच होती. चहा पिता पिता माझी टय़ूब पेटली.
' तुमचं नाव मुझुमदार काय ?' विगवाल्याचा चेहरा भलताच ओळखीचा वाटत होता.
' म्हटलं, ओळखायला किती वेळ घेतोस ते पाहू. ' विगवाला मोठ्याने हसला.
' आयला तू इथं काय करतो आहेस, शिवाय विगबिग घालून. का दादानं अख्ख्या युनिटला स्वतःबरोबर विग दिलेत. '

मुझुमदार आणखीनच मोकळा हसायला लागला.

'पांडू हवालदार न तुमचं आमचं जमलं ची स्टोरी माझीच आहे.'

माझा कपाळावर हात...' राजेश मुझुमदार तो तूच...'

'होय की. आत्ता जमलं की नाही तुमचं आमचं.'

अनेक वर्षांनी भेट झालेली माझी न राजेशची. तीदेखील अशी. हा माझा शाळा दोस्त. माझ्याच वर्गात होता दोन-तीन वर्षं. भलताच गरीब वगैरे होता स्वभावाने. वडील उत्तम चित्रकार. बडोद्याच्या कला निकेतन स्कूल-मधले. पोर्ट्रेट्स् फारच सुरेख काढत असत. मी यांच्या घरीदेखील जायचो. जवळच राहात होतो. मला उगाउगा एक लाजरा बुजरा हापपँटीतला पोरगा आठवत राहीला.

'तुझी दादाशी ओळख कशी झाली? पांडू हवालदारची बैठक कशी जमली?' मी राजेशला विचारलं.

'तू आहेस न इथं? सावकाशीनं गप्पा मारू या. चल. दादांना उठवायची वेळ झाली.'

मागाहून राजेशनं पांडू हवालदारसंबंधीचा किस्सा सांगितला. राजेशचं लग्न झालं होतं. नीलांबरी शिरोडकरच्या–विच्छातली नाचणारी हिरॉईन, जी दादाकडेच राहाते–तिच्या धाकटया बहिणीशी. राजेशचं वाचन वगैरे उत्तम. म्हणाला, 'दादा आंधळा मारतो एक डोळानंतर कथानक शोधत होते.' एकदा राजेश म्हणाला, 'दादा एक गोष्ट आहे माझ्याजवळ. समजा तुम्हाला पोलिसाच्या हाफ पॅण्टमध्ये पडद्यावर आणलं तर कसं होईल? गोष्ट त्याच्याभोवती बेतायची.' दादा बहुधा खूपच झाला असणार. एक तर दादाला स्वतःच्या कॉमेडीसाठी फक्त एखाद्या सेंट्रल जर्मचीच जरुरी असते. त्या भोवतीचं कथानक, पंचेस्, गॅगस् यांचे तपशील गुंफायला फारशी अडचण त्याला पडत नसावी. चॅप्लीन एकदा म्हणाला होता, 'कॉमेडीचा प्लॉट तयार करणं ही अत्यंत साधी गोष्ट आहे...त्यात फक्त सोंगाडयाला तकलीफमध्ये आणणं आणि त्यातून त्याला बाहेर काढणं याचाच तपशील ठरवायला लागतो.'

चार्ली चॅप्लिनच्या आधीच्या काळातली मॅक सेनेटच्या किस्टोन कंपनीतली कॉमेडी नुस्तंच सोंगाडयाला (अथवा क्वचित सोंगा-डिणीला) कॅमेऱ्यासमोर सोडून द्यायचं; तो नैसर्गिक प्रतिक्रियांतून आदळत, आपटत, पडत, झडत राहायचा न् या सर्व पडझडीचं अंतिम पर्यवसान त्याचा कुणीतरी पाठलाग करण्यात व्हायचं. 'व्यक्तिशः ह्या पळापळीचा व पाठलागाचा मला अत्यंत तिरस्कार होता' चॅप्लिन म्हणाला होता. 'कारण हा पाठलागाचा भाग सोंगाडयाच्या व्यक्ति-मत्त्वाचा निश्चितपणे ऱ्हास करतो आणि जरी मला त्यावेळी सिनेमा-बद्दल फार काही कळत नव्हतं, तरी नथिंग ट्रान्झिएंट्स् पर्सनॅलिटी ह्याबद्दल मी ठाम मताचा होतो.'

आणि त्याच स्वतःच्या अंगभूत वळणाच्या सोंगाडयाला, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा, प्रकृतीचा ऱ्हास न करता त्यांत वेळोवेळी गरज पडेल तशी भर घालत दादानं विच्छाच्या बोर्डावरून थेट सिनेमाच्या पडद्यावर नेलेलं आहे. एकप्रकारे दादाची सिनेमांतली रूपं ही विच्छा-मधल्या सोंगाड्याचीच एक्सटेन्शनस् आहेत. ही नथिंग ट्रान्झिएंट्स् पर्सनॅलिटी ही स्वतःबद्दलची जाण चॅप्लिनला त्याच्या किड ऑटो रेसिस अॅट व्हेनीसमध्ये गवसली, तर दादाला विच्छाच्या यशात. टूरिस्ट हॉटेलच्या नऊ नंबरातल्या खोलीत दादा विच्छातल्या ढोलकं वाजवणाऱ्या पोराकडून अंग रगडून घेत होता. डोक्याला टक्कल झाकायसाठी स्कल कॅप, चट्टेपट्टेरी पायजमा न धुवका झब्बा. उपडं पडल्यामुळं तोंड उशीत खुपसलेलं, पण ये वगैरे म्हणून दादाचं बोलणं लगेच चालू.

> 'दादा, निदान खोबरेल तेल लावून तरी मालिश करुन घे.'
>
> 'हाय कारे ह्म्य? आपल्याकडे खोब्रेल' हे रगडणाऱ्याला. दादाच्या खोलीत खोबरेल तेल कशाला असेल. हा मनुष्य एकूणच शारीरिक सुखासिनतेबद्दल उदासीन. जेवण्याखाण्याबद्दलसुद्धा तसंच. 'आयला, जेवून उठल्या-वर आपल्या लक्षातसुद्धा येत नाही की, वांग्याची भाजी खाल्ली का मटण?'

'बस झालं रे' असं मालिशवाल्याला सांगत दादा टूणकिनी बिछान्यावर उठून बसला. 'साला नऊला शूटिंग करायचंय. माझाच पहिला शॉट आहे' असं म्हणत. नंतर झटपट तंबाखूची मशेरी लावून दात घासणं, झटपट प्रातर्विधी, आंघोळ इत्यादी. हे सर्व करताना गप्पा, किस्से चालूच. थोडक्यात मी आलेल्या मुख्य कामाच्या विषयावर हा येतच नाही. त्यात हा रात्रभर शिकार खेचून आलेला, म्हणजे मारलेल्या भल्या थोरल्या डुकरापासून तर सर्वांची त्रेधा-तिरपिट झाल्याची वर्णनं, अॅक्टिंग चालूच. बाथरूममध्येदेखील हा आपण एका नटीबरोबर संडासात कसे अडकलो न् बाहेर यायचे (तिचे न् याचे) वांधे कसे झाले, हेच सांगत राहिलेला. ह्याची साधी कामगारी नाडीबटनवाली चट्टयापट्टयाची चड्डी बघून दादा आता काही श्रीमंती इलास्टिक वगैरे, चड्डी घे म्हटलं तर एकदा चौदा रुपये पंच्याण्णव पैशांची चड्डी आपण कशी घेतली न् ती हॉटेलच्या बाहेर, तारेला वाळत कशी घातली न् ती आपली आहे, हे कसं विसरून गेलो, न मागाहून उडालेली गंमत हा सांगायला लागला. सांगणं अर्थातच रंगवून वगैरे. स्वतःचा फज्जा उडलेले, स्वतःची टिंगल-मस्करी सेल्फ रिडिकूल करणारे किस्से दादा नेहमीच (आणि स्वतःदेखील ते एन्जॉय करत) सांगत असतो. किंबहुना इतरांची टिंगल करण्यापेक्षा स्वतःचीच टवाळी दादाच्या बोलीभाषणात आढळते. शिवाय दादाचे हे असले किस्से म्हणजे व्यक्तिशः माझा मोठाच विक पॉईंट आहे. त्यांच्या तोलबरोबरी दादाला मी नेहमी हजार गुन्हे माफ करायला तयार असतो. इतकं मी त्याच्या संगतीत दादाबद्दलचं इतर विसरून जातो. केवळ हसण्यात गुंतून जातो.

> 'आयला, आजकाल पेपर वाचण्यात काही दमच राहिला नाही. पेपर कालचा का आजचा, हेच कळत नाही'

दादा त्या दिवशीचं वर्तमानपत्र नुस्तीच, अत्यंत जुजबी नजर टाकून खाली टाकतो.

'पूर्वी आपण हा पेपर अमुकतमुक संपादकानं अमुक-तमुक छापखान्यात छापून इथं-तिथं प्रसिद्ध केला इथपर्यंत वाचायचो. आणि रात्री विच्छाच्या प्रयोगांतून लय भंकस करायचो त्या बातम्यांवरून. आता पेपरांत काही इंटरेस्टच राहिला नाही.'

'दादा, विच्छा बंद करायचं नक्की ठरवलंस ?'

'हो रे, आता त्यात काही दम नाही राहिला.'

'राजकारणाचा भाग वगळून बाकी वेगळी टिंगलटवाळी करून विच्छा चालणार नाही, असं तुला वाटतं ?'

'तुला काय वाटतं ? वसंतरावसुद्धा विच्छा चालू ठेवाच म्हणून लकडा लावून आहेत.'

'मी तुला विचारतोय' दादाला माझ्या सल्ल्याची जरुरी नाही, हे मला पक्कं ठाऊक आहे.

'शक्य नाही. कुणीही काहीही म्हटलं तरी विच्छाचा बाज शहरी होता. त्यात चालू राजकारण आणल्या-शिवाय उठावच येणार नाही. तुला माहिती आहे, विच्छा शहरातच जास्त पॉप्युलर झालं. खेडोपाडी आम्हाला तिकडल्या चालू भानगडी मिळेवून जागा घ्यायला लय मिनतवारी कराय लागायची.'

आता दादा, अंजनाच्या, त्याच्या चालू पिक्चरच्या हिरॉईनच्या मेकप सामानांतून पावडर मागून तोंडाला फासतोय.

'हे अंजनाचं सामान तुझ्या खोलीत कसं आलं ?'

'साला बायांच्या भानगडीत पडू नकोस... आपण पण आता मिसा आल्यापासून बाईच्या भानगडीत पडत नाय.'

विच्छामधल्यासारख्या अशा उत्स्फूर्त डॉयलागचा नॉस्टॅलजिया दादाच्याबोलण्यात आता वारंवार आढळतो. जणू बोर्डावरून हाणलेल्या अशा संवादांना थिएटरभर हसणाऱ्या पब्लिकच्या दादीची आठवण, सुप्त तहान, दादा आता मूठभर आजूबाजूच्या प्रेक्षकांना हसवून, भागवून घेतो. आता विच्छाच काय, पण दुसरं कुठलंही इनर नवं लोकनाट्य दादा आता बोर्डावर आणणार नाही अशी माझी खात्री आहे. इतका प्रचंड यशस्वी नवा वग आपण पुन्हा करूच शकणार नाही ही जाणीवदेखील त्याच्यामागे असणारच, पण तरीही दादू इंदूरीकराकडून थोडं फार उचललेलं वळण स्वतःच्या प्रकृतीसाठी राबवून या सोंगाड्यानं वगाच्या बोर्डाकडे पाठ फिरवली आहे. नव्यानं येणाऱ्या सुहास भालेकर किंवा यशवंत दत्त यासारख्या टॅलेंटेड पोरात दादाचा हा बाज, हे वळण टिकून राहाणार आहे...कदाचित वाढणार आहे

जागा घेऊन आमनेसामने पब्लिकची दाद, टाळी घेण्याची कुठल्याही सोंगाड्याला वाटणारी–पण दादाच्या बाबतीत आता सुप्त–इच्छा ही कदाचित दादाच्या पुढल्या सिनेमात जास्त प्रकर्षानं जाणवेल, दिसेल असंही मला वाटतं... त्याच्या पांडू हवालदारमध्ये रस्त्या-वरील मॅनहोलमध्ये पडलेला पांडू, समुद्रावरील गटारांत बाहेर पडतो ते पिंजरा व चोळी घेऊन, शांताराम बापूंच्या चित्रपटांची टवाळी करत...किंवा त्याच दिवशी कोल्हापूरात चित्रीत होत असलेल्या तुमचं आमचं जमलंच्या चित्रीकरणांत, एका मृत्यूपत्राच्या सिनमध्ये 'आयला पण हे मृत्यूपत्र यांनीच लिवलं कशावरून. कुणी बदललं असेल...इतिहासांत नाय का संध्याबाईंनी 'ध' चा 'मा' केला असा डॉयलाग दादा मारतो. (याला बदली म्हणून दुसराही एक शब्द दादांनी आधीच घालून टाकलाय.) आणि संध्या-बाईंनी नाय हो आनंदीबाईंनी असं इतर कुणी म्हटल्यावर 'असेल कुणी........' असा टवाळी संवाद दादा करतोच. आणि विच्छाचाच नॉस्टॅलजिया आहे असं मला वाटतं...

किंवा तुमचं आमचं मध्ये असाच दुसरा प्रसंग कुणा बहिऱ्याशी दादा बोलत असतोय...

'काय पावणं लय चांगली फिगली कापडं लेवून निघा-लात...काय मुंजीला चाललाय व्हय' इति दादा.

'नाय झुंजीला नाय'

'झुंज बेकार व्हो, पहिल्या टक्करीत आऊट'

याच सिनमध्ये त्या बहिऱ्याला दादा 'आता कान तरी नीट तपासून घ्यावा म्हणतोय तर बहिरा वैतागून आयला मला काय मूळव्याध झालेय तपासून घ्यायला असं उत्तरतो. कान शब्दाच्या ध्वनी उच्चारावर केलेला हा विनोद तर आऊट अॅण्ड आऊट तमाशा आहे.

'पण विच्छा बंद केलीस तर वसंतराव सबनिसांनी तुझी पाठ नाही पुरवली' मी न दादा मुंबैच्या एअर कण्डीशण्ड ऑफिसांत बसलेलो.

'तर एक पत्र पाठवलं. शिवाय त्यांत काही मी त्यांचे दोनशे रुपये देणं बाकी आहेय असंही होतं. मी फोन करून म्हटलं पत्रबित्र कसलं लिहिता. मागाहून त्यांचं एक रजिस्टर्ड पत्र आलं, अमूक तारखेच्या आंत विच्छाचे प्रयोग चालू केले नाहीत तर विच्छा दुसऱ्या कुणाला देऊन टाकतो म्हणून. मी उत्तरच दिलं नाय, आयला माझ्याशिवाय विच्छा आता उभंच राहू शकत नाही,'

'पण तुझे न सबनिसांचे संबंध बिघडायला फुठं सुरुवात झाली.'

'ते सोड रे. तुमचं आमचं चं एक गाणं कापलंय ते मुव्हीओलावर बघू या चल.'

'दादानं वसंतरावांचा जम्पींग बोर्ड करून विच्छा उभं केलं. विच्छाचा जम्पींग बोर्ड करून दादा भालजी पेढांरकरांपर्यंत पोहो-चला. त्यांच्या जोरावर त्यानं सोंगाड्या काढून सिनेमांत पाय रोवला' दादाचा एक निकटवर्ती जुना स्नेही मला म्हणाला, संधी साधणं न सधीसाधू अशा काही शब्दांतल्या चांगल्या वाईट छटा एकमेकांपासून दूर करणं सोपं नाही.' अमाप वैयक्तिक यशाला जाणूनबुजून वा अजाणता दूर गेलेल्यांच्या कडवटपणाची झालर लागणं हा यशाचा अपरिहार्य भाग आहे. मिसा येईपर्यंत दादा विच्छाचे प्रयोग करतच राहिला होता. विच्छाशी संबंधित असलेली दादाचे बहुतेक सर्व सह-

कारी त्याच्या कामाक्षी वितरण वा सदिच्छा पिक्चर्स या सिनेकंपन्यांशी संलग्न आहेतच. या सोंगाड्यानं वर्गबोर्डाकडे वळवलेली पाठ प्रचलित परिस्थितीचा अटळ भाग आहे. भालजी पेंढारकर दिग्दर्शित दादाची पहिली भूमिका असलेलं तांबडी माती सपशेल कोसळलं. तरी दादानं सिनेमाचा नाद सोडला नाही.

'माझं ते अपयश माझ्यापेक्षा बाबांनाच जास्त लागलं' दादा म्हणाला. ते म्हणत राहिले, 'काहीतरी चुकलं.' बाबांच्या त्या विषण्णतेतूनच 'सोंगाड्या' चित्रपटाचा जन्म झाला. दादाच्या टॅलेंटमध्ये भालजींना संपूर्ण विश्वास असावा आणि अर्थात दादालाही.

'सोंगाड्याच्या मूळ कथेचा सांगाडा बाबांनीच तयार केला.' दादा सांगत होता, 'बाबांनीच मला सर्वतोपरी साहाय्य केलेलं आहे. तेच माझे खरे मार्गदर्शक, माझे गुरू. आणि पदरचे अडीच लाख खर्चून तयार केलेल्या सोंगाड्याच्या पेट्या घेऊन आम्ही, कुणी तरी हा चित्रपट वितरणासाठी घ्यावा म्हणून, वणवण फिरत होतो. तेव्हा हेच माझ्याबद्दल आता वाईट बोलणारे लोक सोंगाड्या मिळताहेत त्या साठ हजाराला फुंकून टाक म्हणून सल्ला देत होते. कधी नव्हे ती दादाच्या बोलण्याला कडवट धार आली.

पण कुणाहीसाठी अडून राहाणं, कुणावरही संपूर्ण विसंबून राहाणं दादाच्या स्वभावांत नाही...

त्यानं सोंगाड्या पडद्यावर आणला तो स्वतःचीच वितरण संस्था काढून.........जिद्दीनं, हट्टानं केलेली एक जुगारी बाजी, एक प्रकारच्या डू ऑर डाय स्पिरटनं फेकलेला फासा......

'पण हा सोंगाड्या असा उभा करावा, त्याला ती हाफ पॅण्ट द्यावी हे कुणाला सुचलं. त्याचं हे स्वरूप कसं आणि कुणी बांधलं?'

'तिच्या आयला तू सोडतच नाहीस...' दादा पाय वर ओढून घेऊन खुर्चीवर नीटपणे मांडी घालून बसला. ती पण एक गंमतच झाली बघ...'

[क्रमशः]


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २१ | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |

चित्रचक्कर

# अशा अफवा–अशा गंमती

नीलेशकुमार

आपली फिल्म इंडस्ट्री म्हणजे एक अजब चीज आहे. ही इंडस्ट्री फिल्मी जगातल्या खऱ्या बातम्यांनी जेवढी चालते, त्यापेक्षा खोटया बातम्यांवर, अफवांवर अधिक चालताना दिसते. यत्र यत्र धूमा! तत्र तत्र वन्ही: असे आपल्याकडे एक सुभाषित आहे आणि आज विज्ञानयुगातदेखील ते खोटे ठरलेले नाही. पण आपली फिल्मवाजी यातही आघाडीवर आहे. कारण इथे अफवा उठायला हा अग्नीही लागतोच असे नाही.

केव्हा काय अफवा उठावी, याला इथे धरबंधच नाही. आता शोलेचीच गंमत बघा ना. शोले लागण्यापूर्वी त्याची प्रचंड जाहिरात झाली. असा झाला नाही, असा होणे नाही अशा थाटात सर्वत्र प्रचंड आकाराची पोस्टर्स झळकत होती. ७० एम्. एम्., हाय बजेट वगैरेंचा धडाका चालू होता. मुंबईत हा पिक्चर लागला मात्र, दुसऱ्याच दिवशी शोले 'टोटल फ्लॉप' असल्याची बातमी सर्वत्र पसरली. प्रदर्शित झालेली फिल्म ७० एम्. एम्. नसल्याने त्या वार्तेने खूप मोठे स्वरूप धारण केले. शोले फ्लॉप गेला तर इंडस्ट्री डळमळणार, असे चिंताक्रांत उद्‌गार कोणी काढू लागले. पण अगदीच विनबुडाची असलेली ही अफवा शोलेवर काहीच परिणाम करू शकली नाही. तो पिक्चर अजूनही तुडुंब गर्दी खेचतोय. अगदी राजच्या बॉबीची सारी रेकॉर्डस् त्याने मोडल्याची खात्री सर्वत्र मिळणारी आकडेवारी देते आहे.

धर्मेंद्र, हेमामालिनी ही जोडी इंडस्ट्रीत गॅरेंटेड हीट जाणारी जोडी आहे. स्टोरी काय वाट्टेल ती असो, ही जोडी असली की, बॉक्स ऑफिसची चिंताच नको. ही जोडी जशी फिल्मला हीट ठरली आहे, तशी अफवांच्या दुनियेत हीच जोडी एकदम हीट आहे. हेमा–धर्माबद्दल काहीही सांगा, पब्लिक त्यावर जाम तुटून पडणारच. मध्ये मद्रासहून अगदी स्पेशल न्यूज म्हणून वार्ता प्रसृत झाली धर्मेंद्र–हेमा लग्न करणार. इंडस्ट्रीत जाम धमाल उडाली. हेमाचे पिक्चर कसे पूर्ण होणार, याचीच बहुतेकांना चिंता पडली. पण ही वार्ता दोनच दिवसांत फुसका बार ठरली. पण आमचे अफवाबाज काही स्वस्थ बसेनात. काही दिवस लोटतात न लोटतात तोच बातमी आलीच. गिरीश कर्नाडांशी हेमा लग्न करणार. पुन्हा एकदा धमाल उडाली. पण दोघेही गप्पच. अफवा पुढे वाट चालेना. नवे खाद्य मिळेना. पण कोणाच्या तरी डोक्यात वेगळाच क्लू घोळू लागला. गेल्या वर्षी रामानंद सागरच्या चरससाठी हेमा आणि धर्मेंद्र परदेशात शूटिंगला गेली होती. स्वित्झर्लंड, व्हेनीस, माल्टा इत्यादी ठिकाणच्या या शूटिंगबाबत कोणीतरी कानगोष्ट केली. काय तर म्हणे, हेमा–धर्मेंद्र चिक्कारवेळा समुद्रकिनारी बीचवर हुंदडत बराच काळ एकत्र राहत. झाले, एवढे कळायचाच अवकाश की, अगदी फोटोसह वार्ता झळकतायत. धर्मेंद्र–हेमा एक वर्षापूर्वीच विवाहबद्ध झाले. कशाचा काही संबंध आहे का? पण नाही. त्या दोघांचे शुभमंगल उरकायची इतरांत कोण घाई.

कोणतेही फिल्मी मासिक उलगडा तुम्हाला आश्चर्याचा धक्का देणारी एखादी तरी वार्ता असणारच. चित्रसृष्टीत पुन्हा येण्यासाठी डिम्पल राजेश खन्नाला सोडणार, रेखा शैलेंद्रसिंगशी विवाहबद्ध झाली. मजनून या जन्मी पूर्ण होणे शक्य नाही, राज कपूरने सत्य शिवम्‌च्या यादीतून झीनतला वगळले या आणि अशा आणखी कितीतरी वार्ता रोज झळकत असतात.

अशा अफवांच्या झगमगाटात आपली नाट्यसृष्टीही कमी नाही. आशालता वाबगावकर, भक्ती बर्वे, विक्रम गोखले, लालन सारंग आणि आता यशवंत दत्त हे आपल्याकडचे अफवा विषय. मध्यंतरी विक्रम गोखले भक्ती बर्वे लग्न करणार अशी जबरदस्त वार्ता होती. अफवांना कारणेही तशी मिळाली पण ती शेवटी अफवाच ठरली. पूर्वी आशालता हे अशा अफवांसाठी हीट ठरणारे नाव होते. सध्या भक्ती बर्वे आहे. सध्या अशी अफवा आहे की, भक्ती व टी. व्ही. चे एक वृत्तनिवेदक प्रदीप भिडे हे लग्न करणार. पण दोघांचाही यावर ठाम नकार आहे.

पूर्वी टी. व्ही. वर असलेली आणि सामना निशांतने गाजत असलेली स्मिता पाटील हीदेखील सध्या अफवांच्या जगात नाव कमावून आहे. ती श्याम बेनेगलशी लग्न करणार ही वार्ता केव्हाच विरून गेली. निशांत जोसात चालू झाला आणि कर्णोपकर्णी वार्ता आली ती स्मिता अपघातात सापडल्याची. पण सुदैवाने ती अफवाच ठरली.

अशा या अफवांना काही सीमाच नाही. त्यांना कारणे लागतातच असे नाही. पण त्यांचेही एक मानसशास्त्र आहे. या साऱ्या वार्ता पाहिल्या तर त्यात मुख्यतः कोणीतरी कोणाशीतरी विवाह करणार वा घटस्फोट घेणार अशी वार्ता असते. या वार्तांचे प्रमाण सर्वांत जास्त. त्यानंतर अर्थातच पिक्चर फ्लॉप जाण्याची वार्ता. या साऱ्या वार्तांच्या मागे एकमेव प्रमुख कारण असते, वैयक्तिक व व्यावसायिक द्वेष, मत्सर, जेलसी. याच मत्सराने ही अफवाबाज मंडळी एकमेकांच्या जीवावर उठतात. दुसऱ्यांचे पिक्चर पडेल असल्याचे सांगत सुटतात. नटनटयांचे संसार उद्‌ध्वस्त करायला बघतात. काय वाट्टेल ते करायला प्रवृत्त होतात. कारण एकच जेलसी. कोणाला डिम्पल परत सिनेमात यायला हवी असते. दिली वार्ता सोडून डिम्पल घटस्फोट घेणार. कोणाला हेमाचे यश बघवत नाही, निदान लग्न झाले म्हटल्यावर तरी ही ड्रीमगर्ल पब्लिकच्या मनातून उतरेल. द्या वार्ता सोडून ती लग्न करणार. मग कोणाशी याला तसा अर्थ नाही. जे नाव पटकन सुचेल, लोकांना खरे वाटेल असा कोणीही. धर्मेंद्रला 'मिर्झा साहेब'चा रोल हेमाबरोबर करायची इच्छा असल्याची टीप कोणाला तरी लागली. राजेश खन्नाचा उत्कर्ष सहन न होणाऱ्या कोणी ती टीप नेमकी उचलली. दिली वार्ता पसरवून राजेशच्या आधीच धर्मेंद्र सोहनी महिवाल सेटवर आणणार. अर्थात स्टार कास्ट मिर्झा धर्मेंद्र आणि बेगमे आझम हेमामालीनी.

प्रसिद्धीचा झोत अंगावर घेत असताना या साऱ्या अफवांना सर्वांना सामोरे जावेच लागते आणि आपली ही इंडस्ट्री अशी भक्तिभाव पाझरवते आहे तोवर तरी या

अफवांना अंत नाही. रोज नवे धक्के. खरेखोटे कसे का असेनात आपल्याला बसणारच. ¤

## तेंडुलकरांचे नाटचत्रय

तेंडुलकरांच्या नाटचबाहच कारणांनी गाजलेल्या नाटकांची त्यांना सार्वत्रिक प्रसिद्धी मिळवून दिली आणि तेंडुलकर हे नाव सर्वतोमुखी झाले. अगदी घाशीराम सखाराम तेंडुलकर असे त्यांचे नामकरणही काहींनी केले. ते त्यांचे गाजलेले नाटचत्रय म्हणजे सखाराम बाईंडर, घाशीराम कोतवाल आणि गिधाडे यांची पुन्हा आठवण होण्याचे कारण म्हणजे अगदी योगायोगाने ही तिन्ही नाटके पुन्हा रंगभूमीवर धमाल गर्दी खेचू लागली आहेत. सखारामचे प्रयोग मधून मधून होत होते, पण घाशीराम व गिधाडे मध्यंतरी बराच काळ बंद होते. आता थिएटर ॲकॅडमी घाशीराम पुन्हा रंगमंचावर आणत आहे. गिधाडचे पुनरुज्जीवन कमलाकर सारंग पंचवेद संस्थेसाठी करत आहेत. गिधाडे पुण्या-मुंबईत एका दिवसात हाऊस-फुल्लचे बोर्ड छातीवर मिरवत आहे. अर्थात एक महत्त्वाचा फरक आहेच. पूर्वी गिधाडे गर्दी खेचत असे ते डॉ. लागूंसाठी व एकूण नाटकातील भडकपणाने. पण आता गर्दी खेचली जाणार आहे, ती त्यातल्या लालन सारंगसाठी. यातल्या तांबडा डाग–निळा डाग वगैरे प्रकरणांची ज्यांना आठवण असेल त्यांच्या लक्षात यातली गोम येईलच. एकूण काय तेंडुलकरांची नाटके पुन्हा रंगभूमीवर गर्जू लागली आहेत. ¤

## गीताबाली पुन्हा हीट

गीताबाली आणि भगवानचा अलबेला गेले २।३ महिने पुण्यात धमाल उडवून राहिला होता. त्या पाठोपाठ या जोडीचे वा यांपैकी कोणाचेही पिक्चर हीट जाणार हे अगदी निश्चित होते. त्यामुळे शबाब आला आणि तुफान गर्दी खेचू लागला. आता बारादरी हा गीताबालीचा पिक्चर येतो आहे. त्यातली तिची नखरेल ठसकेबाज नृत्ये आणि गाणी पुन्हा सर्वांना वेड लावणार हे निश्चित. ' भूला नही देना जी, भूला नही देना, तस्वीर बनाता हूँ तस्वीर नही बनती, पिया पिया जीया मेरा डोले इ. गाणी धमाल उडवतील असे दिसते. ■

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### १७।४।७६ ते २३।४।७६

**मेष : आशा आकांक्षांना अनुकूल**

राशीवर रवी आला आहे. गुरूदेखील तेथेच आहे. ही सारी ग्रहरचना उत्तम आहे. यावेळी जे जे करायचे ठरवाल ते ते यशाचे सुवर्णकण घेऊन उभे राहणार आहे. म्हणूनच यावेळी चांगले विचार मनात आणा. उद्योगधंद्यांतील अनेक दिवस मनात बाळगलेल्या महत्त्वाकांक्षा पुऱ्या होतील. चालू उद्योगातील अडचणींवर मात करून तुम्ही त्याच्या विस्ताराची योजना आखू शकाल. मन उत्साह आणि प्रसन्नता याने धुंद होऊन जाईल. परदेश प्रवासाचे उराशी बाळगलेले स्वप्न साकार होण्यासारखे चिन्ह दिसेल. कष्टाला कंटाळू नका. मंगळ हा तुमचा राशिस्वामी असून तो तर सध्या अनुकूल आहे. तेव्हा मंगळवारी कोणत्याही हेतूची पूर्ती होऊ शकेल. नोकरीत मान वाढेल. काही अनपेक्षित मागण्या पुऱ्या होतील. बेकारांच्या नशिबाचा वनवास आता संपलेला आहे. शुभ दिनांक १९, २०, २१.

**महिलांना :** कुटुंबात तुमचे स्थान उंचावणार आहे. संपत्तीची सूत्रे हाती येतील.

**विद्यार्थ्यांना :** व्यक्तिमत्त्वाचा लाभ अनेक क्षेत्रांत पदरी पडेल.

**वृषभ : थोडे शांत रहा**

गुरू–केतू बारावे होते ते पुरेसे नाहीत म्हणूनच की काय आता रवीदेखील बारावा झाला आहे. आयुष्यात भरतीच्या लाटा येतात आणि जातात. त्या डोक्यावरून जाऊ दिल्या पाहिजेत. लाटांच्या विरुद्ध दिशेने पोहोण्यात काहीच अर्थ नसतो. हे लक्षात घेऊन जर येते काही आठवडे वागलात तर हेही दिवस निघून जातील. या आठवड्यात नोकरीत परिस्थितीला बरेच शरण जावे लागेल. आवडत नसलेले काम करावे लागेल. वरिष्ठांच्याकडून बोलणे खावे लागेल. पण हे सारे सहन केल्याखेरीज गत्यंतर उरणार नाही. आर्थिक परिस्थितीला धैर्याने तोंड द्यावे लागेल. हाती येणारा पैसा मध्येच अडकून बसेल. तरीही तुम्हाला हार खावी लागणार नाही. उद्योगक्षेत्रात तुमच्या योजनांचा विस्तार होईल. शुभ दिनांक १८, १९, २०.

**महिलांना :** या आठवड्यात कोणत्याही प्रकारचे भांडण टाळा. संसारात थोडा फार त्रास सहन करावा लागेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षा असेल तर फक्त अभ्यासाकडे लक्ष द्या. धैर्याने वागा.

**मिथुन : सुधारणा होईल**

मंगळाचे वरदान आहे, गुरू अकरावा आहे. त्यामुळे तुमचे ग्रहमान सर्वच बाबतीत अनुकूल आहे पैसा मिळत नव्हता तो आता मिळू लागेल. कर्जाच्या बाबतीत ओढवणारे संकट आता दूर होईल. अनेकांबरोबर दुखवलेले संबंध पुन्हा सुरळीत होऊ लागतील. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. समज–गैरसमज दूर होऊन तुमच्याबद्दल वरिष्ठांच्या मनात विश्वास निर्माण होऊ लागेल. मानसिक व परिस्थितीच्या कोंडमाऱ्यातून तुम्ही आता बाहेर पडू लागणार आहात. तब्येत सुधारू लागेल. शुभ दिनांक १७, २० २१.

**महिलांना :** प्रतिकूल परिस्थिती आता डोक्यावरून गेली आहे. पुन्हा सारे सुरळीत होण्याच्या मार्गाने वाटचाल सुरू होईल.

**विद्यार्थ्यांना :** मनाचा तोल ढळू देऊ नका. अपुरे राहिलेले शिक्षण आता पुन्हा सुरू होऊ शकेल.

**कर्क : पैसा जपून खर्चा**

तुम्हाला पैसा मिळण्यात फारशा अडचणी नाहीत, पण मिळालेला पैसा जर जपून वापरला नाही, तर मंगळाच्या करणीमुळे अडचणी निर्माण होऊ शकतील. स्वतःचे काम स्वतः करा. याखेरीज या आठवड्यात कुणाच्या भानगडीत पडू नका. जामीन राहणे टाळल्यास उत्तम होईल. नोकरीत तुमच्याकडे जर प्रत्यक्ष पैसा देण्याघेण्याचे काम असेल, तर कुणाच्याही भिडेला बळी पडू नका. नोकरीत यावेळी तात्पुरत्या बदलीची शक्यता आहे.

उद्योग–व्यवसायात नव्या योजनांना वाव राहील. प्रतिमा उंचावेल. निरनिराळ्या क्षेत्रातील मोठ्या व्यक्तींबरोबर चांगले संबंध प्रस्थापित होतील. तब्येत अधूनमधून नरमगरम राहील. दवाखाना सुटणार नाही. शुभ दिनांक १८, २०, २२.

**महिलांना :** नोकरीत उत्तम स्थिती राहील. वरिष्ठांचे साहानुभूतीचे संबंध राहतील.

**विद्यार्थ्यांना :** आशाआकांक्षा सफल होतील. लॉटरीत भाग घ्या.

## सिंह : धुके निवळू लागेल

तुम्ही वरवर एखाद्या संतासारखे वागत असलात तरी तुमच्या मनात जबरदस्त महत्त्वाकांक्षा असेल व जे मिळण्याची इच्छा असेल ते मिळाले नाही तर त्याची खंत असते, पण संधीची तुम्ही वाट बघत बसा. मित्रांनो, तुमच्या जीवनात अशी एखादी संधी तुमच्याकडे चालत येणार आहे. तुम्ही जिथे काम कराल तिथे ही संधी येईल. राजकारण असो की नोकरी असो कुठेही अशी संधी तुम्हाला मिळणार आहे. तुमच्याबद्दलचे सारे गैरसमज दूर होतील. दुरावलेली माणसे पुन्हा जवळ येतील. आर्थिक परिस्थितीतून अनुकूल असा मार्ग निघेल. स्वतःच्या उद्योगात असलेल्या अडचणींवर मात करण्यात यशस्वी व्हाल. शुभ दिनांक १८, २०.

**महिलांना :** सार्वजनिक कार्यात प्रतिष्ठा मिळेल. नोकरी कायम होईल. अनेकांना रोजगार मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत नंबर मिळवायचा असेल तर आता जिद्दीने कामाला लागा. यश मिळेल.

## कन्या : अनुकूलता येत आहे

रवी व गुरु आठवा असला, तरी ते तुमचे काही नुकसान करणार नाहीत. आर्थिक परिस्थितीला अतिशय अनुकूल असे वळण लागण्याची शक्यता आहे. परिस्थिती काबूत आणण्यात यश मिळवाल. मित्र व नातेवाईकांबरोबरचे तुमचे संबंध सुधारतील. तुम्हाला ज्या लोकांनी त्रास दिला त्यांना आता पश्चात्ताप होईल व ते तसे तुमच्याकडे कबूल करतील. नोकरीत वरिष्ठांबरोबर निकटचे संबंध प्रस्थापित होतील. चालू कामात थोडाफार ताण वाढेल. पण तब्येत सुधारा. कामाचा उरक चांगला होईल. रेंगाळलेला पत्रव्यवहार पुन्हा चालू होईल. शुभ दिनांक २०, २२.

**महिलांना :** मनातील चिंता दूर पळतील. हाती घेतलेले काम उत्साहाने पुरे होईल. नोकरीत अनुकूलता राहील.

**विद्यार्थ्यांना :** फार छान असा हा काळ आहे. तुमच्या जीवनात काही तरी नवे घडेल.

## तूळ : परिस्थितीवर पकड

नोकरीत काही तरी अकल्पित व अघटित घडणार असा हा आठवडा आहे. आज जे घडावे अशी इच्छा तुमच्या मनात होती ती इच्छा अकस्मात पुरी होईल. फ्लॅट अगर बंगल्याची इच्छा पुरी होईल. ज्यांना जागा मिळत नव्हती त्यांना ती मिळू शकेल. नोकरीत तुमच्यावर मालक खूष असतील. एखादे नवे योजकबद्ध काम तुमच्यावर सोपवण्याची व तुमच्या कर्तबगारीला वाव देण्याचे ते ठरवतील. बेकारांनी काळजी हा विषय सोडून द्यावा. शुभ दिनांक १७, २१, २२.

**महिलांना :** चालू नोकरीत अधिकार वाढतील. कामाचा ताण कमी होईल. विशेषतः वरिष्ठांची मर्जी राहील.

**विद्यार्थ्यांना :** तुम्ही जे मनात आणाल ते करून दाखवाल. कर्तृत्वाला वाव मिळेल.

## वृश्चिक : परिस्थिती सुधारेल

हा आठवडा सर्वसामान्यतः अनुकूल आहे. तुमच्या प्रगतीची सारी सूत्रे सध्या तरी एकट्या शनीच्या हाती आहेत. त्यामुळे त्याच्या चालीप्रमाणे तुमची परिस्थिती हळूहळू पण निश्चित सुधारणार आहे. रवी विरोधकांना चांगलेच फजी पाडील. पण त्याचबरोबर वरिष्ठांच्या मनांत गैरसमज व अविश्वास निर्माण करील. म्हणून नोकरीत जास्त काळजी घ्या. आपल्या कामाशी प्रामाणिक राहा. वरिष्ठांच्या विरुद्ध जिथे कुजबूज चालू असते तिथे तुम्ही संबंध ठेवू नका. स्थावराच्या व्यवहारात काही अनुकूल घडेल. सासूरवाडीची संपत्ती मिळण्याच्या दृष्टीने घडामोडी घडू शकतील. बेकारांना मात्र अजून थोडी वाट पाहावी लागेल. शुभ दिनांक १८, २०, २१.

**महिलांना :** मन शांत ठेवून काम करा. संताप व तापटपणा यावेळी उपयोगी पडणार नाही.

**विद्यार्थ्यांना :** गेले काही दिवस तुम्ही जे प्रयत्न केले आहेत, त्याचे यश पदरात पडेल.

## धनू : यशाची चढती कमान

पाचव्या गुरूबरोबर सध्या रवीदेखील पाचवा आहे. त्यामुळे कोणत्याही क्षेत्रांत यश पदरी पडल्याखेरीज राहणार नाही. योजनाबद्ध असे कोणतेही काम ठरवू शकता. आध्यात्मदृष्ट्या हा काळ फारच छान आहे. एखाद्या दिव्य व्यक्तिबरोबर तुमचे संबंध येऊन त्यांचा आशीर्वाद तुमच्या भावी कार्याचा मुहूर्त ठरेल. पैसा आज कमी पडत असला तरी प्रतिष्ठेला तडा जाईल असे काही घडणार नाही. ज्यांचे तुम्ही देणे लागता ते काही तुम्हाला त्रास देणार नाहीत. नोकरीत कामाचा प्रभाव पडेल. कार्यक्षमता वाढेल व त्यांचा प्रभाव पडेल. शुभ दिनांक १८, २०, २२.

**महिलांना :** तुमची व्रतवैकल्ये समाधानात पार पडतील. मंगल कार्यात भाग घेता येईल. समाधान मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** तुम्ही परीक्षेची काळजी करू नका. परीक्षा तुम्हाला अनुकूल जाईल.

## मकर : विरोधक थंडावतील

शत्रूस्थानी मंगळ आहे. तो तुमच्या साऱ्या विरोधकांना नकोसे करील. तुम्ही कोणतेही डावपेच लढवा, त्यांत यश येईल. नोकरीत असो की राजकारणात असो, सध्या तरी तुम्हाला अजिंक्यपद मिळाले आहे. तुम्ही आजवर ज्या आशाआकांक्षा उराशी बाळगल्या आहेत, त्या आता वेगाने यशाकडे झेप घेऊ लागतील. व्यवसाय सुरू करा. पैसा व इतर मदत तुम्हाला सहज मिळू शकेल. खते, इंजिनिअरिंग उद्योग, जमीन, चित्रपट वगैरे उद्योग सुरू करा. नोकरीत वरिष्ठपद सहज पदरी पडेल. तुमच्या वरिष्ठांची खुर्ची तुम्हाला मिळेल. प्रमोशन मिळू शकेल. शुभ दिनांक २०–२२–२३.

**महिलांना :** तब्येतीची काही ना काही काळजी सतत लागून राहील. डोळ्यांना त्रास होईल.

**विद्यार्थ्यांना :** पाणी हे तुम्हाला फारसे उपकारक नाही. पोहणे जपून करा.

**कुंभ : यश झेपावेल**

रवी तिसरा आहे, तर मंगळ पाचवा आहे. असे हे समर्थ ग्रह तुम्हाला सामर्थ्य देत असताना तुम्ही काल्पनिक असमाधानात गुंतून राहिलात, तर दैव तरी तुमच्यापुढे काय करणार आहे? म्हणून संधी येत आहे, त्याचा झपाट्याने लाभ उठवा. तुम्ही जर एखाद्या मुद्रणालयाचे मालक अगर प्रमुख झाला, तर आश्चर्य वाटू नये. नोकरीत प्रमोशन सहजासहजी पदरी पडेल. जे आजवर मागून मिळत नव्हते, ते आता सहज पदरी पडेल. इंजिनिअरिंग उद्योग, तेल उद्योग, स्थावर यांत नोकरी करणारे जास्त भाग्यवान ठरतील. बेकारांच्या मागे लागलेला वनवास आता संपला आहे. शुभ दिनांक २३–२५.

**महिलांना :** उत्साह वाढेल. कुटुंबात मोठे मानाचे स्थान मिळेल. स्वतःचा स्वतंत्र उद्योग सुरू करा.

**विद्यार्थ्यांना :** पैशांची चणचण भासणार नाही. यश व प्रगतीचा सप्ताह आहे.

**मीन : स्थावराची प्राप्ती होईल**

चौथा मंगळ आणि पाचवा शनी तुम्हाला सारे काही मिळवून देणार आहेत. शेती खरेदी करावयाची असेल, तर त्याला प्रतिसाद मिळेल. तुम्ही शेतीच्या व्यवसायात लक्ष घाला, यश मिळेल. तुमच्या स्थावराचा वाद जर चालू असेल, तर त्यात तडजोड होऊन तुमच्या पदरात बरेच काही पडेल. जागेचा प्रश्न सुटेल. व्यावसायिकदृष्ट्या जर तुम्हाला एखादा कोर्स घ्यायचा असेल, तर तो घ्यावा. नोकरीत बरीच अनुकूलता आहे. गैरसमज दूर होऊन तुमच्या हक्काचे तुम्हाला मिळू शकेल. प्रमोशनची जर तुमची मागणी असेल, तर त्याचा साहानुभूतीने विचार होईल. प्रवास घडेल. मजा करण्यासाठीदेखील प्रवास होईल. लॉटरीत अवश्य भाग घ्या. तुम्ही जर लेखक असाल तर तुमच्या हातून चांगले लेखन होईल. शुभ दिनांक २२–२५.

**महिलांना :** मंगळवारचा उपवास करा. तुम्हाला मनःस्वास्थ्य उत्तम मिळेल. पैशाचा प्रश्न सुटेल.

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक कारणाकरिता प्रवास घडेल. आशाआकांक्षांना प्रेरणा मिळेल. □ □

# विद्यार्थिनींचा वासंतिक वर्ग : मे १९७६

व्यक्तिमत्त्वाचा विकास या उद्दिष्टावर आधारलेले, उन्हाळी-हिवाळी सुट्टयांतील दोन आठवड्याचे खास वर्ग विद्यार्थिनींकरिता गेली चार वर्षे घेण्यात येत आहेत. अशा प्रकारचे तेरा वर्ग पुणे, सोलापूर, श्रीपूर, ठाणे व विलेपार्ले येथे आजवर घेण्यात आले. महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या ( व काही प्रसंगी महाराष्ट्राबाहेरील ) सुमारे साडेचारशे विद्यार्थिनींनी या वर्गात भाग घेतला होता. वर्गांचा उपक्रम, विद्यार्थी साहाय्यक समिती व इन्व्हेस्टमेंट इन् मॅन या संस्थांतर्फे आयोजित असतो.

विद्यार्थी-विद्यार्थिनींचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या अभिव्यक्तीबरोबर विकसित होत असते. आपले विचार इतरांपुढे मांडणे, चर्चा संवाद करणे, एवढेच काय पण योग्य विचार कसा करावा हे समजणे–ही सर्व अभिव्यक्तीची अंगे आहेत. रूढ अभ्यासक्रमात यावर अल्प भर दिला जातो. ही उणीव काही अंशी भरून काढावी हा प्रस्तुत वर्गांचा उद्देश आहे. या उद्दिष्टांकरिता, उपयुक्त विषयावरील माहिती व चर्चा, छंद, शिक्षण, व्यायाम व सांघिक खेळ, सामाजिक जीवनातील प्रश्नांचा परिचय, कलांची ओळख वगैरे विविध गोष्टींचा समावेश वर्गाच्या कार्यक्रमात असतो.

यंदाच्या वासंतिक वर्गांची योजना, पुणे, औरंगाबाद व ठाणे या तीन गावी केलेली आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनींना या वर्गात प्रवेश देण्यात येतो. **पुण्यातील वर्ग ता. १६ ते ३० मे या दोन आठवड्यांच्या काळात होईल.**

वर्गाचे शुल्क ( राहण्या-जेवण्याच्या खर्चासह ) रु. ५० आहे. छंदांच्या शिक्षणासाठी रु. १५ जादा द्यावयाचे आहेत. सामान्य आर्थिक स्थितीतील विद्यार्थिनींना शुल्कामध्ये आवश्यक ती सवलत देण्यात येईल. विद्यार्थिनींच्या राहण्याची व वर्गाची सर्व व्यवस्था, विद्यार्थी साहाय्यक समितीच्या लजपतराय विद्यार्थी भवन या वसतिगृहात होईल. वर्गात भाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी खालील पत्त्यावर लिहून ( ५० पैशांच्या तिकिटासह ) प्रवेश अर्ज मागवावेत. प्रवेश अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख ५ मे १९७६ ही आहे.

**पत्ता**—विद्यार्थी साहाय्यक समितीचे विद्यार्थीगृह, ११३७/१३, मॉडेल कॉलनी, पुणे १६
( फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावरील, पोलीस मैदानासमोरील गल्ली, म्हसोबा चौकीमागे )

प्रत्यक्ष भेटीची वेळ–
सायंकाळी ५ ते ७

निर्मला पुरंदरे
संचालिका